## ‘भारत आणि चीनने एकमेकांकडे भागीदार म्हणून पाहावे’

**बीजिंग :** मध्य-पूर्व आशियात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक समीकरणे वेगाने बदलत आहेत. या पार्श्वभूमीवर चीनने भारताकडे मैत्रीचा हात पुढे केला आहे. बीजिंगमध्ये आयोजित एका पत्रकार परिषदेत चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी भारत आणि चीनमधील सुधारत असलेल्या संबंधांबाबत मोठे विधान केले आहे.



दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, निःपक्ष

https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com

महाभूमि DIGITAL
LIKE COMMENT SHARE SUBSCRIBE
अपडेटेड रहा, अपडेटेड दाखवा.
ताज्या घडामोडींसाठी खालील लिंकला सबस्क्राईब करा व शेअर करा
https://www.youtube.com/@MAHABHOOMIDIGITAL

## न्यूज ब्रीफ

### ..तोपर्यंत मी मंत्री : रामदास आठवले

**मुंबई :** जोपर्यंत नरेंद्र मोदी हे पंतप्रधान आहेत, तोपर्यंत मी मंत्री असेल. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा लवकरच राष्ट्रीय पक्ष होणार आहे. भाजपाला आमच्या पक्षाची मदत होते. मी त्यांच्यासोबत जोपर्यंत आहे, तोपर्यंत मोदी हेच पंतप्रधान राहतील, असा दावा रामदास आठवले यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयारी केलेली राज्यघटना कोणीही बदलू शकत नाही. विरोधकांनी लोकसभा निवडणुकीत याबाबत खोटे नॅरेटीव्ह सेट केले होते. त्याचा फटका निवडणुकीत बसला. आता मात्र विरोधकांना केंद्रात सत्तेत येण्याची कोणताही संधी मिळणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सर्व समाजांचा पाठिंबा असलेले नेते आहेत. ते अतिशय चांगला कारभार करत आहेत, असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नमूद केले.

### पुणे विद्यापीठ चौक उड्डाणपुलाचे लोकार्पण

**पुणे :** पुणेकरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता करणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील बहुप्रतिक्षित दुमजली उड्डाणपुलाचे लोकार्पण रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे संपन्न झाले. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात मुरलीधर मोहोळ यांनी या पुलाला 'अजित पवार' यांचे नाव देण्याची आग्रही मागणी केली, ज्याला मुख्यमंत्र्यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत संमती दर्शवली आहे.

### जय पवार यांची पत्रकार परिषद लांबणीवर

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर आता अजित पवार कुटुंबातील सदस्य प्रथमच जाहीरपणे आपली भूमिका मांडणार आहेत. अजितदादांचे सुपुत्र जय पवार ९ मार्च रोजी पत्रकार परिषद घेणार होते. पण त्यांची पत्रकार परिषद काही कारणांमुळे लांबणीवर टाकण्यात आली आहे. यापूर्वी जय पवार यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली नाराजी व्यक्त केली होती, मात्र आता ते प्रत्यक्ष माध्यमांसमोर येत असल्याने चर्चांना उधाण आले आहे. जय पवार यांनी यापूर्वी सोशल मीडियाच्या माध्यमातून तपासावर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. विमान अपघातात 'ब्लॅक बॉक्स' इतक्या सहजपणे नष्ट होऊ शकत नाही, असा दावा त्यांनी केला होता. या अपघाताचे 'निर्विवाद सत्य' बाहेर आलेच पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे.

## ३३,५०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन...

# टीएमसीकडून राष्ट्रपतींचा नाही, तर संविधानाचाही अपमान : मोदी

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कार्यक्रमात प्रोटोकॉलचे उल्लंघन झाल्याच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारवर जोरदार टीका केली. ही घटना केवळ राष्ट्रपतींचा अपमान नसून, भारताच्या संविधान आणि लोकशाहीच्या भावनेवर आघात असल्याचे त्यांनी म्हटले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रविवारी दिल्लीमध्ये आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी सुमारे ३३,५०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करत होते. यावेळी आयोजित जनसभेला संबोधित करताना त्यांनी पश्चिम बंगाल सरकारवर निशाणा साधला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजधानी दिल्लीच्या दळणवळण व्यवस्थेत एक नवीन अध्याय जोडला आहे. पंतप्रधानांनी सुमारे ३३,५०० कोटी रुपयांच्या विविध



विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. यामध्ये देशातील पहिल्या 'रिंग मेट्रो' नेटवर्कचे लोकार्पण आणि तीन नवीन मेट्रो कॉरिडॉरच्या पायाभरणीचा समावेश असून, यामुळे दिल्लीकरांचा प्रवास अधिक वेगवान आणि सुखकर होणार आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आज देश आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करत आहे, पण काल पश्चिम बंगालमध्ये टीएमसी सरकारने देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा घोर अपमान केला. त्या संथाल समाजाच्या मोठ्या उत्सवात सहभागी होण्यासाठी बंगालमध्ये गेल्या होत्या. मात्र त्यांचा सन्मान करण्याऐवजी टीएमसीने या पवित्र कार्यक्रमाचा बहिष्कार केला.

मोदी पुढे म्हणाले की, द्रौपदी मुर्मू स्वतः आदिवासी समाजातून आलेल्या आहेत आणि त्या नेहमीच आदिवासी समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. तरीही राज्य सरकारने या कार्यक्रमाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे केले नाही. हे केवळ राष्ट्रपतींचा अपमान नाही, तर भारताच्या संविधानाचा आणि लोकशाहीच्या महान परंपरेचाही अपमान आहे.

### टीएमसीचा अहंकार लवकरच चकनाचूर होईल

■ पंतप्रधान मोदी यांनी टीएमसी सरकारवर टीका करताना म्हटले की, सत्तेचा अहंकार कोणाचाही टिकत नाही. टीएमसीचे गलिच्छ राजकारण आणि सत्तेचा अहंकार, ज्यामुळे एका आदिवासी महिला राष्ट्रपतींचा अपमान झाला, तो बंगालची जनता लवकरच चकनाचूर करेल. पश्चिम बंगालमधील जागरूक जनता, देशातील महिला आणि आदिवासी समाज टीएमसीला हा अपमान कधीही माफ करणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

### आप सरकारवर टीका

■ या कार्यक्रमात बोलताना पंतप्रधानांनी आम आदमी पार्टीवरही टीका केली. ते म्हणाले की, आधीची सरकार नसती तर दिल्ली मेट्रोच्या या प्रकल्पांचे काम खूप आधी पूर्ण झाले असते. दिल्लीकरांनी पूर्वीची सरकार हटवून आता भारतीय जनता पक्षाचे सरकार निवडले असून त्यामुळे विकासाला गती मिळाली आहे. पंतप्रधानांनी सांगितले की, यमुना नदी स्वच्छ करण्यासाठी हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. तसेच केंद्र सरकारने आयुष्मान भारत योजना लागू करण्याबाबत अनेक वेळा आग्रह केला होता, परंतु आधीच्या सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले, असा आरोपही त्यांनी केला.

## कमवा आणि शिका योजनेतून दरमहा २ हजार

### मुलींना शाळेतच स्वसंरक्षणाचे धडे

**सांगली, वृत्तसंस्था :**



येत्या जून महिन्यापासून मुलींना शाळेतच स्वसंरक्षणाचे धडे मिळणार असल्याची घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी केली. यावेळी त्यांनी कमवा व शिका योजनेतून विद्यार्थ्यांना दरमहा २ हजार मानधन देण्याचीही घोषणा केली. त्यांच्या या घोषणेचा राज्यभरातील विद्यार्थ्यांना लाभ होण्याची शक्यता आहे.

जागतिक महिला दिनानिमित्त सांगलीत कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. या उपक्रमांतर्गत कराटे प्रशिक्षण घेतलेल्या जवळपास १ हजार मुलींना मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते यलो बेल्ट ग्रेड प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी बोलताना मंत्री पाटील म्हणाले, महिला सबलीकरणासाठी केवळ महिलांनीच नव्हे तर सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. सांगली जिल्ह्यात महिला सबलीकरणासाठी आम्ही एक नवा प्रयोग केला. त्यात ५० शाळांमधील ३६ हजार मुलींना दर आठवड्याला शनिवारी १ तास कराटे व ज्युडोचे प्रशिक्षण दिले. त्यातील १५ हजार ४०० मुलींना आज आम्ही पहिला यलो बेल्ट दिला. त्या पुढचे बेल्ट मिळवण्यासाठी जे शुल्क द्यावे लागेल ते प्रशासन देईल.

■ खासदार विशाल पाटील यांनी यावेळी मुलींचे मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण पाहून आपल्याला समाधान वाटत असल्याची भावना व्यक्त केली. मला दोन मुली आहेत. मुलींचे हे कराटे प्रशिक्षण पाहून माझे म्हातारपण सुखरूप जाईल असा विश्वास वाटतो, असे ते म्हणाले. त्यांचे हे विधान ऐकूण उपस्थितांत एकच हशा पिकला.

येत्या जून महिन्यापासून प्रत्येक शाळेत मुलींना स्वसंरक्षणासाठी लाठ्याकाठ्याचे प्रशिक्षण मिळेल. सद्यस्थितीत राज्यातील विविध महाविद्यालयांत शिकणाऱ्या ५ लाख मुलींना सध्या कॉलेज फी लागत नाही. वसतिगृह शुल्क लागत नाही. याशिवाय त्यांना कमवा व शिका योजनेंतर्गत दरमहा २ हजार रुपयांचे मानधनही देण्यात येईल, असे ते म्हणाले. यावेळी खासदार विशाल पाटील यांच्यासह आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांच्यासह इतर अधिकारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## राज्यात कुठेही इंधनाचा तुटवडा नाही : मुख्यमंत्री फडणवीस

### सरकार परिस्थितीचा सामना करण्यास सक्षम

**मुंबई, वृत्तसंस्था :**

इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धामुळे राज्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरकसपणे फेटाळून लावला आहे. राज्यात कुठेही इंधनाचा तुटवडा नाही. माध्यमांनी काही शहरांत पेट्रोल-डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याचे वृत्त दिले. त्यामुळे पेट्रोल पंपांवर विनाकारण मोठ्या रांगा लागल्या. प्रत्यक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकार भविष्यातील स्थितीचा सामना करण्यास सक्षम आहे, असे ते म्हणालेत.

आखातातील इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धाचा फटका अवघ्या जगाला बसत आहे. त्याच्या झळा आता महाराष्ट्रातही पोहोचल्या आहेत. सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात तब्बल ६० रुपयांची वाढ केली.



तसेच त्याच्या वितरणावरही काही ठराविक दिवसांची कॅप लावली. विशेषतः तेल कंपन्यांनी पुण्यातील वितरकांना पैसे दिल्याशिवाय इंधन देण्यास नकार दिल्यामुळे राज्यात इंधन टंचाई निर्माण झाल्याचा दावा केला जात आहे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी पत्रकारांशी संवाद साधताना हा दावा जोरकसपणे फेटाळून लावला आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, लोकांना चुकीची माहिती देऊन पॅनिक तयार करण्याची गरज नाही. केंद्र सरकारने यासंदर्भातील आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली आहे. भारताच्या ऊर्जा सुरक्षेसंबंधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कशाप्रकारे पाऊले उचलली हे आपल्यासमोर आले आहे. सध्या राज्यात कुठेही इंधन टंचाई नाही. काही माध्यमांनी दोन-तीन दिवस झाले पेट्रोल - डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याच्या बातम्या दिल्या. यामुळे पेट्रोल पंपांवर विनाकारण मोठमोठ्या रांगा लागल्या. असा कोणताही तुटवडा नाही. केंद्र सरकारनेही हे स्पष्ट केले आहे. भविष्यात जी परिस्थिती उद्भवेल, त्याचा सामना करण्यासाठी भारत सरकार मोदींच्या नेतृत्वात सक्षमपणे भक्कम परिस्थितीत आहे.

## १४ महिन्यांनी आरोपी येणार जेलबाहेर

**बीड :** जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील एक आरोपी १४ महिन्यानंतर कारागृहाबाहेर येणार असल्याची माहिती मिळाली आहे. न्यायालयाने या आरोपीला तशी परवानगी दिली आहे. परंतु, याबाबत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया देताना यावर आक्षेप घेतल्याचे म्हटले जात आहे.

सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील एक महत्त्वाचा आरोपी जयराम चाटे तब्बल १४ महिन्यांनंतर काही तासांसाठी कारागृहातून बाहेर येणार आहे. त्याच्या धाकट्या भावाच्या निधनानंतर होणाऱ्या विधीस उपस्थित राहण्यासाठी न्यायालयाने त्याला पोलीस बंदोबस्तात जाण्याची परवानगी दिली आहे. जयराम चाटेचा धाकटा भाऊ श्रीराम चाटे याचे २ मार्च रोजी निधन झाले. बाराव्याच्या विधीस उपस्थित राहण्यासाठी जयराम चाटेच्या वकिलांनी न्यायालयात विशेष परवानगी मागितली होती.

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे आज रायगडावर

### छत्रपतींच्या साक्षीने सुरू करणार सदस्य नोंदणी..

**मुंबई, वृत्तसंस्था :**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे ९ मार्चला रायगडावर जाणार आहेत. ते तेथून मनसेच्या सदस्य नोंदणीचा कार्यक्रम सुरू करणार आहेत. प्रश्न आकड्याचा नाही. मनसेची सदस्य नोंदणी कायम मोठीच होते. पण यावेळी महाराष्ट्र म्हणून, मराठी म्हणून सामान्य मराठी माणसांची महाराष्ट्राचा पाईक होण्याची इच्छा किती तीव्र आहे आणि सरकार किती चुकीच्या पद्धतीने सर्व गोष्टी हाताळते आहे याचा राग सर्वांच्या मनात किती आहे हे यातून स्पष्ट होईल, असे ते म्हणालेत.

मनसेची ९ मार्च २००६ रोजी स्थापना झाली. त्यानुसार सोमवारी पक्षाचा २० वा वर्धापन दिन आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निमित्ताने पक्षाच्या सदस्य नोंदणीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याची सुरुवात त्यांनी रायगडावरून करण्याची घोषणा केली आहे. ते



रविवारी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, आपल्या पक्षाचा ९ मार्च २०२६ ला २० वा वर्धापनदिन. मराठी माणूस आणि मराठी भाषा यांच्यासाठी आक्रमकपणे लढणाऱ्या पक्षाचा आणि एका विचाराचा हा वर्धापनदिन. या निमित्ताने पक्षाची सदस्य नोंदणी १० मार्च २०२६ पासून सुरु होत आहे. ९ मार्च ला मी सकाळी रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून माझ्यापासून सदस्य नोंदणीची सुरुवात करत आहे. या रायगडाने महाराजांचं वास्तव्य अनुभवलंच पण 'शिवराज्याभिषेकाचा' साक्षीदार देखील हा किल्लाच. अशा पावन ठिकाणी जाऊन आपण आपली सदस्य नोंदणी सुरु करत आहोत, असे ते म्हणाले.

## नितीश यांचे पुत्र जेडीयु मध्ये सामील

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री यांचे पुत्र निशांत कुमार यांनी ८ मार्च म्हणजेच रविवारी जेडीयुची सदस्यता घेतली. कार्यक्रमात मुख्यमंत्री नितीश कुमार उपस्थित नव्हते. पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष संजय झा यांनी निशांत यांना पक्षाची सदस्यता दिली. ललन सिंह यांनी त्यांना पक्षाचा गमछा घातला. पक्षाची सदस्यता घेतल्यानंतर निशांत यांनी ललन सिंह आणि संजय झा यांच्या पायांना स्पर्श केला.

निशांत म्हणाले, ‘मी पक्षासाठी मेहनतीने काम करेन. माझ्या वडिलांनी २० वर्षांत जी कामे केली आहेत, ती मी पुढे नेईन. राज्यसभेवर जाण्याचा निर्णय माझ्या वडिलांचा आहे. बिहारच्या जनतेला आणि देशाच्या जनतेला मी आवाहन करतो की, वडिलांवर विश्वास कायम ठेवा.’ यापूर्वी निशांत यांनी त्यांचे वडील नितीश यांच्या शैलीत हात जोडून सर्वांना अभिवादन केले. ते पांढऱ्या रंगाचा कुर्ता आणि क्रॉक्स चप्पल घालून आले होते. यावेळी नितीश कुमार आणि निशांत कुमार जिंदाबादच्या घोषणा दिल्या जात होत्या. 'बिहारचा मुख्यमंत्री कसा असावा, निशांत कुमार यांच्यासारखा असावा' अशाही घोषणा देण्यात आल्या.

### आखाती देशातील तणावाचा स्टील उद्योगावर परिणाम

# कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर परिणामाची भीती; स्टील महागल्यास बांधकाम खर्च वाढणार

**जालना / प्रतिनिधी**

आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य तणावाचे पडसाद आता भारतातील उद्योग क्षेत्रातही उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः देशातील महत्त्वाचे स्टील उत्पादन केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जालना येथील औद्योगिक पट्ट्यात या परिस्थितीमुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कच्च्या मालाच्या आयातीवर तसेच इंधन आणि वाहतूक खर्चावर परिणाम झाल्यास जालन्यात तयार होणाऱ्या स्टील, सळईच्या किमती वाढण्याची शक्यता उद्योग क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.



देशात “स्टील सिटी” म्हणून ओळख असलेल्या जालना औद्योगिक वसाहतीतून दरवर्षी सुमारे ४.५ दशलक्ष टन स्टील सळईचे उत्पादन केले जाते. या उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर स्क्रॅप ( जुने लोखंड ) आणि लोखंडी कच्चा माल आवश्यक असतो. देशात वापरल्या जाणाऱ्या स्क्रॅपपैकी जवळपास दहा टक्के स्क्रॅपची आयात थेट जालन्यातील उद्योगांसाठी केली जाते. उर्वरित कच्चा मालही जगातील विविध देशांतून आयात केला जातो.

हा कच्चा माल मुख्यतः स्ट्रीट ऑफ हॉर्मुझ या महत्त्वाच्या सागरी मार्गातून भारतात पोहोचतो. सध्या आखाती प्रदेशात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे या मार्गावरील जहाज वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होण्याची भीती स्टील उद्योग क्षेत्रात व्यक्त होत आहे. स्टील उद्योगासाठी लागणारा कोळसा तसेच इतर इंधनही मोठ्या प्रमाणावर आयात केले जाते. आखाती प्रदेशातील तणाव वाढल्यास आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढू शकतात. त्याचा परिणाम पेट्रोल आणि डिझेल दरांवर होऊन वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता आहे. वाहतूक खर्च वाढल्यास त्याचा थेट परिणाम स्टील उत्पादन खर्चावर होतो आणि बाजारात स्टील सळईच्या किमती वाढू शकतात. स्टील महागल्यास त्याचा परिणाम केवळ उद्योग क्षेत्रापुरता मर्यादित राहणार नाही. पायाभूत सुविधा प्रकल्प, सरकारी बांधकामे तसेच स्वतःचे घर उभारण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सामान्य नागरिकांनाही त्याचा आर्थिक फटका बसू शकतो.

### “ आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर लक्ष

*आखाती प्रदेशातील तणाव वाढल्यास कच्च्या मालाच्या आयातीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचा थेट परिणाम स्टील उत्पादन खर्चावर होऊ शकतो. इंधनाच्या किंमती वाढल्यास देखील स्टीलच्या किमतींवर परिणाम होऊ शकतो.*
*स्टीलच्या किमती वाढल्यास आर्थिक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय परिस्थिती कशी बदलते याकडे उद्योग क्षेत्राचे लक्ष लागले आहे.*

*- **घनश्याम गोयल,** अध्यक्ष : जालना स्टील असोसिएशन..*

## भाजपला 'एक देश, एक नेता, एक पक्ष'चे वेड चढले

### ममतांच्या धरणे आंदोलनाचा तिसरा दिवस

**कोलकाता, वृत्तसंस्था :**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे धरणे आंदोलन रविवारी तिसऱ्या दिवशीही सुरू आहे. टीएमसी सुप्रीमोंनी निवडणूक आयोगाला 'व्हॅनिश कमिशन' म्हटले आहे. भाजप 'मतदार यादीतून योग्य मतदारांची नावे हटवण्यासाठी व्हॅनिश कमिशनचा गैरवापर' करत असल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणूक आयोगाचे संपूर्ण खंडपीठ राज्य विधानसभा निवडणुकीपूर्वी तयारीचा आढावा घेण्यासाठी कोलकाता येथे येणार असतानाच त्यांची ही टिप्पणी आली आहे.

ममता म्हणाल्या, 'एक देश, एक नेता, एक पक्ष' या वेडात भाजपने जनविरोधी इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक लोकशाही संस्था आणि संवैधानिक पदाला पद्धतशीरपणे शस्त्र बनवले आहे. भाजपचा अंतिम उद्देश बाबासाहेब आंबेडकरांनी तयार



**काय म्हणाल्या ममता ?**

1. ***भाजप नेतृत्व दिल्लीचे जमीनदार आहे. बंगालला आपल्या ताब्यात घेण्याच्या मोहिमेत आम्ही त्यांना कधीही यशस्वी होऊ देणार नाही.***
2. ***धर्मतलामधील आमचे धरणे प्रत्येक बांगला-विरोधी अजेंड्याला उत्तर आहे, जो या राज्यातील लोकांना अपमानित करण्याचा, घाबरवण्याचा आणि त्रास देण्याचा प्रयत्न करतो.***
3. ***भाजपची एकमेव प्राथमिकता सत्ता आहे, पण आमची प्राथमिकता नेहमीच राज्यातील जनता राहिली आहे.***

केलेल्या संविधानाला आपल्या पक्षाच्या जाहीरनाम्याने बदलणे हा आहे, असा दावा बॅनर्जी यांनी केला.

राज्यात स्पेशल इंटेसिव्ह रिव्हिजन मध्ये मतदार यादीतून नावे वगळण्याच्या विरोधात ममतांनी ६ मार्च रोजी दुपारी २ वाजल्यापासून कोलकाता येथील एस्प्लेनेड मेट्रो चॅनलवर धरणे आंदोलन सुरू केले आहे.

### ९० दिवसांचे प्रमाणपत्र बंधनकारक, रोजंदारीवर होतो परिणाम

# नूतनीकरणाच्या अटीमुळे कामगारांमध्ये नाराजी

**चिखली / प्रतिनिधी**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणीकृत बांधकाम कामगारांना दरवर्षी नूतनीकरण करणे बंधनकारक आहे.नोंदणी केवळ एक वर्षासाठी वैद्य असल्याने प्रत्येक वर्षी नव्याने प्रक्रिया पूर्ण करावी लागते.यासाठी किमान 90 दिवस बांधकाम क्षेत्रात काम केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांसाठी ही बाब अडचणीची ठरत असून नाराजी वाढली आहे.

कामगारांना दिवसभर मजुरी करूनही नूतनीकरणासाठी स्वतंत्र वेळ काढावा लागतो.ठेकेदार,ग्रामपंचायत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याकडून कामाचे दाखले घेणे,त्याची पडताळणी करून घेणे आणि नंतर ऑनलाईन अर्ज भरणे या प्रक्रियेत अनेक दिवस खर्च होतात. तांत्रिक अडचणी संकेतस्थळावरील विलंब आणि त्रुटी यामुळे अर्ज प्रलंबित



राहण्याच्या तक्रारी वाढत आहेत. परिणामी अनेक कामगारांची नोंदणी निष्क्रिय होते.नोंदणीची वैधता एक वर्षाऐवजी किमान तीन वर्षे करावी,अशी मागणी होत आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी झाल्यानंतर ती केवळ एका वर्षासाठी वैद्य असते.वैद्यता संपण्यापूर्वी नूतनीकरण करणे बंधनकारक आहे, दरवर्षी 90 दिवस काम केल्याचा दाखला सादर करावा लागतो.नूतनीकरण झाले नाही तर नोंदणी आपोआप निष्क्रिय होते.योजनांचा लाभ थांबतो. दरवर्षी नूतनीकरणासाठी हेलपाटे करावे लागतात.कामगारांना प्रथम काम केलेल्या ठिकाणाहून प्रमाणपत्र द्यावे लागते. त्यानंतर आवश्यक कागदपत्रे गोळा करून सेवा केंद्र किंवा सायबर कॅफेत जाऊन अर्ज भरावा लागतो.काही वेळा संकेतस्थळावर तांत्रिक अडचणी निर्माण होतात.ओटीपी न येणे,कागदपत्रे अपलोड न होणे अशा समस्या वारंवार उद्भवतात. त्यामुळे दोन ते तीन वेळा फेऱ्या माराव्या लागतात. नोंदणी सक्रिय नसल्यास मंडळाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नाही. शैक्षणिक साहाय्य, प्रसूती अनुदान, अपघात सहाय्य, घरकुल अनुदान साधनसामग्री अनुदान आदी सुविधा बंद होतात.

#### कार्यालयातील प्रक्रियेसाठी बुडते मजुरी

तालुक्यात काही खाजगी व्यक्ती नोंदणी व नूतनीकरणासाठी दीड ते दोन हजार रुपये घेत असल्याबाबत तक्रारी समोर येत आहेत.पैसे न दिल्यास अर्ज प्रलंबित ठेवला जातो.अडथळे निर्माण केले जातात,असा आरोप कामगारांकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात कामगारांमध्ये नाराजीचा सूर आहे.रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारासाठी हा मोठा प्रश्न आहे. दिवसभर कामावर गेले तर त्या दिवसाची मजुरी मिळते,मात्र नूतनीकरणासाठी वेळ दिला नाही तर योजनाचा लाभ बंद होतो.

# शिष्यवृत्ती परीक्षेत शिवाजी विद्यालयाची झेप

**चिखली / प्रतिनिधी**

एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत येथील शिवाजी विद्यालयाने आपली उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यावर्षी शाळेचे ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शिक्षकांचे नियमित मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे यशाचा आलेख उंचावला आहे.

केंद्र शासनाच्यावतीने इयत्ता आठवीसाठी दरवर्षी एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते. जिल्ह्यातून अनेक विद्यार्थी परीक्षेत सहभागी होतात. यावर्षी २२ डिसेंबर रोजी ही परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून येथील श्री. शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शाळेत शिकवणी वर्ग घेतले जातात. सर्व शिक्षक सामूहिकरित्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. त्यामुळे दरवर्षी अनेक विद्यार्थी उत्तीर्ण होतात. मेरीटमध्ये आलेले विद्यार्थी शिष्यवृत्तीस



पात्र ठरतात. गेल्या दहा वर्षांत शाळेचे जवळपास दीडशे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यावर्षीच्या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये नम्रता पोफळे, शर्वरी पाटील, प्रथमेश पाटील, श्रेया पाटील, ऋतुजा पाटील, रुद्र लोखंडे, हरी पंडीत, श्रुतिका जैन, प्रणव बोरे, सर्वेश बोन्द्रे, आयुष जाधव, गौरी वाकडे, अमृता सुरडकर, नैतिक सोनुने, गौरव मेव्हणकर, अनिकेत सपकाळ, हर्षल गावंडे,सोहम पाटील, युवराज दांडेकर, ऋतुराज जाधव, तनुश्री चव्हाण, सृष्टी ठेंग, समर्थ खंडागळे, आदित्य वायाळ, अक्षरा परिहार, फरहान हिरीवाले, धीरज डुकरे, अंशिका साळवे, संकेत चव्हाण, आराध्या येवले, यश सोनुने, भक्ती मोरे, पौर्णिमा जाधव, खुशी पिसे, गणेश घुबे, ओमगणेश खंडागळे, सोहम वाकडे, किरण बोरकर, आलिजा देशमुख यांचा समावेश आहे.

#### शिष्यवृत्ती परिक्षेमुळे स्पर्धा परीक्षेचा पाया पक्का

एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत बुद्धिमत्ता चाचणी, विज्ञान, गणित, इतिहास, भुगोल विषयाचे प्रश्न असतात. पात्र विद्यार्थ्यांना १२ हजार रुपये वार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येते. पुढील चार वर्षे म्हणजे नववी, दहावी, अकरावी, बारावीपर्यंत ही शिष्यवृत्ती मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्चास बरीच मदत मिळते. शिष्यवृत्ती परिक्षेमुळे विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षेचा पाया पक्का होतो. शालेय जीवनात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेची गोडी लागल्यास भविष्यात त्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वप्न पूर्ण करण्यास खूप मदत होते, अशी माहिती मार्गदर्शक शिक्षकांनी दिली.

# १०० क्षयरुग्णांना पोषण आहार कीट

**मेहकर / प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकर कार्यक्रमांतर्गत टीबीमुक्त भारत अभियानच्या अनुषंगाने १०० क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. निश्चय किट वाटप करून निक्षय मित्र होण्याचे आवाहन करण्यात आले.राजश्री आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजमध्ये ७ मार्च रोजी हा कार्यक्रम झाला.

माजी आमदार डॉ. संजय रायमुरकर, ऋषी जाधव यांच्या हस्ते क्षयरुग्णांना पोषण आहार कीट वाटत करण्यात आल्या.कार्यक्रमाला जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.वर्षा गुट्टे, वैद्यकीय अधिकारी डॉ.दिनकर खिरोडकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनीता हिवसे,जितेंद्र सावजी, किसन बळी, जयचंद भाटिया, सुदर्शन मगर, बाळु देवकर, डॉ. विजय बलकार, राजश्री आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज प्राचार्य डॉ. सोनल राठी, व्यवस्थापक विजय पांढरे, नितीन इंगळे, सिद्धेश्वर सोळुंकी, राजू मोरे, अविनाश वाघ, गजानन सातव व उपचार घेणारे रुग्ण हजर होते. यावेळी संजय



रायमूलकर यांनी समाजाचे आपण देणे लागतो. त्यामुळे फुल नाही तर फुलाची पाकळी म्हणून समाजातील घटक म्हणून आपण सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे असे सांगितले.

जितेंद्र सावजी यांनी १०० रूग्णांना पोषण आहार किट वाटप करणार असे यावेळी सांगितले. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी नितीन कुलकर्णी, आशिष धातरकर यांनी परिश्रम घेतले. तालुक्यातील आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेवक, समुदाय आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

## डोंगरखंडाळा ग्रामपंचायत कार्यालयात महिला दिन



**बुलढाणा :** तालुक्यातील डोंगरखंडाळा येथील ग्रामपंचायत कार्यालयात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत प्रशासक प्रज्ञा कांबळे गोराडे, ग्रामपंचायत अधिकारी, सिद्धार्थ मोरे, ग्रा.पं. कर्मचारी, अंगणवाडी सेविका, यांच्यासह गावातील महिलांची उपस्थिती होती. महिलांच्या सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक आणि राजकीय यशाचा सन्मान, तसेच महिला सक्षमीकरण आणि हक्कांसाठी जागृती करण्याचा दिवस असून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

# वसंतप्रभा नर्सिंगमध्ये रोगनिदान शिबीर

**बुलढाणा / प्रतिनिधी**

वसंतप्रभा आरोग्य सेवा प्रतीष्ठान अंतर्गत फिजीओथेरेपी कॉलेज व नर्सिंग कॉलेजतर्फे महिलांसाठी जागतिक महिला दिनानिमित्त मोफत रोगनिदान, भौतिकोपचार व जनजागृती शिबीर ८ मार्च रोजी घेण्यात आले.

शिबिराची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. रामकृष्ण म्हस्के व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. वसंतराव चिंचोले यांच्या हस्ते राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या शिबीरामध्ये अर्धांगवायु, चेहऱ्याचा लकवा , स्पाईनल कॉर्ड दुखावल्यामुळे होणारा लकवा, संपूर्ण शरीराचा लकवा, गुडघ्याचा वात, संपुर्ण शरीरातील सांध्याचा वात, खांद्याचा वात, स्पॉंडिलायटीस, मणक्याची झीज होणे, स्लिप डिस्क, मणक्यातील ग्याप कमी होणे, कंबरेपासून पायांच्या बोटांपर्यंत नस लागून येणे, हातापायांत मुंग्या येणे,




दुखणे, जळजळ होणे आणि बधिरपणा वाटणे, पाठ दुखणे, गर्भावस्थेत जाणवणारे पाठीचे, पायाचे दुखणे आणि सिजरनंतर पोटाची जखम आणि पाठीचे दुखणे, लठ्ठपणा कमी करणे , टाकेचे दुखणे, पायाच्या रक्तवाहिन्या दिसणे व सुज येणे, मानेच्या दुखण्यासोबत डोके दुखणे आणि चक्कर येणे, पोटऱ्यांचे नसा लागणे, मान लागुन येणे, खेळामुळे होणाऱ्या व्याधीचे निदान करून मोफत उपचार करण्यात आले.

या शिबिरामध्ये संस्थेचे अध्यक्ष डॉ. शोन चिंचोले, उपाध्यक्ष डॉ. प्रभा चिंचोले, सचिव डॉ. विवेक चिंचोले, डॉ. अस्मिता चिंचोले यांचे मार्गदर्शन लाभले.

## पाककला

– रुपाली गायकवाड
सुप्रसिद्ध कुक तथा सहाय्यक कृषी अधिकारी,
बुलढाणा मो. ९४२२९४३६०५ (वेळ: सायं. ७ ते ९)



### कांदा कैरीची चटणी

**साहित्य :-** एक आंब्याची कैरी सालासकट किसलेली, तीन-चार हिरव्या मिरच्या, मूठभर कोथिंबीर, एक चमचा लाल तिखट, एक चमचा साखर, एक चमचा जिरे पावडर, चवीप्रमाणे मीठ, एक दोन चमचे दाण्याचा कूट, एक मध्यम आकाराचा बारीक चिरलेला कांदा.

**कृती :-** एका मिक्सरच्या भांड्यामध्ये किसलेली कैरी, हिरवी मिरची, तिखट जिरेपूड, साखर, मीठ, कांदा दाण्याचा कूट चवीपुरतं मीठ आणि थोडंसं पाणी घालून जाडसर वाटून घ्या आता एका बाऊलमध्ये काढून घ्या. दुसरीकडे एका छोट्या तडका पॅनमध्ये एक ते दोन चमचा तेल घाला तेल गरम झालं की एक चमचा मोहरी, जिरे, हिंग घालून फोडणी



करून घ्या आता ही खमंग फोडणी वाटून घेतलेल्या चटणीवर घाला. चमच्याने एकजीव करा वरतून थोडीशी बारीक चिरलेली कोथिंबीर घाला अशी ही कच्च्या कैरीची चटपटीत चटणी जेवणाची लज्जत निश्चितच वाढवते.

वरील पाककृतीचे व्हिडीओ Rupalis Food Culture या यूट्यूब चॅनलवर पाहू शकता.




### राशीभविष्य

- **मेष** : प्रवास सुखकर होईल. लोकांचा तुमच्यावरील विश्वास वाढेल. स्वास्थ्य लाभेल.
- **वृषभ** : आरोग्याच्या जुन्या तक्रारी वाढतील. आर्थिक गुंतवणूक योग्य पद्धतीने करा. प्रवास टाळा.
- **मिथुन** : भेटीगाठीत अनुकूलता राहील. प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. आनंदी रहाल. वाहनसौख्य.
- **कर्क** : अनपेक्षित धनलाभ झाल्यामुळे समाधान वाढेल. द्विधा मनस्थिती सुधारेल. विचार ठाम ठेवा.
- **सिंह** : भावंडांचं सहकार्य लाभेल. महत्त्वाचे निर्णय विचाराने घ्यावे. स्थावर प्रश्न सुटतील.
- **कन्या** : व्यवसायात चांगली प्रगती होईल. अनावश्यक खर्च टाळा. नव्या कामांना गती मिळेल. नेतृत्व करा.
- **तूळ** : कार्यक्रमात बदल होतील. अपेक्षित घटना घडतील. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.
- **वृश्चिक** : व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध होईल. योग्य व्यक्तींचं मार्गदर्शन लाभेल. अडचणी दूर होतील.
- **धनु** : व्यवसायात फायदा होईल. नशिबाची चांगली साथ लाभेल. समाजातील प्रतिष्ठा उंचावेल.
- **मकर** : शैक्षणिक क्षेत्रात प्रगती होईल. कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : नोकरीनिमित्त प्रवास घडेल. व्यवसायात स्थिरता लाभेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.
- **मीन** : जनसंपर्कातून फायदा होईल. नवे प्रकल्प राबवा. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यश मिळेल.

### ९ मार्च — दिनविशेष

- **२०१३** : पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती दर्ग्याला भेट दिली.
- **२०१४** : 'मनसे'ने आगामी लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला.
- **२०१६** : प्रचंड रकमेचा घोटाळा करणारे विजय मल्ल्या देश सोडून गेल्याची माहिती सरकारने उच्च न्यायालयात दिली.
- **२०१८** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. पतंगराव कदम यांचं निधन.

### ज्ञान–विज्ञान: 'स्पेस बेबीज' ची तयारी

१९६१ मध्ये मानव पहिल्यांदा अंतराळात गेला. तेव्हापासून प्रत्येकाच्या मनात प्रश्न आहे की, मुले अंतराळात जन्माला येतात का? जगभरातील शास्त्रज्ञांना ६२ वर्षांनंतरही हे गूढ उकलू शकलेले नाहीत. तथापि, ब्रिटन आणि नेदरलँडचे शास्त्रज्ञ लवकरच या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतात. 'आयव्हीएफ' उपचाराने अंतराळात मुले जन्माला येतील.



ब्रिटिश शास्त्रज्ञ डच कंपनी 'स्पेसबॉर्न युनायटेड'च्या सहकार्याने 'असिस्टेड रिप्रोडक्शन टेक्नॉलॉजी इन स्पेस' (एआरटीआयएस) मॉड्यूल बनवत आहेत. या अंतर्गत अंतराळात जैव उपग्रह पाठवण्यात येणार आहे. याच्या आत 'इन–व्हिट्रो फर्टिलायझेशन' (आयव्हीएफ) उपचाराद्वारे गर्भाचा जन्म होईल. ते पृथ्वीवर आणून स्त्रीच्या गर्भात हस्तांतरित केले जाईल. पृथ्वीवर जन्माला आलेल्या या मुलांना 'स्पेस बेबीज' म्हटले जाईल. 'स्पेसबॉर्न'चे संस्थापक डॉ. एगबर्ट एडेलब्रोक म्हणतात, की या प्रकल्पाचा अंतिम उद्देश पृथ्वीच्या बाहेर नैसर्गिकरित्या मुले निर्माण करणे हा आहे; मात्र त्याआधी अवकाशात सध्याच्या तंत्रज्ञानाची चाचणी घ्यायची आहे. यानंतरच अंतराळात सेक्स, गर्भधारणा आणि प्रसूतीवर लक्ष केंद्रित केले जाईल. या प्रकल्पासाठी पहिला प्रयोग उंदरांवर केला जाणार आहे. त्यांचे शुक्राणू आणि अंडी अंतराळात फलित होतील. मॉड्यूलच्या तंत्रज्ञानाची चाचणी घेणारे पहिले उड्डाण एप्रिलमध्ये कॅनडातून उड्डाण करेल.

### स्मार्ट टिप्स: स्मार्टफोन हरवला तर...

✻ तुमचं जीमेल खातं ज्या स्मार्टफोन्समध्ये लॉग इन करण्यात आलं असेल त्याची यादी इथे दिसेल.

✻ या यादीतून लॉक पासवर्ड विसरलेल्या स्मार्टफोनची निवड करा. इथे तुम्हाला लॉक युवर फोनचा पर्याय मिळेल. त्यावर क्लिक केल्यावर नविन पासवर्ड किंवा पिन क्रमांक नोंदवावा लागेल. यामुळे तुमचा फोन आपोआप लॉक होईल. दुसरं कोणी तो ओपन करू शकणार नाही.

✻ इथून फोनच्या जी मेल खात्यातून तुम्ही लॉग आउट करू शकता तसंच फोनमधला डाटाही डिलिट करता येईल.

✻ फोनमधल्या डाटाचा गुगल ड्राईव्ह किंवा इतर ठिकाणी बॅक अप घेऊन ठेवा. स्मार्टफोन व्यतिरिक्तही दुसऱ्या ठिकाणी महत्त्वाची माहिती सेव्ह करून ठेवायला हवी.

### सौंदर्यसाधना: केस चमकदार होण्यासाठी...

म्हणूनच वरचेवर वाफ दिल्याने त्वचा स्वच्छ होईल आणि जास्त शँपू लावावा लागणार नाही. मात्र शँपूनंतर केसांना कंडिशनर लावा. यामुळे उघडलेली छिद्रं बंद होतील आणि त्यात धूळ जाणार नाही.

वाफ दिल्यामुळे केस चमकदार आणि मुलायम होतात. कोरड्या, निस्तेज केसांची कोणतीही स्टाईल करता येत नाही. पण वाफ दिल्यानंतर केसांमध्ये आर्द्रता टिकून रहात असल्याने तुम्ही केसांची हवी ती स्टाईल करू शकता.

केसांना वाफ देण्यासाठी पार्लरमध्ये स्टीमरचा वापर केला जातो. तुम्ही घरच्या घरीही वाफ देऊ शकता. यासाठी पाणी गरम करून घ्या. त्यात स्वच्छ टर्किश टॉवेल दोन मिनिटं बुडवून ठेवा. तो बाहेर काढा. टॉवेलमधलं पाणी त्याच भांड्यात निथळू द्या. पाणी निथळल्यानंतर टॉवेल डोक्यावर बांधून घ्या. यामुळे केसांना वाफ मिळेल. ही प्रक्रिया आठवड्यातून एकदा करा. नियमित वाफ दिल्याने तुमचे केस छान चमकादार होतील.

### पंचांग

**सोमवार, ९ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
फाल्गुन कृ. ६, चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : विशाखा, योग : व्याघात,
सूर्योदय ६.५४, सूर्यास्त ६.४५

### फॉरवर्ड्स

**मतलब क़ी हद क़्या पूछते हो साहब...**

**यहाँ फूलों क़ो भीं मतलब से इज्ज़त दी जाती हैं...!**

### वेगळ्या वाटा

✻ इंग्रजीवर प्रभुत्त्व असेल तर या भाषेच्या अध्ययनाचं काम करता येईल. रशियन, मँडरिन, कोरियन अशा भाषा शिकून दुभाषा होता येईल. विविध देशांमध्ये इंग्रजीच्या शिक्षकांना मागणी असते. या निमित्ताने तुम्ही भरपूर फिरू शकता.

✻ बऱ्याच कंपन्यांमध्ये ट्रॅव्हल रायटरचं पद असतं. यासोबतच तुम्ही ट्रॅव्हल ब्लॉग सुरू करू शकता. प्रवासाशी संबधित मासिकं तसंच वृत्तपत्रांना लेख पाठवू शकता. छंद म्हणूनही तुम्ही हे लेखन करू शकता.

### भटकंती: लुटा कॅम्पिंगचा आनंद

पाच दिवस भरपूर काम केल्यावर सुट्टीच्या दिवशी एखाद्या रमणीय ठिकाणी भटकण्याची मजाच काही वेगळी. हा आनंद द्विगुणीत करण्यासाठी तुम्ही कॅम्पिंगही करू शकता. नव्या उत्साहाने आठवड्याची सुरूवात करण्यासाठी खालील काही ठिकाणी दोन दिवस घालवाच.



✻ ठाण्यातला तानसा तलाव एक ऑफ बीट ठिकाण आहे. शहरातल्या प्रदूषणापासून लांब असणाऱ्या तानसाच्या किनारी तंबू ठोकून तुम्ही निवांत क्षण अनुभवू शकता. निसर्गाच्या इथल्या निसर्गाच्या सानिध्यात रममाण व्हाल. ✻ लोणावळ्यापासून दहा किलोमीटर अंतरावर शिरोता तलाव आहे. इथे तुम्ही वन्य जीवन अनुभवण्यासोबतच ट्रेकिंगचा आनंद घेऊ शकता. रात्री कॅम्प फायरचा अनुभवही घेता येईल. ✻ इगतपुरीजवळ भंडारदरा हे ठिकाण आहे. पावसाळ्यात इथल्या धबधब्याखाली भिजण्याची मजाच वेगळीच. इथे तुम्ही मौजमस्ती करू शकता. इथल्या तलावाजवळ तंबूत राहण्याची व्यवस्था आहे. इथून नाशिकलाही जाता येईल. ✻ पवना तलाव छोट्या ब्रेकसाठी उत्तम ठिकाण. इथल्या हिरव्यागार मैदानात तंबूत राहणं म्हणजे स्वर्गीय सुखच. तिकोना, लोहगड, तुंग हे किल्लेही परिसरात आहेत.

### खेचाखेची

**संशय**

संशय घ्यायला काहीच मर्यादा नसते.

मी ऑफिसमधून घरी येत होतो आणि शेजारीण माहेरून. दोघेही गल्लीत सोबतच आलो.

.

.

.

लगेच बायकोचा प्रश्न, आणायला गेला होतात का?

### वेगळं काही

अमेरिकेतल्या वरमोंटमधल्या 'फेअर हेवन' शहरात एक बकरा महापौर बनला. गंमत म्हणजे इथे महापौरपदासाठी निवडणूक झाली. या बकऱ्यासोबतच इतर १५ प्राणी उमेदवार होते. अवघ्या तीन वर्षांचा लिंकन नावाचा बकरा या शहराच्या महापौरपदी विराजमान झाला. फेअर हेवन या शहराची लोकसंख्या अवघी अडीच हजार आहे. महापौरपदासाठी इथे १५ प्राणी रिंगणात होते. लिंकनला सॅमी नावाच्या कुत्र्याने जोरदार टक्कर दिली. पण लिंकनच वरचढ ठरला. प्राणी महापौरपदी असल्यामुळे इथल्या कामकाजाची जबाबदारी प्रबंधक जोसेफ गंटर यांनी सांभाळली. पण महत्त्वाच्या सरकारी कार्यक्रमांमध्ये लिंकनची उपस्थिती गरजेची असेल.

### मंथन: गरज विचार बदलण्याची

आहेराच्या देवाणीघेवाणीविरुद्ध असणाऱ्या वामनरावांनी आपल्या मुलीच्या म्हणजेच जुईच्या लग्नात नातेवाईकांनाही आहेर केले नाहीत आणि आपल्यालाही आणू नयेत असं सांगितलं. त्यांचं म्हणणं योग्यच होतं. लग्नात पाहुण्यांनी अगत्यानं येणं, शुभाशीर्वाद देणं महत्त्वाचं असतं. आहेर घेणं म्हणजे आपण केलेल्या सरबराईचं मोल वसूल करून घेतल्यासारखं त्यांना ते वाटत होतं. त्यांचा लांबचा मामेभाऊ सहसा अशा कोणत्याच समारंभांना जात नसे.



इतरांनी आणलेल्या महागड्या आहेरांसमोर आपला आहेर नगण्य दिसत असल्यामुळे त्याला ओशाळल्यासारखं वाटत असे. परंतु या लग्नात तो उत्साहानं सहभागी झाला. अनेक लोक आले आणि जुईला मनापासून आशीर्वाद आणि शुभेच्छा देऊन गेले. खरोखरच किती योग्य निर्णय होता तो! अन्यथा अनेक लग्नं मानपानावरूनच लक्षात राहतात. सुखी संसारातील हे किल्मिष नंतर कायमच दोघांच्या सुखात अडथळा बनून पुढे येत राहतं. पैसा किंवा दागदागिने अगर मानपान यांच्या क्षणिक मोहापायी सुंदर आयुष्यात आणि संसारात असा मीठाचा खडा टाकणाऱ्या या प्रथा आपण का पाळाव्यात असा विचार आताच्या पिढीनं जरूर केला पाहिजे.

दैनिक महाभूमि
सोमवार । ९ मार्च २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# बुलढाणा भूमि

**सोने-चांदी**

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) १५१५००
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) १५२५००
चांदी (प्रति किलो) ३०२०००

**दखल...**

### महिलांचे मनोगत

बळी तो कान पिळी
ही पशुंची प्रवृत्ती
समाज हितासाठी
घातक ही विकृती ....

असहाय महिलांना हेरून
नराधम करती बलात्कार
जलदगती न्यायालय यांना
फासावर कधी लटकवणार ?

चामडी यांची सोला
त्यावर चोळा मिठ
चौकात लटकवा फासावर
जगाला पाहू द्या निट ...

**न्यूज ब्रीफ**

### दुचाकींची धडक; दोनजण ठार

**बुलढाणा :** चिखली ते बुलढाणा मार्गावर दोन दुचाकींमध्ये झालेल्या भीषण अपघातात दोघे दुचाकीस्वार ठार झाल्याची घटना बुलढाणा ते चिखली मार्गावरील हातणीजवळ ७ मार्चच्या सायंकाळी घडली.
मेहकर तालुक्यातील मोसंबेवाडी येथील रहिवासी दत्तात्रय वाघ वय ३४ हे दुचाकीने हातणीमार्गे चिखली-बुलढाणा रोडवरून प्रवास करीत होते. तर बुलढाणा येथील रहिवासी सुमित तेलरकर हे वरुड नाका येथून बुलढाणाकडे परत येत होते. हातणी गावाजवळ दोघांच्या दुचाकींची समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघातात दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सुलतानपूर :** येथील एका युवकाने कालव्याजवळील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. दत्तात्रय भिमराव दळवी (२४) असे मृतक युवकाचे नाव आहे. शनिवारी सकाळी सुमारे साडेदहा वाजण्याच्या सुमारास गावालगतच्या कालव्याजवळील झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. दत्तात्रय हा शांत स्वभावाचा युवक असल्याचे ग्रामस्थ सांगतात. त्याचे वडील भीमराव दळवी हे धार्मिक प्रवृत्तीचे असून, कुटुंबातील एकुलता एक मुलगा असल्याने या घटनेने आई-वडिलांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृतकाच्या पश्चात वृद्ध आई-वडील आणि एक बहीण असा परिवार आहे.

**महिन्यात १२ सुट्या : बँकेच्या कामकाजावर होणार परिणाम**

# मार्चएंड अन् सुट्ट्यांचा धडाका!

**बुलढाणा/प्रतिनिधी**




मार्च महिन्यात बँकांना कामाचा अतिरिक्त ताण असतो. त्यातच या महिन्यात १२ सुट्या आल्याने कामकाजावर परिणाम होणार असल्याचे चित्र आहे. सुट्यांचा आनंद घेता येणार असला तरी बँक कर्मचाऱ्यांवर कामाचा बोजा पडणार आहे.

मार्च एंड हा शब्द आपण दैनंदिन जीवनात अनेकवेळा ऐकतो. बँक क्षेत्रात कार्यरत असलेल्यांना याबाबत माहिती असते. सामान्य व्यक्तींना मात्र फारसे कळत नसले तरी सुद्धा मार्च एंड शब्दाचा वापर करतात. मार्च हा आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना असल्याने बँकिंग कामासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो; मात्र याच महिन्यात अनेक महत्त्वाचे सण आले आहेत. होळीनिमित्त (धुलिवंदन) बँकांना सुटी होती, तर गुढीपाडवा, रमजान यांसारखे मोठे सण-उत्सव याच महिन्यात आले आहेत. साप्ताहिक सुट्टयांमुळे १२ दिवस बँकांचे कामकाज बंद राहणार आहे. सलग सुट्टया आल्यामुळे आर्थिक व्यवहार रखडण्याची शक्यता नाकारता येत नाही. चेक क्लिअरन्स, नवीन खाते उघडणे आणि इतर बँक व्यवहारांसाठी नागरिकांची गैरसोय होऊ शकते. मार्च महिन्याची सुरुवात म्हणजे १ मार्च रोजी रविवार आला होता. रविवारी साप्ताहिक सुटी असते. ३ मार्च होळीनिमित्त सुटी होती. ८ मार्च रविवार, १४ मार्च दुसरा शनिवार, १५ मार्च रविवार, १९ मार्च गुढीपाडवा, २१ मार्च रमजान ईद, २२ मार्च रविवार, २६ मार्च श्रीराम नवमी, २८ मार्च चौथा शनिवार, २९ मार्च रविवार तर ३१ मार्च रोजी महावीर जयंतीची सुटी आहे.

कर भरणा, गुंतवणूक आणि बँकिंग कामांसाठी या महिन्यात अधिक गर्दी असते. त्यातच १२ दिवस बँका बंद राहणार असल्याने व्यापाऱ्यांची अडचण होणार आहे. रोकड जमा करणे आणि धनादेश वटवणे यासाठी जास्त वेळ लागू शकतो. सलग सुट्टयांमुळे चेक क्लिअर होण्यास विलंब होऊ शकतो. परिणामी व्यापाऱ्यांचे आर्थिक चक्र विस्कळीत होण्याची शक्यता आहे. मार्चअखेर असल्याने प्राप्तिकर किंवा इतर सरकारी देयके भरण्यासाठी शेवटच्या तारखेची घाई होऊ शकते. नवीन खाते उघडणे किंवा कर्जाचे प्रस्ताव मंजूर होण्यास अधिक वेळ लागू शकतो. सलग सुट्टयांमुळे अनेक भागांत एटीएममधील रोकड संपण्याची शक्यता नाकारता येत नाही. गृहकर्ज किंवा इतर कर्जाचे प्रस्ताव सुट्ट्यांमुळे लांबणीवर पडू शकतात. बँकांचे प्रत्यक्ष कामकाज बंद असले तरी नेट बँकिंग, मोबाइल बँकिंग आणि यूपीआय सेवा, २४ तास सुरू राहतील, अशी माहिती सूत्रांनी दिली.

**शेतकरी कर्जमाफीची कामे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याची घोषणा केली. पीक कर्ज देण्याचा अधिकार असलेल्या बँकांतून कर्ज घेतलेल्या सर्वच शेतकऱ्यांना सरकारच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ होणार आहे. सर्वच बँकांचे पीक कर्ज माफ होणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. त्यामुळे या महिन्यात बँक प्रशासनाला कर्जमाफी प्रकरणांची कामे उरकावी लागणार आहे.

> *बँक कामकाजाचे दैनंदिन नियोजन केलेले असते. मार्च महिन्यात कामे अधिक असतात; मात्र हा कामाचा भाग आहे. बँकेत येणाऱ्यांचे काम वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न असतो.*
> - **वैभव राठोड,** *सहाय्यक व्यवस्थापक युनियन बँक*

# संगम चौकात 'द बर्निंग टू व्हिलर'चा थरार



**बुलढाणा/प्रतिनिधी**

शनिवारच्या रात्री ११ वाजेदरम्यान शहरातील मुख्य चौक असलेल्या संगम चौकात 'द बर्निंग टू व्हिलर'चा थरार अनुभवयाला मिळाला. ही दुचाकी जळाली की जाळली? याबाबतचा तपास शहर पोलीस करीत आहेत. मात्र ज्याची दुचाकी जळाली ते देऊळघाट येथील जब्बार खान गफ्फार खान यांनी अज्ञातांनी आपल्या अंगावर पेट्रोल टाकून दुचाकीसह जाळण्याचा प्रयत्न केल्याचा दावा केल्याने खळबळ उडाली आहे.

संगम चौकात घडलेल्या या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस स्टेशनचे कर्मचारी व नगर परिषदेचे अग्नीशमन दलाचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांनी क्षणार्धात आग विझविली. परंतु दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाली होती केवळ सांगाडा उरला होता.

या घटनेने शहरात खळबळ उडाली होती.

# सैलानी यात्रेत व्यापाऱ्यांवर आर्थिक संकट!

**दीड महिना चालणारी यात्रा आली पंधरा दिवसांवर**

**गणेश मोरे**

**पिंपळगाव सराई :** सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेल्या सैलानीबाबांची सैलानी येथील यात्रा विदर्भातील सर्वात मोठी यात्रा म्हणून गणल्या जाते. या यात्रेमध्ये राज्यातील नव्हे तर देशभरातील श्रध्दाळू मोठ्या संख्येने सहभागी होतात. व्यापारीही मोठया प्रमाणात विविध दुकाने थाटतात. यात्रेदरम्यान करोडो रूपयांची आर्थिक उलाढाल पाच वर्षांपूर्वी होत होती. मात्र, गेल्या काही वर्षात कोरोनाचे संकट व आता मागील तीन वर्षांमध्ये यात्रेदरम्यान पवित्र रमजान महिना येत असल्याने व्यापाऱ्यांवर आर्थिक उलाढालीचे संकट ओढावले आहे.

नारळाच्या होळीपासून सैलानी यात्रेला सुरूवात होते. पूर्वी दीड ते दोन महिने ही यात्रा चालत असे; मात्र मागील पाच वर्षात कोरोना संकट तर या तीन वर्षांमध्ये रमजान आणि सैलानी यात्रा सोबत आल्याने या यात्रेमध्ये थांबणारे व खरेदी करणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले त्यामुळे ही यात्रा दर्शनी यात्रा होत आहे. ग्रामीण व्यावसायिकावर सुद्धा याचा परिणाम दिसून येत आहे. पूर्वी सैलानी यात्रेत येणारे भाविक आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून सैलानी



येथे चिल्ला (चाळीस दिवस) पूर्ण करण्यासाठी मुक्कामी थांबायचे. विशेष म्हणजे ही यात्रा लग्नसराईच्या तोंडावर यायची त्यामुळे या यात्रेतून कपडे, लग्नामध्ये लागणारे भांडे, खेळणी, संसार उपयोगी साहित्य अशा वस्तूंची खरेदी व्हायची. सैलानी यात्रेसाठी आजूबाजूच्या ग्रामीण भागातील लोक कोणी पाण्याचा व्यवसाय तर कोणी पाणी बॉटल, पाणी पाऊच, पान टपरी सोबतच खिळे, बिबे,लिंबू, हार, गलफ, ऑटो लहान मोठी वाहने अशा सर्वांचा व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणात चालायचा काही काहींची तर वर्षाची कमाई सैलानी यात्रेतून व्हायची मात्र २०२० पासून या यात्रेला अवकळा आली. सैलानी यात्रा ही दर्शनी यात्रा म्हणून अनुभवयास येत आहे.

# रूपाली आत्महत्या प्रकरणातील आरोपीला अटक करा

**कुटूंबियांचे जिजामाता प्रेक्षागार मैदानावर उपोषण**

**बुलढाणा/प्रतिनिधी**

प्रेमाच्या आणाभाका घेऊन ऐनवेळी लग्नास नकार दिल्याने व्यथित झालेल्या रूपाली रामदास सरकटे या युवतीने आत्महत्या गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेला दीड महिना उलटूनही या प्रकरणातील आरोपी युवकास अटक करण्यात आली नाही. त्याला अटक करावी व रूपालीला न्याय द्यावा , या मागणीसाठी रविवारपासून मृतक रूपालीच्या कुटूंबियांनी जिजामाता प्रेक्षागार मैदानावर



उपोषण सुरू केले आहे.

पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे आरोपी दीड महिन्यापासून मोकाट फिरत आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. आरोपी तन्मय विजय गवई रा. पाटोदा, ता. चिखली याला तात्काळ अटक करून न्याय मिळवून द्यावा, या मागणीसाठी उपोषण सुरू करण्यात आले आहे. या उपोषणाला ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते समाधान ताजने, संदीप हिवाळे यांनी कुटुंबियांची भेट घेऊन रूपालीला न्याय मिळाला पाहिजे, यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाकडे मागणी केली.

# महिला दिनानिमित्त करवंड येथे महिला बचत गट सन्मान मेळावा

**चिखली/प्रतिनिधी**

स्वराज्यासाठी आपल्या कुटुंबासह सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या राणी गुणवंताबाईंच्या पावन भूमीत, जागतिक महिला दिनाच्या मुहूर्तावर महिला बचत गट सन्मान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. करवंड महोत्सव कृती समितीच्या वतीने आयोजित या मेळाव्याच्या प्रमुख पाहुण्या म्हणून चिखली विधानसभेच्या आमदार श्वेता महाले उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना आमदार श्वेता महाले म्हणाल्या, ''बचत गट चळवळ ही ग्रामीण महिलांच्या जीवनात खऱ्या अर्थाने क्रांती घडवून आणणारी ठरली आहे. या चळवळीमुळे महिलांना आर्थिक स्वावलंबनाची वाट गवसली. घरापुरत्या मर्यादित असलेल्या महिला आज व्यवसाय, बचत आणि उद्योगाच्या क्षेत्रात पुढे येत आहेत. हेच या चळवळीचे मोठे यश असल्याचे त्यांनी सांगितले. या मेळाव्यात करवंड महोत्सव समितीच्या वतीने आमदार श्वेता महाले यांच्यासह उपस्थित सर्व महिला बचत गटांच्या सदस्यांचा राणी गुणवंताबाई यांची प्रतिमा व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यावेळी अंजली अजय रिंढे हिचा महाराष्ट्र बँकेमध्ये सिलेक्शन झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास बाबाराजे इंगळे, अरविंद देशमुख, अण्णासाहेब म्हळसणे, राधा कापसे, प्रा. विजय घ्याळ, सचिन गरड, प्रदीप राजे जाधव, विनोदराजे जाधव, रवी इंगळे, अजय रिंढे, अनिल सपकाळ यांच्यासह महिला बचत गटांच्या सदस्या सहभागी झाल्या होत्या.

# टिटवी येथील समाधान शिबिराला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**शारा/प्रतिनिधी**

लोणार तालुक्यातील टिटवी येथे रविवार ८ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर पार पडले. या शिबिराला गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार भूषण पाटील, नियोजन समितीचे प्रमुख मंडळ अधिकारी विजय पोफळे, नायब तहसीलदार परळीकर, डोळे, इप्पर उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी महसूल विभाग,पंचायत समिती,आरोग्य विभाग, स्टेट बँक, भूमी अभिलेख विभाग, पोस्ट विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. या शिबिरात मंडळ अधिकारी विजय पोफळे



यांनी टिटवी येथील जिल्हा परिषद शाळेच्या स्नेहसंमेलनासाठी २२००० हजार रु निधी तसेच विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमामध्ये सामाजिक कार्यकर्ते भगवान कोकाटे व ज्ञानेश्वर चिभडे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. जि. प.मराठी प्राथमिक शाळेच्यावतीने आयोजित रांगोळी व निबंध स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमात सर्पमित्र विनय कुलकर्णी यांनी सापांच्या जाती व सर्पदंश झाल्यानंतर घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.जिवंत सातबारा मोहीम, सिद्धापत्रिका वाटप व कृषी विभागाच्या लाभार्थ्यांना सातबारा व शिधापत्रिका उपविभागीय अधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आल्या. सूत्रसंचालन महसूल अधिकारी मंदार तनपुरे यांनी केले.

# ८७ वर्षीय आजी ठरल्या क्रमांक १ च्या रनर

**जिद्दीपुढे वय हारले..**

**बुलढाणा/प्रतिनिधी**

कोणतेही ध्येय साध्य करायचे असेल तर, जिद्द व चिकाटी महत्वाची आहे. महिला दिनाच्यानिमित्ताने ज्ञानगंगा फॉरेस्ट रनर्स व रणरागिनी ग्रुपच्यावतीने महिलांसाठी आयोजित धावण्याच्या स्पर्धेमध्ये जिद्दीपुढे वय हारल्याचा प्रत्यय आला. ८७ वर्षीय आजीने धावण्याच्या स्पर्धेत ५ किलोमिटरचे अंतर पूर्ण करून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांच्या या यशाने वयाचे गाऱ्हाणे मांडणारांसमोर मोठा आदर्श निर्माण केला आहे.

महिला दिनानिमित्त ज्ञानगंगा फॉरेस्ट रनर्स व रनरागिनी ग्रुप यांच्या सयुक्त विद्यामानाने वुमन रन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत डॉ रविंद्र सुरुशे



यांच्या आई ८७ वर्षीय कमलबाई सुरुशे यांनी ५ किमी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाने रन पूर्ण केला. नियमित फिरणे, दररोज योगा करणे, प्राणायाम करणे ही त्याची दररोजची दिनचर्या आहे. रन रागिणी ग्रुपच्या मुख्य संचालिका डॉ अश्वीनी जाधव तसेच ज्ञानगंगा फॉरेस्ट रनर ग्रपच्या सर्व सदस्यांनी त्यांना मेडल देऊन त्यांचा सत्कार केला. या कार्यामुळे नविन पिढीसाठी त्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.

**इम्प्रोस्टमेंट कॅमेरा, स्पीड डिस्प्ले, ३६०डिग्री फिरणारा कॅमेरा**

# समृद्धी महामार्ग बनणार 'सुपर कम्युनिकेशन हायवे'

**डोणगाव/प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा मार्ग राजधानी ते उपराजधानी दरम्यान अकरा जिल्ह्यांना जोडतो विशेष म्हणजे जागतिक दर्जाचा हा महामार्ग असून या महामार्गावर प्रवाशांसाठी अत्याधुनिक सोयीसुविधा मिळाव्या यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नरत आहे. सद्या या महामार्गावर ग्रँटी उभारण्याचे काम सुरू आहे. येत्या काही महिन्यांमध्ये हे काम पूर्ण होताच हा महामार्ग 'सुपर कम्युनिकेशन हायवे' बनणार आहे. या महामार्गावर धावणारी वाहने कॅमेऱ्याच्या नजरेआड होणार नाहीत. या मार्गाच्या लेनवर चालणाऱ्या वाहनांना




निर्धारित स्पीड नुसारच चालावे लागेल अन्यथा वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

७०१ किलोमिटरच्या समृद्धी महामार्गावर मुंबई कॉरिडॉर व नागपूर कॉरिडॉर दोन्ही बाजूने प्रत्येकी एक किलोमीटर अंतरावर १२ मिटर उंचीच्या खांबावर ३६० डिग्री फिरणारा कॅमेरा लावल्या जाणार असून मुंबईकडून निघालेले वाहन त्याच्या गंतव्यापर्यंत कॅमेऱ्याच्या नजरेआड होणार नाही, संशयित वाहन किंवा अपघात करून फरार होण्याचा प्रयत्न करणारे वाहन किंवा ज्या वाहनावर नजर ठेवायची आहे असे वाहन समृद्धीच्या नजरेतून सुटणार नाही त्यामुळे अपघात कोणी केला? कसा केला? का झाला? याची माहिती तिसऱ्या डोळ्यातून समृद्धी प्रशासनाला मिळणार आहे. समृद्धी महामार्ग हा सुपर कमुनिकेशन मार्ग म्हणून ओळखला जाणार असून दर पाच किमी अंतरावर आपातकालीन मदतीसाठी एसओएस इमर्जन्सी कॉल बॉक्स राहणार आहे. समृद्धी महामार्गावर येत्या काही दिवसांमध्ये प्रवाशांना सर्व सुविधा उपलब्ध होतील त्या अनुषंगाने लोखंडी स्ट्रक्चर ग्रँटी उभी करून त्यावर विविध सूचनासाठी डिस्प्ले तर स्पीड मोजण्यासाठी कॅमेरे दिसणार आहेत.

**मुंबई व नागपूर कॉरिडोरवर १४० ग्रँटी**

अनेकांकडून ग्रँटी म्हणजे काय? असा प्रश्न विचारला जात आहे. प्रत्येक १० किलोमिटरवर १ ग्रँटी असणार आहे. मुंबई कॉरिडोरवर ७० व नागपूर कॉरिडोरवर ७० अशा एकूण १४० ग्रँटी उभारल्या जाणार आहेत. त्यावर स्पीड डिटेक्शन कॅमेरा बसविला जाणार आहे. ज्या लेनवर चालत आहात त्या लेनच्या निर्धारित वेगापेक्षा जास्त वेग असणाऱ्या वाहनांना डिटेक्ट करून त्यावर दंड आकारल्या जाणार तर दर २० किमी अंतरावर ग्रँटी असणार स्पीड डिस्प्ले राहणार त्या डिस्प्लेमध्ये वाहनाची गती कळणार आहे.

Vidarbha Shikshan Prasarak Mandal Khamgaon.
**LATE ADV. SHANKARRAOJI BOBDEY DNYAN MANDIR, KHAMGAON**
G.S.College Campus Nandura Road, Khamgaon. Contact:-8329580520

**WANTED TEACHERS For the session 2026-27**

| Sr.No. | Subject | Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | English | Asst. Teacher | B.A./M.A./B.Ed |
| 2 | Marathi | Asst. Teacher | B.A./M.A./B.Ed |
| 3 | Hindi | Asst. Teacher | B.A./M.A./B.Ed |
| 4 | Sanskrit | Asst. Teacher | B.A./M.A./B.Ed |
| 5 | Science | Asst. Teacher | B.Sc./M.Sc./B.Ed |
| 6 | Computer | Asst. Teacher | B.Sc./M.Sc./B.Ed/B.E./M.C.A. |
| 7 | Social Studies | Asst. Teacher | B.A./M.A./B.Ed |
| 8 | Maths | Asst. Teacher | B.Sc./M.Sc./B.Ed./BE/M.C.A. |
| 9 | Drawing | Asst. Teacher | B.A./M.A./A.T.D. |
| 10 | Physical Education | Sport Teacher | B.A./M.A./B.P.Ed/M.P.Ed |

- Preference will be given to experienced teachers.
- Experienced candidates will be preferred.
- English communications skill must be good.
- Send your resume with attested Xerox copies within 10 days From the date of advertisement.

Dr. Prashant N. Bobdey **President**
Sau. Jyoti Samir Akhare **Principal**

# तेल किती दिवस पुरणार ?

मध्य पूर्वेत मोठा तणाव निर्माण झाल्यामुळे त्याचा थेट परिणाम हा इंधन पुरवठ्यावर झाला आहे. या युद्धामुळे इंधन टंचाईची भीती व्यक्त होत आहे. जगात असे अनेक देश आहेत, ज्यांना इंधनाच्या स्वरुपात या युद्धाची मोठी झळ पोहोचली आहे. त्यामध्ये भारताचा देखील समावेश आहे. पेट्रोल, डिझेलचे दर वाढणार, पेट्रोल-डिझेल महाग होणार, त्यातच इंधनाचा तुटवडा निर्माण होणार अशा चर्चा सध्या वाऱ्यासारख्या पसरल्या आहेत. त्यात कितपत तथ्य आहे? हे कोणाला माहित नसले तरी प्रत्येक जण पेट्रोल-डिझेलच्या खरेदीसाठी पेट्रोल पंपावर मोठी रांग लावताना दिसत आहे. अमेरिका, इस्त्रालय आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाची झळ भारताला देखील काही प्रमाणात पोहोचली आहे. पाकिस्तानला तर मोठा दणका बसला असून, पाकिस्तानमध्ये पेट्रोलचे दर प्रति लिटर मागे तब्बल ६० रुपयांनी वाढवण्यात आले आहेत. दरम्यान भारताला इंधन टंचाईचा फटका बसू नये यासाठी भारताने मोठा निर्णय घेतला आहे. भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. रशियाने देखील भारताला कच्च्या तेलाचा पुरवठा करण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे भारतात पुढे काही दिवसाने निर्माण होणारी इंधन टंचाई दूर होण्याची शक्यता आहे. अमेरिकेने युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताला रशियाकडून ३० दिवस कच्च तेल खरेदी करण्याची सूट दिली आहे. अमेरिकेने ३० दिवसांची मुभा दिली मात्र त्यानंतरही गरज असेल तर रशियाकडून तेलाची खरेदी सुरूच राहील असेही भारताने म्हटले आहे. रशियाने भारताला कच्च्या तेलाचा पुरवठा करण्याची तयारी दर्शवली असल्याने युद्धाच्या पार्श्वभूमीवर हे महत्त्वाचे आहे. मात्र पूर्वी कच्च्या तेलाच्या किंमतीवर भारताला रशियाकडून मोठी सूट देण्यात येत होती. आता ही सूट मिळणार मिळणार नसेल तर भारतातही इंधनाचे दर वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारताला आता कच्च्या तेलाच्या खरेदीसाठी अधिक किंमत मोजावी लागण्याची शक्यता आहे. फेब्रुवारीमध्ये रशियाकडून भारताला तेलाच्या खरेदीमध्ये प्रती बॅरलमागे तब्बल १३ डॉलरची सूट देण्यात आली होती. मात्र आता ही सूट मिळणार नसून कच्च तेल अधिक किंमतीने खरेदी करावे लागणार आहे. हे तेल मार्चच्या शेवटी किंवा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात भारतीय बंदरांमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतात तेल आणखी किती दिवस पुरणार? हा प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे. पेट्रोल-डिझेलची टंचाई निर्माण होण्यापूर्वीच यावर केंद्राकडून योग्य पाऊल उचलणे गरजेचे आहे. इंधन टंचाई निर्माण होण्यापूर्वीच केंद्र सरकारने पर्यायी देशांकडून तेल खरेदी, तेल साठा वाढवणे आणि इंधन बचतीसाठी ठोस उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांनीही पेट्रोल-डिझेलची खरेदी आवश्यकतेनुसारच करावी तसेच वाहनांचा अनावश्यक उपयोग टाळणे गरजेचे आहे. जेणेकरून भारतात पेट्रोल-डिझेलचा प्रश्न पेटणार नाही!

# बँकिंगचा 'डिजिटल' अवतार आणि ग्राहकांचे 'ॲनालॉग' मरण !

अर्थप्रवाह



प्रा. डॉ. महादेव रिठे
धामणगाव बढे (बुलढाणा)

भारतीय अर्थव्यवस्थेने गेल्या दशकात जे स्थित्यंतर अनुभवले, त्यात बँकिंग क्षेत्राचा वाटा सिंहाचा आहे. १९६९ सालचे बँकांचे राष्ट्रीयीकरण ही जर पहिली क्रांती असेल, तर २०१६ नंतरची 'डिजिटल क्रांती' ही दुसरी मोठी लाट मानली जाते. आज रस्त्यावरचा भाजीवाला असो वा कॉर्पोरेट कंपनीचा सीईओ, प्रत्येकाच्या खिशात बँकिंग व्यवस्था विसावली आहे. परंतु, १५ मार्चच्या 'जागतिक ग्राहक हक्क दिना'च्या उंबरठ्यावर उभे असताना, ९ मार्चच्या या सोमवारी आपण एका गंभीर प्रश्नाचा सामना करत आहोत: बँका खरोखर ग्राहकांसाठी चालवल्या जातात की ग्राहक केवळ बँकांच्या नफ्याचे साधन बनले आहेत?

**१. आकडेवारीचा आरसा :** प्रगतीचा आभास आणि तक्रारींचा पाऊसबँकिंग लोकपाल योजनेचा २०२३-२४ चा अहवाल वाचला की डोळे विस्फारतात. एका वर्षात तब्बल ७ लाख ४ हजार तक्रारींची नोंद झाली. हा आकडा केवळ नोंदणीकृत तक्रारींचा आहे; ग्रामीण भागातील लाखो ग्राहक तक्रार कशी करायची, हे माहीत नसल्याने गप्प बसतात.नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोनुसार, भारतात दर तासाला किमान १०० लोक सायबर फसवणुकीचे बळी ठरत आहेत.२०२४ मध्ये झालेल्या एकूण बँकिंग फसवणुकींपैकी ८०% फसवणुकी या 'रिमोट एक्सेस ॲप्स' आणि 'बनावट केवायसी' द्वारे झाल्या आहेत. डिजिटल इंडियाच्या नावाखाली आपण तंत्रज्ञान तर आणले, पण ग्राहकाचे संरक्षण करण्यासाठी लागणारी 'फायरवॉल' आजही कमकुवत आहे.

**२. सेवा शुल्काचा 'कायदेशीर' दरोडा** बँकांचे ताळेबंद आज नफ्यात दिसत आहेत, पण या नफ्याचे गमक कर्जवाटपापेक्षा 'अदृश्य शुल्कांमध्ये' दडलेले आहे.गेल्या पाच वर्षांत भारतीय बँकांनी ग्राहकांच्या खात्यातून 'किमान शिल्लक' नसल्याबद्दल ३५,००० कोटी रुपये वसूल केले. हा दंड प्रामुख्याने त्या वर्गाकडून वसूल केला जातो, ज्यांची आर्थिक ओढाताण सुरू असते.एसएमएस चार्जेस (जे टेलिकॉम कंपन्यांना बँका अत्यल्प दरात देतात, पण ग्राहकाकडून अव्वाच्या सव्वा वसूल करतात), डेबिट कार्ड मेंटेनन्स, एटीएम ट्रान्झॅक्शन फी, आणि आता तर 'चेक बुक' मागवण्यावरही मर्यादा आली आहे. बँकिंग ही आता 'सेवा' न राहता एक अत्यंत महागडी 'वस्तू' बनली आहे.

**३ . डिजिटल सुरक्षा :** जबाबदारी कोणाची? रिझर्व्ह बँकेने 'झिरो



लायबिलिटी' संकल्पना मांडली आहे. नियम सांगतो की, जर ग्राहकाचा दोष नसेल, तर सर्व नुकसान बँकेने सोसावे. पण प्रत्यक्षात काय घडते? जेव्हा एखादा ज्येष्ठ नागरिक आपली आयुष्यभराची पुंजी सायबर फसवणुकीत गमावतो, तेव्हा बँक सर्वप्रथम "तुम्ही ओटीपी शेअर केला असेल" असा ठपका ठेवून हात झटकते. बँकेच्या स्वतःच्या सॉफ्टवेअरमध्ये असलेल्या पळवाटांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते.

अनेकदा 'सिम स्वॅपिंग' किंवा 'मिररिंग' सारख्या प्रगत तंत्राचा वापर करून पैसे चोरले जातात, जिथे ग्राहकाचा कोणताही थेट सहभाग नसतो. अशा वेळीही ग्राहकाला पोलीस स्टेशनचे उंबरठे झिजवावे लागतात. सायबर सेलमध्ये तक्रार नोंदवूनही रिकव्हरीचा दर ५ टक्क्यांपेक्षा कमी आहे.

**४. बँकिंग लोकपाल :** एक कागदी वाघ?बँकिंग लोकपाल ही यंत्रणा ग्राहकांसाठी 'शेवटचा आशेचा किरण' असायला हवी होती. परंतु, या यंत्रणेची रचना बँकांकडे झुकलेली आहे. लोकपालाकडे जाण्यापूर्वी ग्राहकाला संबंधित बँकेच्या 'नोडल ऑफिसर'कडे तक्रार करणे अनिवार्य असते. तिथेच ३० दिवस वाया जातात. त्यानंतर लोकपालाकडे गेल्यावरही अनेकदा 'तांत्रिक कारणे' पुढे करून बँका आपली बाजू सावरून धरतात. लोकशाहीत न्याय मिळणे जेवढे कठीण आहे, तेवढेच कठीण बँकिंग व्यवस्थेतून न्याय मिळवणे झाले आहे.

**५. बँकिंगमधील 'अमानवी' चेहरा आणि ग्रामीण दरी :** आज बँकांचे लक्ष्य केवळ 'नेटवर्थ' असलेल्या ग्राहकांकडे आहे. ग्रामीण भागातील बँकांमध्ये गेल्यास आजही शेतकऱ्यांना आणि वृद्धांना मिळणारी वागणूक दुय्यम दर्जाची असते. डिजिटल बँकिंगमुळे बँकांनी शाखांमधील कर्मचारी संख्या कमी केली आहे, ज्यामुळे प्रत्यक्ष संवाद संपला आहे. मशीनला संवाद समजत नाही आणि माणसांना वेळ नाही, अशा कात्रीत सामान्य ग्राहक अडकला आहे. 'नियो बँक्स' आणि 'फिनटेक' कंपन्यांच्या आक्रमणामुळे पारंपरिक बँकांनी स्वतःच्या मूळ मूल्यांकडे दुर्लक्ष केले आहे.

**६. आता नाही तर कधी? :** या गंभीर आजारावर काही ठोस उपाय करणे आता अनिवार्य झाले आहे. ज्याप्रमाणे ठेवींना ५ लाखांचे विमा कवच असते, त्याचप्रमाणे प्रत्येक बँक खात्याला सायबर फसवणुकीचे मोफत विमा कवच बँकांनी दिले पाहिजे. बँकांनी दर महिन्याला ग्राहकाला त्याने दिलेल्या शुल्काचा स्वतंत्र हिशोब द्यावा.बँकिंग लोकपालाला दंडात्मक अधिकार असावेत आणि तक्रारीचा निकाल ६० दिवसांच्या आत लागणे बंधनकारक असावे.केवळ 'सावध राहा' असे म्हणून चालणार नाही, तर बँकांनी स्वतःच्या 'सीएसआर' फंडातून प्रत्येक तालुक्यात सायबर सुरक्षा केंद्रे उभी केली पाहिजेत.

विश्वासाचे संवर्धन हीच खरी अर्थव्यवस्था केवळ जीडीपीच्या आकड्यांवर चालत नाही, ती 'विश्वासावर' चालते. जर सामान्य माणसाचा बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास उडाला, तर तो पुन्हा जुन्या 'गाठीच्या पैशांकडे' वळेल, जे अर्थव्यवस्थेसाठी घातक असेल. १५ मार्चचा ग्राहक दिन हा केवळ भाषणांपुरता मर्यादित न ठेवता, रिझर्व्ह बँकेने बँकांना अधिक उत्तरदायी (Accountable) बनवले पाहिजे.

आजचा ग्राहक हा केवळ खाते क्रमांक नाही, तो या देशाच्या आर्थिक प्रवासाचा सहप्रवासी आहे. त्याला सन्मान आणि सुरक्षा देणे, हे बँकांचे उपकार नसून ते त्यांचे कर्तव्य आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# एआय बनतेय भू-राजकीय शस्त्र

पैलू

- महेश जोशी

नवी दिल्ली भारताने आयोजित केलेली 'एआय इम्पॅक्ट समिट २०२६' जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद चर्चेचा केंद्रबिंदू ठरली. 'ग्लोबल साऊथ'मधील पहिली व्यापक 'एआय परिषद' म्हणून तिची मांडणी झाली असून वीसहून अधिक देशांचे प्रमुख, ४५ पेक्षा जास्त मंत्रिस्तरीय प्रतिनिधी मंडळे आणि संयुक्त राष्ट्रासह अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधी येथे एकत्र आले आहेत. त्यावरून या परिषदेचे महत्त्व लक्षात यावे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'इंडिया एआय इम्पॅक्ट एक्स्पो २०२६'चे उद्‌घाटन झाले. तीनशेहून अधिक प्रदर्शन मंडप आणि सहाशेपेक्षा अधिक 'स्टार्टअप्स'चा सहभाग असलेली ही समांतर परिषद भारताला केवळ बाजारपेठ नव्हे, तर नवोन्मेषाचे केंद्र म्हणून ओळख देऊन गेली. हे वर्ष कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी (एआय) निर्णायक मानले जाते. जागतिक अस्थिरता वाढत असताना आणि धोरणात्मक स्पर्धा तीव्र होत असताना भारताने 'एआय'वरील जागतिक परिषद आयोजित करून एक वेगळेच धाडस केले. 'एआय' हे आज एक प्रमुख आणि वेगाने व्यापक होत जाणारे तंत्रज्ञान आहे. २०२९ पर्यंत त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांमध्ये अंदाजे तीन ट्रिलियन डॉलर्सची गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यात डेटा स्टोरेज, संगणकीय क्षमता आणि ऊर्जेच्या गरजा यांचा समावेश आहे. तथापि, 'एआय'च्या सामाजिक-आर्थिक फायद्यांबाबत अनिश्चितता कायम आहे. भारतातील ही परिषद या चिंता दूर करण्याचा प्रयत्न करेल, असा अंदाज आहे. 'एआय'च्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती असूनही 'आर्टिफिशियल जनरल इंटेलिजेंस' (एजीआय) च्या आगमनाचे दावे दिशाभूल करणारे आहेत. 'एजीआय'ची व्याख्या 'एआय' म्हणून केली जाते. ती प्रौढ व्यक्तीच्या बुद्धिमत्तेशी आणि कौशल्यांशी जुळते. त्यात तर्कशक्ती, स्मृती आणि धारणा यांचा समावेश आहे. 'एआय' प्रणालींचे मूल्यांकन करण्यासाठी वापरले जाणारे निकष मानवी तर्कांनाही पूरक ठरतात. 'एआय'ला सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेल्या संगणकीय शक्तीची अमर्याद मागणी सध्याच्या भू-राजकीय स्पर्धेत नवीनतम आव्हान म्हणून उदयाला आली आहे. परिषद एक अत्यंत महत्वपूर्ण उपक्रम ठरली.

भारताची मोठी आणि वैविध्यपूर्ण बाजारपेठ, परवडणारी अभियांत्रिकी प्रतिभा, इंग्रजीवर प्रभुत्त्व असलेले कर्मचारी, डेटा सार्वभौमत्व आणि डिजिटल पायाभूत सुविधा यामुळे भारत 'एआय'साठी एक आकर्षक ठिकाण बनले आहे. सरकार 'एआय' क्षेत्रात होत असलेल्या बदलांना सामावून घेण्यासाठी नियम तयार करत आहे. ते बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी अनुकूल ठरू शकतात. 'गुगल', 'मायक्रोसॉफ्ट' आणि 'अमेझॉन'सह प्रमुख अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्यांनी २०२५ च्या अखेरीस भारतात ६७.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. २०२६ च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पापूर्वी सादर केलेल्या भारताच्या आर्थिक सर्वेक्षणातही हाच दृष्टिकोन पुन्हा मांडण्यात आला आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# स्त्रीशक्तीचा संघर्ष, सन्मान आणि सशक्तीकरण



- अस्मिता क्षीरसागर
जि.प.म.उ.प्रा.शाळा, काजेगाव
ता.जळगाव जामोद, जि.बुलढाणा

(क्रमशः)

**स्त्रियांची ऐतिहासिक भूमिका** - स्त्रियांची ऐतिहासिक भूमिका मानव समाजाच्या विकासामध्ये अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावी राहिली आहे. प्राचीन काळापासून स्त्रियांनी कुटुंब, समाज आणि संस्कृतीच्या जतन व विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. स्त्री ही केवळ कुटुंबाची काळजी घेणारी व्यक्ती नसून ती समाजाच्या नैतिक मूल्यांची जपणूक करणारी आणि पुढील पिढी घडविणारी शक्ती आहे. आई ही मुलांची पहिली शिक्षिका असते आणि तिच्या संस्कारांमुळे समाजाच्या भविष्याची दिशा ठरते. त्यामुळे स्त्री ही समाजाच्या उभारणीची एक मजबूत आधारशिला मानली जाते.

भारतीय इतिहासात अनेक स्त्रियांनी आपल्या कार्याने आणि पराक्रमाने समाजाला प्रेरणा दिली आहे. सामाजिक सुधारणा, शिक्षण, स्वातंत्र्य संग्राम आणि समाजसेवा अशा विविध क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. स्त्री शिक्षणाचा पाया घालण्यात Savitribai Phule यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू करून शिक्षणाचा अधिकार स्त्रियांपर्यंत पोहोचवण्याचे महान कार्य केले. त्या काळात समाजातील अनेक विरोधांना तोंड देत त्यांनी स्त्रियांच्या सशक्तीकरणाचा मार्ग खुला केला.

तसेच स्वातंत्र्य संग्रामामध्येही अनेक स्त्रियांनी पराक्रम आणि धैर्य दाखवले. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात Rani Lakshmibai यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध शौर्याने लढा देऊन भारतीय इतिहासात आपले अजरामर स्थान निर्माण केले. त्यांच्या धैर्यामुळे अनेकांना स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा मिळाली.

याशिवाय विविध क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. शिक्षण, साहित्य, कला, विज्ञान आणि राजकारण अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. त्यामुळे इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रियांनी समाजाच्या उभारणीमध्ये महत्त्वाची आणि प्रेरणादायी भूमिका बजावली आहे.

**महिलांचे सामाजिक योगदान** - महिलांचे सामाजिक योगदान समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. स्त्री ही कुटुंब आणि समाज यांना जोडून ठेवणारी प्रमुख शक्ती आहे. कुटुंब व्यवस्थेची घडण, संस्कारांचे संवर्धन आणि समाजातील नैतिक मूल्यांची जपणूक या सर्व बाबींमध्ये स्त्रियांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आई, बहीण, पत्नी आणि मुलगी या विविध नात्यांमधून स्त्री समाजात प्रेम, सहकार्य आणि समजूतदारपणा यांची जपणूक करते. त्यामुळे स्त्री ही समाजाच्या विकासाची आणि स्थैर्याची आधारशिला मानली जाते.

कुटुंबामध्ये मुलांच्या संगोपनात आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत आईचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. मुलांना योग्य संस्कार, शिक्षण आणि नैतिक मूल्ये देण्याचे काम स्त्री करते. त्यामुळे सुशिक्षित आणि संस्कारित पिढी घडविण्यामध्ये स्त्रियांची भूमिका मोठी आहे. शिक्षित स्त्री केवळ स्वतःचे जीवन घडवत नाही तर संपूर्ण कुटुंब आणि समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाते. म्हणूनच स्त्री शिक्षणाला समाजाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक मानले जाते.

समाजसुधारणेच्या क्षेत्रातही महिलांनी मोठे कार्य केले आहे. स्त्रियांनी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संरक्षण, सामाजिक न्याय आणि जनजागृती या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. समाजातील वाईट प्रथा, अंधश्रद्धा आणि अन्याय यांविरुद्ध आवाज उठवून अनेक महिलांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे.

आधुनिक काळात महिलांचे सामाजिक योगदान अधिक व्यापक झाले आहे. अनेक महिला स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करून समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य करत आहेत. ग्रामीण भागात महिला स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून समाजात आर्थिक आणि सामाजिक जागरूकता निर्माण करत आहेत. त्यामुळे महिलांचे सामाजिक योगदान समाजाच्या प्रगतीसाठी आणि सकारात्मक परिवर्तनासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.



**महिलांचे आर्थिक योगदान** - महिलांचे आर्थिक योगदान समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. पूर्वी महिलांची भूमिका मुख्यतः घरापुरती मर्यादित मानली जात होती, परंतु काळाच्या ओघात महिलांनी विविध आर्थिक क्षेत्रांमध्ये आपली क्षमता सिद्ध केली आहे. आज महिला शेती, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्र, शिक्षण, आरोग्य आणि तंत्रज्ञान यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये सक्रियपणे कार्य करत आहेत. त्यांच्या श्रमांमुळे कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होते तसेच देशाच्या आर्थिक प्रगतीलाही चालना मिळते.

ग्रामीण भागात महिलांचे आर्थिक योगदान विशेषतः महत्त्वाचे आहे. शेती, पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुटीरउद्योग आणि हस्तकला यामध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. त्या शेतामध्ये पेरणी, कापणी, तणनियंत्रण आणि इतर अनेक कामांमध्ये पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून काम करतात. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून अनेक महिलांनी आर्थिक स्वावलंबन प्राप्त केले आहे. लघुउद्योग, बचत गट आणि सूक्ष्म वित्तीय योजनांच्या माध्यमातून महिला स्वतःचे व्यवसाय सुरू करत आहेत. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्या कुटुंबाच्या आर्थिक निर्णयांमध्येही सहभागी होतात.

आधुनिक काळात शिक्षणाच्या प्रसारामुळे अनेक महिला डॉक्टर, अभियंते, शिक्षक, बँक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी आणि उद्योजक म्हणून कार्य करत आहेत. त्या विविध उद्योग आणि व्यवसायांमध्ये नेतृत्व करत आहेत. महिलांच्या या सहभागामुळे देशाची उत्पादकता वाढते आणि अर्थव्यवस्था अधिक मजबूत बनते.

त्यामुळे महिलांचे आर्थिक योगदान हे केवळ कुटुंबापुरते मर्यादित नसून ते समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. महिलांना समान संधी आणि प्रोत्साहन दिल्यास त्या आर्थिक प्रगतीत अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतात.

**महिलांपुढील आव्हाने** - महिला दिन साजरा करताना स्त्रियांच्या यशाचा गौरव केला जातो, परंतु त्याचबरोबर महिलांपुढे असलेल्या विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आव्हानांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. आधुनिक काळात महिलांनी अनेक क्षेत्रांत मोठी प्रगती केली असली तरी समाजातील काही समस्या अजूनही पूर्णपणे दूर झालेल्या नाहीत. स्त्री-पुरुष असमानता, सामाजिक भेदभाव आणि पारंपरिक मानसिकता यामुळे अनेक महिलांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते.

समाजातील काही ठिकाणी अजूनही मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव केला जातो. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते, तर मुलींना अनेकदा शिक्षणाच्या संधी कमी मिळतात. ग्रामीण आणि मागास भागांमध्ये बालविवाह, हुंडा प्रथा आणि अंधश्रद्धा यांसारख्या समस्या आजही आढळतात. या प्रथांमुळे महिलांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येतात आणि त्यांच्या विकासाला अडथळे निर्माण होतात.

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही अत्यंत गंभीर आहे. सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी आणि काही वेळा घरामध्येही महिलांना असुरक्षिततेचा सामना करावा लागतो. कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ आणि अन्यायकारक वागणूक या समस्या समाजामध्ये अजूनही अस्तित्वात आहेत. त्यामुळे महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी समाजात जागरूकता निर्माण करणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि स्त्री-पुरुष समानतेची मूल्ये रुजवणे अत्यंत आवश्यक आहे. महिलांना योग्य संधी आणि समर्थन मिळाल्यास त्या समाजाच्या प्रगतीत अधिक प्रभावी योगदान देऊ शकतात.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# जळगाव जामोद तालुक्यात 'मूल्यवर्धन ३.०' उपक्रमाची प्रेरणादायी वाटचाल

- अजय वानखडे
मूल्यवर्धन तालुका समन्वयक



एक तालुका समन्वयक म्हणून शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्य करण्याची संधी लाभणे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि समाधानाची बाब आहे. जळगाव जामोद तालुक्यात शांतीलाल मुथा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेला 'मूल्यवर्धन ३.०' हा उपक्रम शाळांमध्ये प्रभावीपणे अंमलात आणताना विद्यार्थ्यांमध्ये घडणारे सकारात्मक परिवर्तन प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मला लाभत आहे, याचा मला विशेष गर्व आहे.

हा उपक्रम केवळ तालुक्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर यशस्वीपणे राबविला जात आहे. भारतीय संविधानात अधोरेखित केलेली मूलभूत मूल्ये, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, जबाबदारी, वैज्ञानिक दृष्टिकोन, करूणा, सेवाभाव, राष्ट्रभक्ती आणि श्रमप्रतिष्ठा, विद्यार्थ्यांच्या मनामनात रुजविण्याचे कार्य या उपक्रमाच्या माध्यमातून सातत्याने केले जात आहे.

'मूल्यवर्धन' या विशेष पुस्तकाच्या साहाय्याने शिक्षक आठवड्यातून दोन तासिका घेऊन विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधतात. चर्चासत्रे, भूमिकानाट्य, समूहकार्य, कृतीआधारित उपक्रम आणि अनुभवकथन यांच्या माध्यमातून मूल्यांचे व्यवहार्य आकलन घडविले जाते.

विद्यार्थी स्वतःहून आपले अनुभव मांडतात, सामाजिक विषयांवर विचार व्यक्त करतात, शाळेतील स्वच्छता, शिस्त आणि सहकार्याची जबाबदारी स्वीकारतात. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी 'मूल्य भिंत', 'विचार कोपरा', 'आजचा सद्गुण' आणि 'चांगल्या कृतींची नोंद वही' अशा अभिनव उपक्रमांची सुरुवात केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सामूहिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ होत आहे.तालुका समन्वयक म्हणून जळगाव जामोद व शेगाव तालुक्यातील सर्व शाळांना नियमित भेटी देत उपक्रमाची परिणामकारक अंमलबजावणी होत आहे की नाही याची पाहणी केली जाते. शाळा भेटीदरम्यान विद्यार्थ्यांमधील वैचारिक परिपक्वता, संवादकौशल्य आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला जातो. शिक्षकांच्या प्रेरणादायी कार्याच्या 'यशोगाथा' संकलित करून त्या राज्यस्तरावर पाठविण्याचे कार्य सातत्याने केले जात आहे, ज्यामुळे शिक्षकांमध्येही सर्जनशीलता आणि प्रेरणा वाढीस लागली आहे.

'मूल्यवर्धन ३.०' हा उपक्रम केवळ शैक्षणिक उपक्रम नसून सामाजिक परिवर्तनाची भक्कम पायाभरणी आहे. आजची पिढी केवळ गुणांनी नव्हे तर संस्कारांनीही समृद्ध व्हावी, जबाबदार, संवेदनशील आणि कर्तव्यदक्ष नागरिक घडावेत, हीच या उपक्रमामागील प्रेरणा आहे.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# भारतीय आदर्श नारी

तू जिजाऊ, तू सावित्री, तू भिमाई,
तू रमाई, अहिल्याची तू लेक आहे
तू किरण बेदी, तू कल्पना,
तू सुनिता आकाशात तुझी झेप आहे...
कित्येक रूपे तुझी असती
लेकरांचा अभ्यास घेणारी सरस्वती तू
स्वयंपाक करणारी अन्नपूर्णा तू
संकटांना तोंड देणारी दुर्गा आहेस तू....
चुल आणि मूल ते दिवस गेले
चुलही तुच सांभाळती आणि मुलंही
आणि कर्तृत्ववान स्त्री होण्यासाठी
बाबासाहेबांनी घटनेत अधिकार दिले.......
खुरपं आणि विळा नको हातात
वही आणि पेन घेऊन कर्तृत्ववान स्त्री
घडवायचीय शेळी आणि दावणीची गाय नको
तुझ्यात वाघीन मला पहाचीय !
कधी मुलगी, कधी पत्नी, कधी सुन
कधी आई प्रत्येक कर्तृत्व ती निभावत असते
सासर आणि माहेर दोन्ही घरं उजळविणारी
स्त्री एक ज्योत असते मागे वळून पाहू नको,
निर्णय चुकीचा घेऊ नको
परिवर्तनाच्या वाटेवर टाक पाऊले,
तू आहेस मदर तेरेसा आणि
आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले........
सर्व काही मीच करणार असा अट्टहास करणारी
अन्यायाविरुध्द लढणारी, सर्वांच्या सुखाचा
विचार करणारी आणि स्वतः
ॲडजेस्टमेंट करणारी
अशीच असते "भारतीय आदर्श नारी"

- सौ. दिपाली सचिन पाटील / इंगळे कोलवड (बुलडाणा)

दैनिक महाभूमि

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८ पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27

दैनिक महाभूमि

सोमवार ९ मार्च २०२६

mahabhoomimarathwada@gmail.com

# छत्रपती संभाजीनगर भूमि

**न्यूज ब्रीफ**

### कार्यकर्त्यांचा मनसेत प्रवेश

**छत्रपती संभाजीनगर:** ० बळीराम पाटील शाळा परिसरात आयोजित कार्यक्रमात शिवसेनेचे (शिंदे गट) जिल्हा सचिव राजू घोरपडे पाटील यांच्यासह विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी गुरुवार, ५ मार्च रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केला. पक्षाचे राज्य उपाध्यक्ष सतनामसिंग गुलाटी व जिल्हा संघटक अशोक पवार पाटील यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी अभिजित पाटील, प्रकाश जाधव, प्रशांत जाधव, अमोल पवार, राजेश चौधरी, विकी राऊत, दत्ता भडक व शेकडो कार्यकर्त्यांनी प्रवेश केल्याची माहिती अशोक पवार पाटील यांनी दिली.

### जि.प. शाळेत महिला सन्मान मेळावा

**पैठण :** जागतिक महिला दिनानिमित्त पैठण तालुक्यातील नारायणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवार, ७ मार्च रोजी महिला सन्मान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी गावातील माता-पालकांनी मोठा प्रतिसाद दिला. कार्यक्रमात अंगणवाडी कार्यकर्ती गीताताई गवळी, शालेय समितीच्या अध्यक्षा रेखा मिसाळ यांच्यासह उपस्थित सर्व मातांचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक ओंकेश बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक नवनाथ दराडे, पांडुरंग करले, पद्मा खेडकर, वैशाली कुदळ, शुभांगी औटी, आशाबाई गुंजाळ व विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

### ८३ जण शिकले शंखवादन

**छत्रपती संभाजीनगर :** शंख वाजविण्याची अनेक वर्षांची इच्छा होती आणि आता दोन तासांच्या प्रशिक्षणातून मला शंख वाजविणे येऊ लागले, अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली. विश्व हिंदू मंदिर अर्चक पुरोहित आयामतर्फे नुकतीच विनामूल्य शंखवादन प्रशिक्षण कार्यशाळा खडकेश्वर मैदानावर घेतली गेली. गजेंद्र अग्रवाल, स्वरित सिकची, चैतन्य बिरारे आणि सिध्दांत दहिवाल यांनी शंखवादनाची माहिती व प्रशिक्षण दिले. शंख दल तयार करण्याचा निर्णय अभिषेक कादी यांनी घेतला. देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार, शिवाजी दहिवाल, प्रदीप देशमुख, शशिकांत वाडगावकर, पद्मनाभ चौधरी आदींनी परिश्रम घेतले.

### वैजापूर शहरातील दुकानाला आग



**वैजापूर :** शहरातील गजबजलेल्या जुन्या बस स्थानक परिसरातील मुरारी पार्क भागात असलेल्या जय बाबाजी ऑटोमोबाईल्स नावाच्या दुकानाला शुक्रवारी रात्री साडे नऊ वाजेच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. ही आग इलेक्ट्रिक शॉर्ट सर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. आगीत कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात दुकानातील माल जळून खाक झाला असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. त्यामुळे नुकसानीचा तपशील लगेच कळू शकला नाही. आग लागल्यानंतर धुराचे लोट दिसताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नगर परिषदेतर्फे आग विझवण्यासाठी बंब पाठवण्यात आले. सुमारे एक तासाहून अधिक आग विझवण्याचे काम सुरु होते. आगीने रौद्र रूप धारण केल्याने आग विझवण्यासाठी वेळ लागला.

## 'नाथषष्ठी' निमित्त पैठण मध्ये शेकडो दिंड्या दाखल

# टाळ-मृदंगाच्या गजरात 'भानुदास-एकनाथांचा जय घोष'

**पैठण / प्रतिनिधी**

संत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी निमित्त पैठण नगरीत सध्या भक्तीमय वातावरण पाहायला मिळत आहे. टाळ-मृदंगाचा गजर, पावलीचा ठेका धरत, अभंग गात आणि भानुदास-एकनाथ महाराज की जय असा जयघोष करत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेकडो दिंड्या पैठणमध्ये रविवार, ८ मार्च रोजी दाखल झाल्या आहेत. हजारो वारकरी भाविक शहरात पोहोचल्यामुळे संपूर्ण पैठण नगरीत उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नाथषष्ठी पर्वासाठी आलेल्या दिंड्या पैठणमध्ये दाखल झाल्यानंतर गोदावरी नदीच्या वाळवंटात आपापल्या फडात मुक्कामाला थांबल्या आहेत. ठिकठिकाणी भगवे पताके, हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा नाद आणि अभंगाच्या स्वरांनी परिसर नाथमय झाला आहे. भाविक दिंडीतून चालत येत असताना ज्ञानोबा-तुकाराम, भानुदास-एकनाथ अशा जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले आहे. संत एकनाथ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त नाथषष्ठी उत्सव भक्तिभावाने साजरा होत आहे. या उत्सवासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांमधून वारकरी पैठणमध्ये दाखल होत आहेत. अनेक दिंड्या अजूनही मार्गावर असून पुढील काही तासांत आणखी हजारो भाविक पैठणमध्ये पोहोचणार असल्याची माहिती पैठण नगर परिषदेच्या सूत्रांनी दिली. संत एकनाथ महाराज हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील मानाचे संत मानले जातात. त्यांचा जन्म इ.स. १५३३ मध्ये पैठण येथे झाला. शांतिब्रह्म, संतकवी, समाजसुधारक आणि तत्त्ववेत्ता म्हणून त्यांची ओळख आहे. 'ज्ञानाचा एका' या नावाने ते संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. एकनाथ महाराजांचे गुरू देवगिरी (दौलताबाद) येथील जनार्दन स्वामी होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वेदान्त, योग आणि भक्तियोग यांचे शिक्षण घेतले. पुढे त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारून गिरिजाबाई यांच्याशी विवाह केला अशी आख्यायिका असल्याचे जुने जाणकार सांगतात.

संत एकनाथ महाराजांनी मराठी साहित्यातही मोठे योगदान दिले. 'एकनाथी भागवत', 'भावार्थ रामायण' आणि 'रुक्मिणी स्वयंवर' हे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत. तसेच ''त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाण'' ही प्रसिद्ध दत्ताची आरतीही त्यांनी रचली आहे. मराठी भाषा आणि संतसाहित्य समृद्ध करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.फाल्गुन वद्य षष्ठी, शके १५२१ (इ.स. १५९९) रोजी संत एकनाथ महाराजांनी समाधी घेतली. हा दिवस ''नाथषष्ठी'' म्हणून ओळखला जातो. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी पैठणमध्ये हा उत्सव उत्साहात साजरा केला जातो.







### नगर परिषदेकडून दिंड्यांचे स्वागत

■ नाथषष्ठी सोहळ्यानिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो दिंड्या पैठणमध्ये दाखल होत आहेत. या पार्श्वभूमीवर पैठण नगर परिषदेकडून शहरात येणाऱ्या दिंड्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे. नगराध्यक्षा विद्या भुषण कावसानकर, मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, निता ठोके, उपमुख्य अधिकारी सोमनाथ गरजे, अश्विन गोजरे, धर्मराज उजागिरे, अशोक मगरे, पंकज पवार, गावांदे, राजू पगारे, नवनाथ जगधने, सचिन ससाने, जितेंद्र तुपे, शाहीद शेख आदींनी भाविकांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

### संत एकनाथ महाराजांनी समाज जागृती केली

■ त्या काळात समाजात अज्ञान, अंधश्रद्धा आणि जातीभेद मोठ्या प्रमाणात होते. संत एकनाथ महाराजांनी भारूड, जोगवा, गवळणी आणि अभंग यांच्या माध्यमातून समाज जागृती केली. सामान्य माणसाला समजेल अशा भाषेत त्यांनी धर्म, भक्ती आणि मानवतेचा संदेश दिला.

## उपविभागीय जलसंधारण अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

### फोन पे वर लाच स्विकारणे भोवले

**वैजापूर / प्रतिनिधी**

खासगी वाहनाचे बिल तयार करण्यासाठी ७ हजार रुपयांची लाच फोन पे वर स्विकारणाऱ्या येथील जिल्हा परिषदेच्या उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई शनिवार, ७ मार्च रोजी सायंकाळी उशिरा करण्यात आली. निखील अशोक कवाडे (३३ वर्ष), रा. वैजापूर असे लाचखोर उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्याचे नाव आहे.



यातील तक्रारदार यांची टूर्स अँड ट्रॅव्हल्स एजन्सी असून ते भाडेतत्वावर गाड्या जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांना पुरवठा करतात. त्यानी उपविभागीय जलसंधारण अधिकारी वैजापूर यांना मासिक भाडेतत्वावर बोलेरो गाडी दिली होती. त्याचे प्रलंबित बिल तयार करून एम बी बुक, लॉग बुक व काँटीजेन्सी बिल यावर सही करून ते मंजुरीकरिता मुख्य कार्यालय येथे पाठविण्याकरिता कवाडे यांनी १० हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती ७ हजार रुपये देण्याचे ठरले होते. परंतु तक्रारदारास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधीक्षक माधुरी केदार-कांगणे, उपअधीक्षक राजीव तळेकर, बाळासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनय कोरे, पोलिस अंमलदार आवेज शेख, प्रकाश डोंगरदिवे, चांगदेव बागुल आदींच्या पथकाने सापळा रचला होता. परंतु शासकीय सुट्टी असल्याने निखील कवाडे यांनी फोन पे वर सात हजार रुपयांची लाच स्विकारली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने निखील कवाडे यांना ताब्यात घेत मोबाईल जप्त केला. याप्रकरणी पोलिस उपअधीक्षक बाळासाहेब शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन निखील कवाडे यांच्याविरुध्द वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक विनय कोरे हे करीत आहेत.

## महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीची कार्यकारिणी जाहीर

**सिल्लोड / प्रतिनिधी**





महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीची नूतन कार्यकारीणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यावेळी सिल्लोड शाखा अध्यक्षपदी ॲड. संतोष झाल्टे यांची तर कार्याध्यक्षपदी डॉ. प्रकार बिऱ्हाडे यांची फेरनिवड करण्यात आली.

सिल्लोड येथील इंद्रराज महाविद्यालयात महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत नूतन कार्यकारीणी निवडण्यात आली. त्यात उपाध्यक्षपदी प्रा. डॉ. व्यंकटेश लांब, जगदीश बेदवे, प्रधान सचिवपदी एन. आर. फाळके, सचिन दांडगे, सीताराम काळे, बुवाबाजी विरोधी संघर्ष कार्यवाहक हरिदास वाघ, सहकार्यवाहक मुसाखान पठाण, विविध उपक्रम कार्यवाहक प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे, सहकार्यवाहक अनिल साबळे, वैज्ञानिक जाणिवा कार्यवाहक प्रा. डॉ. जगदीश सावदेकर, सहकार्यवाहक डॉ. सचिन साबळे, डॉ. दत्तात्रेय भवर, महिला कार्यवाहक प्राचार्य अर्चना अहिरे, सहकार्यवाहक सरला कामे, युवा कार्यवाहक गजानन इंगळे, सहकार्यवाहक नितीन निकम, सांस्कृतिक कार्यक्रम कार्यवाहक रुपेश ठाकूर, सहकार्यवाहक किसन शिंदे यांची निवड करण्यात आली. बैठकीचे सूत्रसंचालन एन. आर. फाळके यांनी केले. तर प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## इंद्रराज महाविद्यालयाच्या वतीने विविध पुरस्कार जाहीर



**सिल्लोड / प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त इंद्रराज महाविद्यालय, महिला सक्षमीकरण विभाग आणि जायंट्स ग्रुप ऑफ नवचेतना, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने सिल्लोड तालुक्यातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना रविवार, ८ मार्च रोजी पुरस्कार जाहीर करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा येत्या १६ मार्च रोजी इंद्रराज महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडणार आहे.

इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, महिला सक्षमीकरण विभाग आणि जायंट्स ग्रुप ऑफ नवचेतना, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने सिल्लोड तालुक्यातील महिलांचा सन्मान करण्यासाठी रविवारी विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली.

त्यात आळंद प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लवी राजपूत, महावितरण कंपनीच्या तंत्रज्ञ रत्नमाला भुईगळ, पोलिस कर्मचारी वंदना हिवराळे, वाहन प्रशिक्षक अश्विनी भोंबे, विमा प्रतिनिधी अर्चना सोनार, आशा सेविका विजया लाड, पूर्णा सहकारी पतसंस्थेच्या संचालक रेखा गाडे, उद्योजक ताराबाई आळणे, अंजना मिरगे, नगरसेविका वैशाली पाटील, मंडळ अधिकारी अनिता डुमणे, रक्तपेढी तंत्रज्ञ गंगा उडणे आदींना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

## अतिवृष्टीतील विहिरींच्या नुकसान भरपाईची प्रतीक्षा

### कन्नड : ३९८ प्रस्ताव मंजुरीच्या उंबरठ्यावर; १२ प्रस्तावांत त्रुटी

**कन्नड / प्रतिनिधी**

तालुक्यात सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने शेतीसह सिंचन व्यवस्थाही कोलमडून पडली होती. या नैसर्गिक आपत्तीत तालुक्यातील ४१० विहिरींची मोठी पडझड झाली होती. मात्र, नुकसानीचे प्रस्ताव सादर करून सहा महिने उलटले तरी अद्याप एकाही बाधिताला मदत मिळालेली नाही. मार्चअखेर ही मदत खात्यावर जमा होईल, असे आश्वासन आता प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

अतिवृष्टीनंतर आणि ग्रामविकास विभागाने महसूल प्रत्यक्ष पाहणी करून ४१० विहिरींच्या पडझडीचे प्रस्ताव ऑक्टोबर २०२५ मध्येच सादर केले होते. त्यापैकी ३९८ प्रस्तावांना तांत्रिक मंजुरी देऊन अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात आला आहे, तर उर्वरित १२ प्रस्तावांत त्रुटी आढळल्या आहेत. सिंचनाचे मुख्य साधन असलेल्या विहिरीच खचल्याने शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्येकी ३० हजार रुपयांचे अनुदान दोन टप्प्यांत दिले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १५ हजार आणि दुसऱ्या टप्प्यात १५ हजार, अशी ही मदत थेट बँक खात्यात जमा होणार आहे. मार्च महिना सुरू झाल्याने आता ही मदत कधी मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, कन्नड तालुक्यातील ४१० विहिरींचे अतिवृष्टीत नुकसान झाल्याचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले. यापैकी १२ प्रस्तावांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत.

### मार्चअखेर अनुदान

■ नुकसानग्रस्त विहिरींचे सर्व आवश्यक प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर पाठवण्यात आले आहेत. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्येकी ३० हजार रुपयांचे अनुदान दोन टप्प्यांत मार्चअखेरपर्यंत जमा करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल अशी माहिती कन्नडचे गटविकास अधिकारी डॉ. ओमप्रकाश रामावत यांनी दिली.



## लाच मागणाऱ्या पोलिस पाटलावर गुन्हा दाखल

**वरठाण / प्रतिनिधी**

सोयागाव तालुक्यातील किन्ही येथे झालेल्या भांडणाचा गुन्हा दाखल होऊ नये यासाठी तीन हजार रुपयांची लाच मागणाऱ्या किन्ही गावच्या पोलिस पाटलासह एका खासगी व्यक्तीविरुध्द सोयगाव पोलिस ठाण्यात शनिवार, ७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे सोयगाव तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किन्ही येथील ३४ वर्षीय तक्रारदाराचे गावातील एका महिलेसोबत भांडण झाले होते. या भांडणाचा गुन्हा दाखल होऊ नये यासाठी पोलिस पाटील मन्साराम बाबुराव लोखंडे यांनी संतोष भगवान शेळके (४३ वर्ष), रा. किन्ही, ता. सोयगाव यांच्याकडे पाच हजार रुपये देण्याचे सांगितले होते. तडजोडीअंती तीन हजार रुपये देण्याचे ठरले होते. तक्रारदारास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने किन्ही येथील अशोक भोई यांच्या चहाच्या टपरीवर सापळा रचून अशोक नागरगोजे, राम गोरे, रामेश्वर ताठे, संतोष शेळके यांना ताब्यात घेतले. संतोष शेळके यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ ३ हजार ६०० रुपये मिळून आले. या घटनेची माहिती मिळताच पोलिस पाटील मन्साराम लोखंडे यांनी गावातून धूम ठोकली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक केशर दिंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलिस पाटील मन्साराम लोखंडे, संतोष शेळके यांच्याविरुध्द सोयगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### लिपीक संघटनेची ग्रामविकास मंत्र्याकडे मागणी

# जिल्हा परिषदेतील लिपीकांची पदे एकत्रित करा

**वैजापूर / प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ व वरिष्ठ लिपीकांची पदे एकत्रित करावीत अशी मागणी लिपीक संघटनेच्या वतीने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे गुरुवार, ५ मार्च रोजी करण्यात आली. लिपीक संघटनेच्या वतीने राज्य कोषाध्यक्ष उमाकांत सूर्यवंशी यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यासमोर लिपीकांच्या व्यथा मांडल्या.



जिल्हा परिषद व पंचायत समिती आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ व वरिष्ठ लिपीकांची पदे एकत्रित करावीत या प्रमुख मागणीसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी लिपीक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या दालनात गुरुवारी बैठक पार पडली. यावेळी लिपीक संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष उमाकांत सूर्यवंशी, आमदार सत्यजित देशमुख, जिल्हा परिषद लिपीक संघटनेचे राज्याध्यक्ष सागर बाबर, राज्य कार्याध्यक्ष पंकज गुल्हाने, राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण, मराठवाडा विभागीय अध्यक्ष संजय जगताप, राज्य प्रसिध्दी प्रमुख हेमंत कुमार यावले, राज्य सचिव अरुण जोर्वेकर, नाशिक जिल्हाध्यक्ष प्रमोद निरगुडे, पुणे जिल्हा अध्यक्ष इंद्रजीत जाधव, पुणे जिल्हा कोषाध्यक्ष रेव्हलिंग यादव, सांगली जिल्हा कोषाध्यक्ष महेश गावंदरे, सांगली जिल्हा संघटक संजय शिंदे, छत्रपती संभाजीनगर येथील प्रमोद जाधव, दत्तात्रय वाणी, प्रविण सोनार, नागेश सांगळे, सुनिल पाटील, दिपक कुमावत, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, उपसचिव जाधव, कक्ष अधिकारी नितीन पवार यांच्यासह ग्राम विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### सामान्य जनतेला वेठीस धराल तर कारवाई करु

लिपीक संवर्गाची पदे एकत्र करून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा सुधारणार असेल तर यावर आम्ही पाठपुरावा करून निर्णय लावून घेतो. परंतु एका बाजूला मागण्यांसाठी बैठका घ्यायच्या व दुसऱ्या बाजूला कामबंद करून सामान्य जनतेला वेठीस धरणार असाल तर काम नाही वेतन नाही, या धर्तीवर कारवाई केली जाईल असा इशारा मंत्री जयकुमार गोरे यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बैठकीदरम्यान दिला.

### स्नेहसंमेलन उत्साहात

**सिल्लोड :** येथील इंद्रराज महाविद्यालयात शनिवार, ७ मार्च रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. शिक्षण हे स्वत्वाची जाणीव करून देणारे असून, विद्यार्थ्यांनी व्यक्त व्हायला शिकले पाहिजे, असे प्रतिपादन यावेळी प्रो. डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी केले.



## न्यूज ब्रीफ

### सिल्लोडमध्ये छत्रपतींच्या पुतळ्यास अभिवादन

**सिल्लोड :** रहिमाबाद येथे उभारण्यात येत असलेल्या शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सिल्लोड शहरात शुक्रवार, ६ मार्च रोजी दुपारी २ वाजता आगमन झाले. यावेळी आ. अब्दुल सत्तार, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी शिवसेनेचे (शिंदेगट) गटनेता सुधाकर पाटील, किशोर अग्रवाल, प्रशांत क्षीरसागर, दत्ता शेजुळ, संजय डमाळे, रहिमाबादचे सरपंच सुभाष नवल, हरिभाऊ चिंचपुरे, भिकन राऊत, बबन बोडखे, बाबूराव बोडखे, विलास शिंदे, अंकुश पाटील आदींची उपस्थिती होती.

### कॅनॉलमध्ये बुडून तरुणाचा मृत्यू

**परभणी :** कॅनॉलच्या पाण्यामध्ये बुडून ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवार, ७ मार्च रोजी सकाळी ११ च्या सुमारास घडली. ओमकार बंडू अवचार (३५ वर्ष), रा. विश्वास नगर, परभणी असे मयताचे नाव आहे. नितीन अवचार यांचा मोठा भाऊ ओमकार बंडू अवचार याचा शनिवारी कॅनॉलमध्ये पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक महादेव मांजरमकर, सहाय्यक फौजदार धोंडगे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी नवा मोंढा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### सन्मित्र कॉलनीत डॉक्टरचा फ्लॅट फोडला

**छत्रपती संभाजीनगर :** सन्मित्र कॉलनीत भरदुपारी बंद फ्लॅट फोडत चोरट्यांनी ६६ हजारांचा ऐवज लंपास केला. ही घटना शुक्रवार, ६ मार्च रोजी दुपारी दोन ते तीन वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. सुधाकर सोन्याबापू शेळके रा. विजयलक्ष्मी अपार्टमेंट सन्मित्र कॉलनी यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार चोरट्यांनी फ्लॅटचा कडी कोयंडा तोडून कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिणे रोख रक्कम लांबविली. तसेच सुनिता सतीश ढोले यांच्या घराचे कुलूप तोडून दागिने लंपास केले. पुढील तपास क्रांतीचौक ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनिल माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शेवाळे हे करीत आहेत.

### महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**परभणी :** पीडित महिला घरात एकटी असल्याची संधी साधत तिच्या घरात शिरुन तु मला खूप आवडतेस, माझे तुझ्यावर प्रेम आहे असे म्हणत तिचा विनयभंग करण्यात आल्याची घटना गुरुवार, ५ मार्च रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरुन नजमोद्दीन नसिरोद्दीन शेख याच्याविरुध्द सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक दीपक बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक कृष्णा घायवट, पोलिस अंमलदार मामीलवाड, रासकटला हे करीत आहेत.

### वडोद बाजार येथे महाराजस्व शिबिर

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे शनिवार, ७ मार्च रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमात विविध योजनांची माहिती देण्यासह प्रमाणपत्र वाटप केले. यावेळी आमदार अनुराधा चव्हाण, तहसीलदार योगिता खटावकर, गोपाळ वाघ, गीतांजली पाथ्रीकर, पाकिजा पठाण, लक्ष्मण घाईट, मंडळाधिकारी माधवी लिंगायत, ग्राम महसूल अधिकारी विनोद मुळे, वैशाली खंदारे, अनुजा गोर्डे, आदी उपस्थित होते.

सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने पाणीपातळी टिकून

# जिल्ह्यात यंदा टँकरची गरज नाही; १३.७९ कोटी रुपयांचा आराखडा

**परभणी / प्रतिनिधी**

जिल्ह्यात यंदा चांगले पर्जन्यमान झाल्याने टंचाईत टँकरची गरज भासणार नसल्याचा जिल्हा प्रशासनाचा अंदाज आहे. इतर संभाव्य उपाययोजनांचा १३.७९ कोटींचा आराखडा जि.प. प्रशासनाने सादर केला आहे. टैंकर बैलगाडीद्वारे पाणीपुरवठ्याची मात्र ३० कामे प्रस्तावित असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूत्रांनी दिली.




परभणी जिल्ह्यात यंदा चांगले पर्जन्यमान झाले. बहुतेक तालुक्यांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. त्यामुळे अजूनही पाणीपातळी टिकून आहे. शिवाय मागील काही वर्षात टँकरची तुलनेने तेवढी गरज भासत नसल्याचे दिसून येत आहे. त्यावरून प्रशासनाने यंदाही टँकर लागणार नाही, असा अंदाज बांधला आहे. मात्र, पालम, पूर्णा, गंगाखेड तालुक्यातील डोंगराळ भागात दरवर्षीच काही गावे टंचाईचा सामना करतात. यंदाही त्यांना पुन्हा त्या परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो. त्यातच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पालम ६५ गाव प्रादेशिक योजनेबाबत गंभीर नाही. या योजनेला गेल्यावर्षी २ कोटी मंजूर झाले; पण शासनाने ते दिलेच नाहीत. त्यामुळे दुरुस्ती झाली नाही. परिणामी, हा भाग यंदाही टंचाईच्या कचाट्यात येण्याची भीती आहे. संभाव्य उपाययोजनांचा या गावांना कितपत फायदा होईल, हे सांगता येत नाही.

जिल्ह्यात यंदा टंचाईत सर्वाधिक उपाययोजना या नवीन विंधन विहिरी घेण्याच्या केल्या. २५७ कामांसाठी १.८३ कोटींचा खर्च प्रस्तावित केला आहे. विहिरीतील गाळ काढण्याची ४ कामांसाठी ८ लाख प्रस्तावित आहेत. तर विंधन विहिरींच्या विशेष दुरुस्तीच्या ६ कामांसाठी २.४० लाख अपेक्षित आहे. तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा नसला तरी टँकर बैलगाडीचा पर्याय आराखड्यात ठेवला आहे. या ३० कामांसाठी ७४ लाखांचा खर्च अपेक्षित आहे. तर तात्पुरती पुरक योजना ९ ठिकाणी घेण्याचे नियोजन असून १.१९ कोटींचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूत्रांनी दिली.

#### २९३ अधिग्रहणे प्रस्तावित

■ २९३ खासगी विहीर अथवा बोअर अधिग्रहणाची २९३ कामे प्रस्तावित आहेत. यावर १.९४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. नळयोजनांच्या विशेष दुरुस्तीची ४१ कामे अपेक्षित असून ७.९८ कोटींचा सर्वाधिक खर्च या कामांसाठी अपेक्षित असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी सांगितले.

## जगदंबा स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात



**विहामांडवा / प्रतिनिधी**

नोबेल पुरस्कार विजेते भारतीय शास्त्रज्ञ सी.व्ही रमण स्मरणार्थ जगदंबा स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शनिवार, ७ मार्च रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी एकाहून एक सरस प्रयोगांचे सादरीकरण करत त्या प्रयोगांची माहिती उपस्थितांना दिली.

जगदंबा स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य नितीन तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य प्रमोद पन्हाळकर, श्री रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखान्याचे संचालक भीमराव वाकडे, अनिल गाभूड, विक्रम थोटे, शाळेचे सचिव प्रशांत नरके, अतुल पन्हाळकर, आकाश पहाडे, गणेश करताडे, आरेफ शेख, नितीन ब्रह्मराक्षस, अस्लम शेख, गंगाधर करडे, प्रल्हाद एखंडे, मुख्याध्यापक संतोष रखे, मयुरी खोबरे, कल्याणी कुलकर्णी, प्रीती तांगडे, शिल्पा नरके, वैष्णवी देशमाने, सागर आंबेकर, ऐश्वर्या जाधव, प्रतीक्षा गाभूड, स्वाती नरके, भाग्यश्री हकम, अनुराधा झुंजे, दीप्ती बडे, योगिता जयस्वाल, नीता रोडगे, अश्विनी करडे, मयुरी भोजने, पायल मापारी, श्रुती वाघमारे, राजेंद्र वाकडे, ज्ञानेश्वर बडे, गणेश उनवणे, सुंदर थोरे आदींची उपस्थिती होती.

## पुंडलिकराव पाटील विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन

**नाचनवेल / प्रतिनिधी**

मोहरा येथील कै.पुंडलिकराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात येथे, राष्ट्रीय विज्ञान दिन डॉ.सी.व्ही.रमण यांच्या स्मृतिप्रतिर्थ साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयामध्ये विज्ञान परिसंवाद आणि विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.



विज्ञान परिसंवादात विद्यार्थ्यांनी ऊर्जा स्रोत, अवकाश संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर आपले मत व्यक्त केले. यावेळी परिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. या स्पर्धेत जय काथार प्रथम, संस्कृती खंबाट द्वितीय, कार्तिकी गाडेकर व प्रतीक्षा गाडेकर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत आठवीचा गट विजयी ठरला. यावेळी मुख्याध्यापक संतोष शिंदे, विज्ञान शिक्षक अतुल घडामोडे, सचिन पाटील, अनिल गायकवाड, कल्याणी सोनवणे, अभिषेक शिंदे यांच्यासह शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचे आयोजन

**सोयगाव / प्रतिनिधी**

तालुक्यातील शिवाजीनगर, आमखेडा येथे श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिर संस्थान व ग्रामस्थ मंडळी यांच्या वतीने अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह व संगीतमय श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे सोमवार, ९ ते १६ मार्च दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे अयोजन करण्यात आले असल्याची माहिती विठ्ठल-रुख्मिणी मंदिर संस्थानच्या वतीने देण्यात आली. प.पू. वै. रामकृष्ण नाईक (वाडा) यांच्या आशीर्वादाने व ह.भ.प. भागवत महाराज गाडेकर, ह.भ.प. रविंद्र महाराज पेरेराव यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. पंकज महाराज पाटील (वारकरीभूषण, मुक्ताईनगर), ह.भ.प.सविताई शाखी (भागवताचार्य, मलकापूर), ह.भ.प. श्वेता दुधे (युवा कीर्तनकार, सारवे ता. पाचोरा), ह.भ.प. अतुल महाराज काळे (शिवचरित्रकार, बेटावद), ह.भ.प. शिवाजी महाराज तालेकर (भागवताचार्य, भोकरदन), ह.भ.प. महादेव महाराज गणेश (भागवताचार्य, खामगाव), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पाटील (भागवताचार्य, शेलवड ता. बोदवड), ह.भ.प. रविंद्र महाराज पेरेराव (सोयगाव) यांची कीर्तने होणार आहेत. अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे ५ ते ६ वाजेदरम्यान काकडा आरती, सकाळी ६ ते ७ श्री पांडुरंगाची महापूजा व विष्णुसहस्त्रनाम, दुपारी १ ते ४ संगीतमय श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, तर रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत कीर्तन होऊन त्यानंतर जागरण कार्यक्रम होणार आहे.या सप्ताहासाठी डॉ. मोहितकुमार जोहरे, केदारनाथ खताळ, अर्जुन रावळकर, दिलीप रावणे, तान्हाजी जाधव, कृष्णा पंडित, पुल्लेवाद, गोपाल सोहनी, त्र्यंबक कुर्लेकर, ह.भ.प. अविनाश महाराज, ह.भ.प. दीपक महाराज थोरात, ह.भ.प. गौतम महाराज गुजर चोपदार, तान्हाजी गायकवाड, ह.भ.प. सोनाजी पिसाळ, ह.भ.प. महेंद्र पिंगळवार, ह.भ.प. कृष्णा कळवत्रे, प्रविण जैस्वाल आदी परिश्रम घेत आहेत

## धनादेश अनादरापोटी आरोपीस १५ लाख रुपये दंड

दंड न भरल्यास सहा महिने कारावासाची शिक्षा



**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

हातउसने घेतलेले पैसे परत करण्यासाठी दिलेला धनादेश वटला नाही, तसेच कायद्यातील तरतुदीनुसार प्रक्रियेचा अवलंब करूनही आरोपीने न वटलेल्या धनादेशाचे पैसे निर्धारित वेळेत फिर्यादीस दिले नाहीत. त्यामुळे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी डॉ. ए. एस. भासरकर यांनी पराक्राम्य अभिलेख कायद्याच्या कलम १३८ अन्वये आरोपी सुवर्णा संजय मनगटे हिला नुकताच १५ लाख रुपये दंड ठोठावला. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीला ६ महिने कारावास भोगावा लागेल, असे आदेशात म्हटले आहे. दंडाची रक्कम वसूल झाल्यास अपिलाच्या मुदतीनंतर भरपाई म्हणून तक्रारदारास देण्याचेही आदेशात म्हटले आहे. सुवर्णा मनगटे यांनी तक्रारदार सचिन रगडे यांच्याकडून एक महिन्यात परत करण्याच्या अटीवर १० लाख रुपये हातऊसने घेतले होते. हे पैसे परत करण्यासाठी त्या महिलेने दिलेला धनादेश तिच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने परत आला.

तक्रारदाराने ॲड. रवींद्र दाभाडे यांच्यामार्फत आरोपीला कायदेशीर नोटीस बजावून १५ दिवसांचा वेळ दिला. मात्र, तिने वेळेत रक्कम परत केली नाही. म्हणून पराक्राम्य अभिलेख कायद्याच्या कलम १३८ अन्वये न्यायालयात तक्रार दाखल होती. ॲड. दाभाडे यांना ॲड. उमेश दाभाडे यांनी सहकार्य केले.

## सोयगाव येथील जिल्हा परिषद शाळेत कर्तृत्ववान महिलांचा सत्कार




**सोयगाव / प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शनिवार, ७ मार्च रोजी कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ, माता रमाई आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शनिवारी झालेल्या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या पुष्पा काळे, सोयगावच्या नगराध्यक्षा आशाबी तडवी, पंचायत समिती सदस्या सविता गव्हाडे, नगरसेविका कुसूम दुतोंडे, माजी विद्यार्थिनी निशा पगार, तहसील कार्यालयातील वरिष्ठ लिपिक उज्वला वामने, पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी दौड, गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे, सोयगाव केंद्र प्रमुख फिरोज तडवी आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ. दिपाली निकुंभ (अंबाजोगाई), डॉ. सोनाली निकुंभ (चिकलठाणा), चारुशिला पाटील (स्वीय सहाय्यक, मंत्रालय मुंबई), प्राजक्ता रोकडे, डॉ. ज्योती पंडीत (वैद्यकीय अधिकारी),प्रीती दामधर (करनिरीक्षक, न.पा.) यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद सदस्या पुष्पा काळे, निशा पगारे यांच्या हस्ते इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या १७ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी राजू दुतोंडे, सुनिल गावंडे, विजय काळे, अंकुश पगारे, मयूर मनगटे, प्रशांत जाधव, शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, सुरेखा चौधरी, पंकज रगडे, मंगला बोरसे, रामचंद्र महाकाळ, सविता पाटील, गणेश बाविस्कर, प्रतिभा कोळी, अंकुश काळे, विवेक महाजन, अनिल देसाई, तान्हाजी चव्हाण, शुभम देसले, पुनम लाड आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा कोळी यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सविता पाटील यांनी मानले.

## 'गर्भाशयाचा कॅन्सर टाळण्यासाठी एच.पी.व्ही लसीकरण महत्वाचे'



**लासूर स्टेशन / प्रतिनिधी**

महिला आणि मुलींमध्ये गर्भाशयमुखाच्या कॅन्सरची लक्षणे वाढत असून गर्भाशयमुखाचा कॅन्सर टाळण्यासाठी एच.पी.व्ही. लसीकरण महत्वाचे असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी शनिवार, ७ मार्च रोजी दिली.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे शनिवारी गांधीभवन येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सानप, पत्रकार अन्वर शेख, धरमसिंग बिमरोट, बापू सोमासे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी सर्व्हायव्हल कॅन्सर, गर्भाशय मुखाचा कॅन्सर आणि एच.पी.व्ही. लसीकरण या विषयावर मार्गदर्शन केले.सर्व आरोग्य केंद्रावर एच.पी.व्ही. लस १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींना दिल्या जात असून रविवार, ८ मार्च रोजी पासून ही लस सर्व महिला व मुलींना देण्यात येणार आहे. या लसीचे कोणतेही दुष्परिणाम नसून सर्वांनी लसीकरण करुन घ्यावे असे आवाहन यावेळी डॉ. अभय धानोरकर यांनी केले.

## नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**वैजापूर / प्रतिनिधी**

सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने गळफास लावून घेत आत्महत्या केली. ही घटना शुक्रवार, ६ मार्च रोजी वैजापूर तालुक्यातील पोखरी या गावात घडली. कृष्णा कारभारी ठुबे (५८ वर्ष) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

कृष्णा ठुबे हे सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे नैराश्यात आले होते. आर्थिक विवंचेनेला कंटाळून कृष्णा ठुबे यांनी शुक्रवारी सकाळी शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने बांधून गळफास लावून घेत आत्महत्या केली. हा प्रकार त्यांच्या कुटुंबियांच्या लक्षात आल्यावर नातेवाईकांनी ग्रामस्थांच्या मदतीने कृष्णा ठुबे यांना फासावरुन उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शिऊर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता, वैद्यकीय अधिकारी डॉ. अलीया अन्सारी यांनी कृष्णा ठुबे यांना तपासून मयत घोषीत केले. याप्रकरणी शिऊर पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**गंगापूर / प्रतिनिधी**

कापड दुकानातील उधारीच्या पैशांच्या वसुलीसाठी आलेल्या दोघांनी महिलेसोबत अश्लील वर्तन करून तिचा विनयभंग केला. ही घटना गुरुवार, ५ मार्च रोजी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरुन विनयभंग करणाऱ्या दोन जणांविरुध्द गंगापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, चेतन कोल्हापुरे, अब्दुल शेख रहमान शेख, दोघे रा. छत्रपती संभाजीनगर, अशी आरोपींची नावे आहेत. पीडितेच्या पतीने नोव्हेंबर २०२५ मध्ये चेतन कोल्हापुरे आणि अब्दुल शेख रहमान शेख यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर येथून ९० हजार रुपयांच्या साड्या उधारीवर आणल्या होत्या. गुरुवारी चेतन कोल्हापुरे आणि अब्दुल शेख रहमान शेख हे दोघेही वसूलीसाठी पीडितेच्या दुकानात गेले. त्यावेळी पीडितेने आपले पती बाहेरगावी गेले असल्याचे सांगितले. त्यानंतर चेतन कोल्हापुरे आणि अब्दुल शेख रहमान शेख यांनी दुकानातील साड्या काढण्यास सुरुवात केली.

यावेळी पीडित महिलेने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता चेतन कोल्हापुरे आणि अब्दुल शेख रहमान शेख यांनी पीडितेच्या साडीवर पाय ठेवून तिच्यासोबत अश्लील वर्तन करीत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. पीडितेने आरडाओरड केल्यानंतर शेजारील नागरिक पीडितेच्या मदतीला धावून आले. त्यानंतर पीडितेने पोलिसांशी संपर्क साधून त्यांना पाचारण केले होते.

### वेरूळ येथे महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात

**खुलताबाद :** वेरूळ येथे महसूल विभागाच्या वतीने शनिवार, ७ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न झाले. शासकीय योजनांचा लाभशेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हे प्रशासनाचे मुख्य ध्येय असल्याचे उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी सांगितले.

महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन तहसीलदार संतोष गुट्टे यांनी केले.

कृषी सहसंचालकांची शासनाकडे मागणी

# विविध योजनांतून शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी ४०४ कोटी रुपयांची गरज



#### १४ कोटी रुपयांचे वाटप

■ फलोत्पादन योजनेसाठी अर्ज केलेल्या विभागातील शेतकऱ्यांसाठी २२ कोटी रुपये मंजूर झाले होते. यापैकी ८० कोटी रुपये शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य एकात्मिक फलोत्पादन अभियानांतर्गत २६ कोटी ६५ लाख रुपये विभागाला प्राप्त झाले होते. यापैकी कालपर्यंत १४ कोटी ४७ लाख रुपये शेतकऱ्यांना अदा करण्यात आले असल्याचे विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी सांगितले.

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी २६२ कोटी रुपये आणि ठिबक सिंचन, तुषार सिंचन योजनेच्या लाभार्थ्यार्थ्यांसाड़ी १४२ कोटी असे एकूण ४०४ कोटी रुपयांचे अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना देणे आहे. यासाठी विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने ४०४ कोटींची मागणी केली आहे.

कृषी यांत्रिकिकरण, एकात्मिक फलोत्पादन योजना, निसर्गाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांनी कृषी यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन योजना अशा कितीतरी योजना राबविण्यात येतात. प्रत्येक योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येते. येथील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयांतर्गत छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या तीन जिल्ह्यांचा समावेश होता. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी अभियांत्रीकरण योजनेतून ट्रॅक्टर, कृषी औजारे खरेदीसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केले होते. पडताळणीनंतर शेतकऱ्यांना रक्कम अदा करण्यात येते. यानुसार राज्य व केंद्र सरकारच्या कृषी अभियांत्रिकी अभियानांतर्गत अपलोड केलेल्या शेतकऱ्यांसाठी ३८२ कोटी रुपये शासनाने मंजूर केले होते. यापैकी ३८२ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अदा केल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी दिली.तर कृषी अभियांत्रिकीचा लाभ घेतलेल्या बिल शेतकऱ्यांच्या अनुदानासाठी आणखी २६२ कोटी रुपयांची मागणी शासनाकडे नोंदविण्यात आली आहे. हे अनुदान वर्ष २०२४-२५ वर्षातील आहे.

वर्ष २०२५-२६ वर्षात सूक्ष्म सिंचन योजनेतून अर्ज केलेल्या ४९ हजार ५३० शेतकऱ्यांपैकी ३२ हजार ४५४ शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी १४२ कोटी रुपयांची शासनाकडे मागणी केली आहे. हे अनुदान मार्चअखेरपर्यंत प्राप्त होणार असल्याचे विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी सांगितले.

दैनिक महाभूमि

सोमवार । ९ मार्च २०२६

jalnabhoomi@gmail.com

# जालना भूमि

## न्यूज ब्रीफ



### आयपीएसला गवसणी घालणाऱ्या रोजेकरचा सत्कार

**धावडा :** भोकरदन तालुक्यातील जळगाव सपकाळ येथील सालगड्याचा मुलगा भिकन जगन रोजेकर याने कठोर मेहनत आणि जिद्दीच्या आयपीएस या केंद्रीय परीक्षेत उत्तीर्ण होत यशाला गवसणी घातली. त्याचे हे यश ग्रामीण भागातील गरीब कष्टकरी तरूणांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. भोकरदन तालुक्यातील वाढोणा येथील भोयारेश्वर विद्यालयाचे प्राचार्य व पिंपळगाव रेणुकाई भाजपचे मंडळ तालुकाध्यक्ष प्रा.गणेश इंगळे यांच्यावतीने जळगाव सपकाळ येथे त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दामू सपकाळ, माजी सरपंच, प्रा.दीपक सपकाळ, प्रा इंगळे, वाढोणा गावचे पोलिस पाटील संतोष जाधव, रोहिदास चिकटे, राजू सोनवणे, अरुण गवळी, समाधान वाघ, विकास सपकाळ, रामेश्वर रोजेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### उत्सव समिती अध्यक्षपदी वानखेडे

**जालना :** शहरातील रामनगर येथील आराध्य दैवत जागृत हनुमान बारागाड्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी बाबासाहेब वानखेडे यांची एकमताने निवड करण्यात आली. समितीच्या उर्वरीत कार्यकारिणीत सचिवपदी रामेश्वर सुरसे, कार्याध्यक्षपदी चरणदास महंत, उपाध्यक्षपदी भवगान गाडेकर, म्हसुजी वानखेडे, संदीप वानखेडे यांची निवड झाली. येत्या २ एप्रिल रोजी जागृत दक्षिणमुखी घनतृप्त हनुमान मंदिरसमोर ५ वाजता बारागाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी आ.अर्जुन खोतकर, माजी आमदार कैलाश गोरंट्याल, भास्कर दानवे, भास्कर अंबेकर, उपमहापौर राजेश राऊत, डॉ. विशाल धानुरे, अमोल धानुरे, विष्णु पाचफुले, ॲड.बी.एम. कुलकर्णी, भगवानराव गाडेकर, सुरेश रत्नपारखे, धनराज लोंढे, शंकर वानखेडे, पांडुरंग वानखेडे, वैजीनाथ नागरे, भागुजी वानखेडे, संतोष वानखेडे, निलेश वानखेडे, रामु वानखेडे, अशोक वाघमारे आदींनी योगदान दिले आहे.

### देवमूर्ती येथे कृषी योजनांबाबत मार्गदर्शन

**जालना :** तालुक्यातील देवमूर्ती येथे शनिवार, ७ मार्च रोजी महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरास उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मनिषा देशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात विविध विभागांचे माहितीपर स्टॉल उभारण्यात आले होते. यावेळी मान्यवरांनी कृषी विभागाच्या स्टॉलला भेट देऊन कृषी योजनांचा आढावा घेतला. कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा समुग्रह अनुदान योजना, पीएम किसान योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, ॲग्रिस्टॅक तसेच इतर विविध कृषी योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

### अशासकीय सदस्यांची निवड

**धावडा :** संजय गांधी निराधार योजनेच्या तालुकास्तरीय समितीवर अशासकीय सदस्य म्हणून वालसावंगी येथील बालाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब कोथलकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैशाली मनीष गवळी व श्री क्षेत्र जाळीचादेव येथील मधुकर पुजदेकर यांची नियुक्ती करण्यात आली.

उच्च न्यायालयाने बजावली नोटीस ▸ भाऊसाहेब गोरेंची रीट याचिका

# पालकमंत्री, जिल्हाधिकाऱ्यांचा मनमानी कारभार!

**जालना / प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समितीची रचना नियमबाह्य पद्धतीने करण्यात आल्याचा तसेच पंचायत राज संस्थांच्या शिफारशींकडे दुर्लक्ष करून निधी व विकासकामांचे वाटप मनमानी पद्धतीने केल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेची दखल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने घेतली आहे. या प्रकरणात राज्य शासन, जालन्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे, विभागीय आयुक्त, जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी मिन्नू पी. एम., तसेच जिल्हा नियोजन समितीचे प्रमुख अधिकारी आणि सरचिटणीस आदींना नोटीस बजावण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.

मंठा येथील भाऊसाहेब गोरे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती विभा कणकणवाडी आणि न्यायमूर्ती हितेन वेनेगावकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस बजावत त्यांना निश्चित मुदतीत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

याचिकेत नमूद केल्याप्रमाणे जालना जिल्हा नियोजन समितीची रचना महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती कायदा १९९८ मधील कलम ३ नुसार करण्यात आलेली नाही. त्यामुळे ही समिती कायदेशीर चौकटीबाहेर कार्यरत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याशिवाय जिल्हा परिषद व इतर पंचायत राज संस्थांनी सुचविलेल्या विकासकामांच्या प्रस्तावांकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करून पालकमंत्री पंकजा मुंडे व जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्वतःच्या मर्जीप्रमाणे कामांची निवड केल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आलेल्या प्रस्तावांना डावलून काही निवडक कामांना निधी मंजूर करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे निधीचे वाटप पारदर्शक पद्धतीने न होता तो मर्जीतील व्यक्ती व संस्थांच्या कामांसाठी वापरला जात असल्याचा मुद्दा याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिलेले निधी वाटपाचे आदेश रद्द करण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. दरम्यान, या याचिकेमुळे जिल्हा नियोजन समितीतील अनियमितता आणि निधीच्या वाटपातील गोंधळ पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याशिवाय पालकमंत्री पंकजा मुंडे या जिल्ह्यात केवळ झेंडा वंदन आणि डिपीडीसीच्या बैठकीपूर्त्याच जालन्यात येतात, असा आरोप सातत्याने करण्यात येतो. आता न्यायालयाने नोटीस बजावल्यामुळे या आरोपांना अधिक पुष्टी मिळाल्याचे दिसत आहे.




### याचिकाकर्ते आणि त्यांचा आरोप

■ याचिकाकर्ते भाऊसाहेब गोरे हे जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील राजकीय कार्यकर्ते असून ते अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे परतूर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी पूर्वी जिल्हा नियोजन समितीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून काम पाहिले आहे. तसेच ते मंठा तालुका सहकारी खरेदी–विक्री संघाचे अध्यक्षही आहेत. गोरे यांच्या म्हणण्यानुसार जिल्हा नियोजन समितीचा निधी वितरित करताना किमान दहा स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाठवलेल्या प्रस्तावांकडे दुर्लक्ष करण्यात आले. उलट समितीतील निर्णयप्रक्रियेत काही जवळच्या व मर्जीतील व्यक्तींनाच प्राधान्य देण्यात आले, असा त्यांचा आरोप आहे. या सर्व बाबींची दखल घेत उच्च न्यायालयाने राज्य शासनासह संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावली असून या प्रकरणाकडे आता प्रशासन व राजकीय वर्तुळात विशेष लक्ष लागले आहे. न्यायालयाच्या पुढील सुनावणीत या आरोपांवर नेमकी काय भूमिका मांडली जाते, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नोटीस अजून मिळाली नाही

■ उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहायक प्रदीप कुलकर्णी यांना विचारले असता ते म्हणाले की, अद्याप अशी कोणतीही नोटीस आलेली नाही. जिल्हा नियोजन अधिकारी सूचित कुलकर्णी यांना विचारले असता, ते म्हणाले, मी दोन दिवस रजेवर होतो. मी माहिती घेऊन सांगतो.

## जामखेड येथे महाराजस्व अभियानास प्रतिसाद

**अंबड:** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग तसेच इतर सर्व तालुकास्तरीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने अंबड तालुक्यातील जामखेड येथे 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर' व 'महाराजस्व अभियान उत्साहात पार पडले. या शिबिरात नागरिकांना एकाच छताखाली महसूलसह विविध विभागांच्या १५ पेक्षा अधिक सेवांचा थेट लाभ देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांनी केले, तर आमदार नारायण कुचे यांनी उपस्थित नागरिकांना व लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.या शिबिरामध्ये ग्रामविकास, कृषी, महिला व बालकल्याण, आरोग्य, पुरवठा, निवडणूक, भूमी अभिलेख, नोंदणी (रजिस्ट्री) विभाग यांसोबतच आधार केंद्र, सेतू सुविधा आणि संजय गांधी निराधार योजना आदी प्रमुख विभागांनी सहभाग नोंदवला. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली व तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वात व नियोजनाखाली पार पडले. या शिबिरास गटविकास अधिकारी ज्योती कावडदेवी, कृषी अधिकारी गंडे, गटशिक्षणाधिकारी कवडे, नायब तहसीलदार गिरगे, किरण खांडे आदींची उपस्थिती होती.

# शेतकरीकन्या वैष्णवी माने बनली एक दिवसाची कार्यकारी संचालक

महिला दिनी जालन्यात प्रेरणादायी उपक्रम

**जालना / प्रतिनिधी**


जागतिक महिला दिनानिमित्त जालन्यातील उद्योग क्षेत्रातून एक प्रेरणादायी आणि वेगळा उपक्रम राबविण्यात आला. येथील विनोदराय इंजिनियरिंग या उद्योगसमूहाने अंबड तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थिनी वैष्णवी माने हिला एक दिवसासाठी कंपनीच्या कार्यकारी संचालकपदाची जबाबदारी देत महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश दिला.

वैष्णवी माने ही अंबड तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील असून सध्या ती खरपूडी येथील कृषी विज्ञान केंद्रात कार्यरत बळीराजा इज्युकेशन फाउंडेशनच्या वसतिगृहात राहून अकरावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहे. ग्रामीण भागातील मुलींनी शिक्षणाबरोबरच उद्योग आणि स्वउद्योग क्षेत्रातही पुढे यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामागे कंपनीचे कार्यकारी संचालक सुनील रायठठ्ठा यांची संकल्पना असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कंपनीत आगमन झाल्यानंतर वैष्णवी माने हिचे स्वागत संचालक शैला रायठठ्ठा आणि दिव्या रायठठ्ठा यांनी केले. एक दिवसाच्या कार्यकारी संचालक म्हणून वैष्णवीने कंपनीच्या विविध विभागांचा सविस्तर आढावा घेतला. उत्पादन, विक्री आणि खरेदी विभागातील कामकाज समजून घेत कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. तसेच विविध विभागांच्या बैठकींमध्ये सहभागी होत कामकाजाची माहितीही घेतली.महिलांमध्येही उद्योग उभारण्याची मोठी क्षमता आहे, याची जाणीव आजच्या अनुभवातून झाल्याचेही तिने नमूद केले. महिला दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातून कौतुक होत असून ग्रामीण भागातील मुलींना उद्योग क्षेत्राची प्रेरणा देणारा हा आदर्श उपक्रम ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### माझ्यासाठी प्रेरणादायी अनुभव

■ उद्योग क्षेत्राबद्दलचा अनुभव व्यक्त करताना वैष्णवी माने म्हणाली की, या उद्योगसमूहातून तयार होणारी अत्याधुनिक यंत्रसामग्री जगातील सत्तरहून अधिक देशांमध्ये पाठविली जाते. भारतातील अनेक राज्यांमध्ये इमारतींवर बसविल्या जाणाऱ्या पाण्याच्या टाक्या तयार करणाऱ्या यंत्रांचे उत्पादन येथे केले जाते. इतका मोठा उद्योग प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी वेगळा आणि प्रेरणादायी अनुभव असल्याचे तिने सांगितले.



# माता-पालक, किशोरी मेळावा उत्साहात

**परतूर/प्रतिनिधी**



बेटी बचाओ बेटी पढाओ या केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत तसेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने तालुक्यातील आंबा येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात रविवार, ८ मार्च रोजी माता-पालक व किशोरी मेळावा उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी डॉ. भरत वानखेडे हे होते. यावेळी एसटी आगार प्रमुख माधुरी देशमुख यांनी विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षा व करिअर संधी तर डॉ. अनुजा बिनगे यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. आशा मगरे यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. केंद्रप्रमुख एस.एम.थोटे यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे महत्त्व सांगितले. डॉ. स्मिता रोडगे यांनी यशस्वी जीवनासाठी आवश्यक असलेले गुण व मार्गदर्शन केले. तसेच आशा शिंदे यांनी कवितेद्वारे विद्यार्थिनींशी संवाद साधत प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. यावेळी स्त्री सुरक्षा विषयावर पथनाट्य, महिला सक्षमीकरण व लिंग समभाव या विषयांवर आधारित नाटिका व नृत्य सादर करण्यात आले. तसेच बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानांतर्गत चित्रकला व घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ. भरत वानखेडे यांनी मुलींचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षा व प्रशासकीय सेवांमधील संधी यावर प्रकाश टाकला. मुली आज विविध क्षेत्रांत यश मिळवत असल्याचे सांगत त्यांनी जालना जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच एसटी आगार प्रमुख यांसारख्या पदांवर महिला कार्यरत असल्याची उदाहरणे दिली.

# जगदंबा देवी स्वारीचा उत्सव भक्तीभावात संपन्न

**धावडा/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील धावडा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही आई जगदंबा देवीच्या स्वारीचा पारंपरिक उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. गावातील प्राचीन परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक असलेल्या या उत्सवाला यंदाही मोठ्या प्रमाणात भाविकांची उपस्थिती लाभली.

उत्सवाच्या निमित्ताने सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. आई जगदंबा देवीची विधीवत पूजा-अर्चा, आरती आणि धार्मिक विधी पार पडल्यानंतर देवीची भव्य स्वारी गावातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, जयघोष आणि उत्साहाच्या वातावरणात ही स्वारी पार पडली. ''बोल अंबा भवानी की की जय'' अशा घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले होते. यावर्षी नेहमीप्रमाणे आई जगदंबा देवीचे सोंग सचिन बेलआप्पा पिसोळे यांनी घेतले, तर चोराचे सोंग जयराम टेंभरे यांनी साकारले. या दोन्ही सोंगांनी भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. याशिवाय गावातील अनेक तरुणांनी विविध पारंपरिक आणि धार्मिक सोंगे सादर करून उत्सवाची शोभा अधिक वाढवली. या सोंगांच्या माध्यमातून गावाची सांस्कृतिक परंपरा आणि लोककला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्वारीच्या दर्शनासाठी धावडा गावासह भोकरदन तालुका आणि विविध भागांतून हजारो भाविक दाखल झाले होते. महिला, पुरुष, तरुण-तरुणी तसेच लहान मुले आणि लेकीबाळीसह कुटुंबांनी देवीचे दर्शन घेऊन मनोभावे प्रार्थना केली. मंदिर परिसर आणि गावातील मुख्य रस्ते भाविकांनी फुलून गेले होते. उत्सव समितीचे धावडा माजी सरपंच बेलअप्पा पिसोळे आणि दिलीप गुरव यांनी सांगितले की, आई जगदंबा देवीच्या कृपेने यंदाचा स्वारी उत्सव अत्यंत उत्साहात आणि सुरळीत पार पडला.

रेखा मैंद यांच्या जिद्दीचा प्रेरणादायी प्रवास

# गरिबीशी दोन हात करत घडवला 'देशाचा रक्षक'

**सुरेश गिराम**

**भोकरदन :** प्रतिकूल परिस्थिती माणसाला खचवू शकते; मात्र जिद्द, चिकाटी आणि कष्टाची तयारी असेल तर तीच परिस्थिती यशाचा मार्ग दाखवते. याचे जिवंत उदाहरण म्हणजे भोकरदन तालुक्यातील रेखा रमेश मैंद यांचा संघर्षमय जीवनप्रवास होय. अत्यंत गरिबीत संसाराची सुरुवात करून त्यांनी प्रचंड मेहनत आणि जिद्दीच्या बळावर मुलाला देशसेवेसाठी तयार केले. आज त्यांचा मुलगा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलात जवान म्हणून निवडला गेला असून प्रशिक्षणासाठी चेन्नई येथे रवाना झाला आहे.

रेखा मैंद यांचा संसार २००१ साली अवघ्या १८ व्या वर्षी सुरू झाला. माहेरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. एका साडीवर आणि चार रुमालांवर त्यांचे लग्न पार पडले. सासरीही परिस्थिती फारशी वेगळी नव्हती. मात्र रेखा आणि त्यांचे पती रमेश मैंद यांनी परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. कष्टालाच त्यांनी आपली खरी ताकद मानले.

उदरनिर्वाहासाठी रमेश मैंद यांनी आठवडी बाजारात हातगाडीवर केळी व टरबूज विकले. तर रेखा मैंद यांनी शेतात मजुरी करत संसाराला हातभार लावला. याशिवाय त्यांनी घरातून शिवणकाम केले, तसेच मंदिराजवळ हार-फुले, प्रसाद आणि पूजेसाठी लागणाऱ्या वस्तूंची विक्री करून चार पैसे साठवले. दोघांच्या अथक परिश्रमातून त्यांनी छोटेखानी किराणा टपरी सुरू केली आणि पत्र्याच्या शेडमधून स्वतःचे छोटेसे घर उभे केले. रेखा मैंद यांना तीन मुले असून मुलगी नसल्याची खंत त्यांनी कधीही बाळगली नाही. उलट तिन्ही मुलांनी आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत घरकामातही हातभार लावला. अखेर या कष्टाचे फळ मिळाले आणि त्यांचा मुलगा एसएससी जीडी परीक्षेत यश मिळवून केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलात जवान म्हणून निवडला गेला. मुलगा सैन्यात देशाची सेवेत काम करीत असल्याचे पाहून रेखा यांनी जीवनात उपसलेल्या कष्टांचे चीज झाल्याची अनुभूती आली आहे. अपार मेहनत आणि कष्टांची आज फुले झाल्याची आज त्यांची भावना आहे. गरिबीतून उभा राहिलेला हा संघर्षमय प्रवास आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कष्ट, प्रामाणिकपणा आणि चिकाटी यांच्या जोरावर कोणतीही परिस्थिती बदलता येते, हे रेखा मैंद यांनी आपल्या आयुष्यातून सिद्ध करून दाखवले आहे.



### कष्टाला कमी लेखले नाही

''२००१ साली वडिलांनी मोठ्या कष्टाने माझे लग्न लावून दिले. एका साडीवर आणि चार रुमालांवर मी सासरी आले होते. त्या दिवसांची आठवण आजही डोळ्यासमोर उभी राहते. आम्ही दोघांनी कष्टाला कधी कमी लेखले नाही. मंदिरात फुले विकली, शिवणकाम केले आणि संसार सावरला. आज माझ्या मुलाच्या अंगावर देशसेवेची वर्दी पाहते तेव्हा वाटते, त्या एका साडीचा प्रवास आज सन्मानाच्या वर्दीपर्यंत पोहोचला आहे.''



– रेखा मैंद

# कवी अशोक नायगावकर यांना 'दुःखी' राज्य काव्य पुरस्कार

मीनाक्षी पाटील यांना ना. धों. महानोर राज्य पुरस्कार

**जालना / प्रतिनिधी**



येथील स्व. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि अनुभव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध उर्दू शायर कै. राय हरिश्चंद्र साहनी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'दुःखी' राज्य काव्य पुरस्कार यंदा ठाणे येथील ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांना जाहीर करण्यात आला आहे. यंदा या पुरस्काराचे २८ वे वर्ष असून २५ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. त्याचबरोबर 'ना. धों. महानोर राज्य पुरस्कार' मुंबई येथील कवयित्री व ललित लेखिका मीनाक्षी पाटील यांना घोषित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप १० हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे आहे.

या दोन्ही पुरस्कारांचे वितरण गुढीपाडव्याच्या दिवशी, गुरुवार, १९ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता जालना येथे होणाऱ्या 'कवितेचा पाडवा' या लोकप्रिय साहित्यिक कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरणानंतर निमंत्रित कवींची काव्यमैफलही रंगणार आहे. या पुरस्कारांची घोषणा रविवार, ८ मार्च रोजी आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. यावेळी संयोजक अभय साहनी, विनीत साहनी, लेखिका व कवयित्री डॉ. संजीवनी तडेगांवकर तसेच अनुभव प्रतिष्ठानचे सचिव पंडितराव तडेगांवकर उपस्थित होते. या पुरस्कारांच्या माध्यमातून राज्यातील दर्जेदार काव्य व साहित्यनिर्मिती करणाऱ्या कवी-साहित्यिकांचा गौरव करण्यात येतो.

## टी-२० मध्ये संजू-अभिषेकचा नवा विक्रम

# धमाकेदार सुरुवातीसह पॉवर प्लेमध्ये विक्रमी भागीदारी

**अहमदाबाद, वृत्तसंस्था**

नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगलेल्या फायनलमध्ये संजू सॅमसन आणि अभिषेक शर्माने भारतीय संघाला धमाकेदार सुरुवात करुन दिली. या जोडीने पॉवर प्लेमध्येच विक्रमी भागीदारी रचत न्यूझीलंडच्या गोलंदाजांचे खांदे पाडल्याचे पाहायला मिळाले. अभिषेक शर्माने अवघ्या १८ चेंडूत अर्धशतक झळकावले. दुसऱ्या बाजूला संजूनेही धमाकेदार फटकेबाजीचा नजराणा पेश केला.

या दोघांनी पॉवर प्लेमध्ये ९२ धावा केल्या. वर्ल्ड कप स्पर्धेतील पॉवर प्लेमधील ही सर्वोच्च धावसंख्या ठरली. त्याआधी त्यांनी टीमकडून सर्वात जलद अर्धशतकाचा रेकॉर्डही नोंदवला.



### पाकिस्तानी जोडीचा विक्रम मोडीत

■ संजू आणि अभिषेक शर्मा या जोडीने पहिल्या षटकातच संघाच्या धावफलकावर ५० धावा लावल्या. भारताकडून २०२१ नंतर पहिल्यांदाच सलामी जोडीने अर्धशतकी भागीदारी रचली. एवढेच नाही तर टी-२० वर्ल्ड कपच्या धावांची सर्वोच्च भागीदारी ठरली. या आधी २००९ च्या हंगामात कामरान अकमल आणि शाहझाईब हसन या जोडीने ४८ धावांची भागीदारी केल्याचा रेकॉर्ड होता.

## २८ मार्चपासून सुरू होणार आयपीएल

**मुंबई :** आयपीएल २०२६ ची सुरुवात २८ मार्च रोजी होणार आहे. रविवारी टी-२० विश्वचषक फायनलपूर्वी याची घोषणा करण्यात आली. आधी स्पर्धेची सुरुवात २६ मार्चपासून होणार होती. तमिळनाडू, केरळ, आसाम, पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरीमध्ये होणाऱ्या निवडणूक कार्यक्रमामुळे लीगच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. मात्र अद्याप आयपीएल कडून अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले नाही. त्यामुळे चाहत्यांना संपूर्ण शेड्यूलची प्रतीक्षा अजूनही करावी लागत आहे. निवडणुकांच्या तारखा निश्चित झाल्यानंतरच आयपीएलचे अधिकृत वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे. प्रसारकाने स्पर्धेच्या सुरुवातीची तारीख जाहीर केली असली तरी पूर्ण शेड्यूलची प्रतीक्षा कायम आहे.

### मध्य-पूर्वेतील तणावामुळे आयसीसीची दोहा बैठक स्थगित

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने २५ ते २७ मार्च दरम्यान दोहा (कतार) येथे होणारी बोर्ड आणि समिती बैठक सध्या पुढे ढकलली आहे. आता ही बैठक एप्रिलमध्ये होण्याची शक्यता आहे, मात्र नवीन तारीख अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. अहवालानुसार, मध्य-पूर्व प्रदेशात सुरू असलेला तणाव आणि सुरक्षा परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. आयसीसीने आपल्या सदस्य मंडळांना याबद्दल अधिकृत माहिती दिली आहे. ही बैठक आयसीसीच्या गव्हर्नन्स कॅलेंडरचा भाग होती, ज्यात बोर्ड डायरेक्टर्स, बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, समिती सदस्य आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार होते.

या बैठकीत जागतिक क्रिकेटशी संबंधित अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर आणि भविष्यातील योजनांवर चर्चा होणार होती. यापूर्वी, आयसीसीने २२ फेब्रुवारी रोजी घोषणा केली होती की बैठक दोहा येथे आयोजित केली जाईल, कारण कतारमध्ये क्रिकेटचा विकास आणि तेथील क्रीडा परिसंस्थेशी आयसीसीची भागीदारी वेगाने वाढत आहे. सध्या, आयसीसी नवीन ठिकाण आणि तारखेवर विचार करत आहे. परिस्थिती सामान्य झाल्यावर एप्रिलमध्ये ही बैठक आयोजित केली जाऊ शकते, असे मानले जात आहे.




# घटस्फोट वादावर पहिल्यांदा बोलला विजय

साउथ अभिनेता आणि राजकारणी थलपती विजय सध्या घटस्फोटामुळे वादात आहे. त्याच्या पत्नीने विवाहबाह्य संबंधांचा आरोप करत घटस्फोटासाठी अर्ज केला आहे आणि आता पोटगीचीही चर्चा आहे. यादरम्यान, अभिनेत्याने पहिल्यांदाच या संपूर्ण वादावर सार्वजनिकरित्या भाष्य केले आहे. त्याने चाहत्यांना सांगितले आहे की त्याच्या वैयक्तिक आयुष्यात सुरू असलेल्या समस्या तो स्वतः सोडवेल, यात वेळ वाया घालवण्याची गरज नाही.

थलपती विजय नुकताच चेन्नईमध्ये त्याच्या तमिळगा वेत्री कडगम या राजकीय पक्षाच्या महिला दिन कार्यक्रमात सहभागी झाला होता. यावेळी त्याने तेथे उपस्थित असलेल्या सर्व चाहत्यांना संबोधित करताना घटस्फोटाच्या वादावर म्हटले, ''अलीकडे माझ्या आजूबाजूला ज्या समस्या सुरू आहेत, कृपया त्यांची चिंता करू नका. त्या गोष्टी तुमच्या वेळेस पात्र नाहीत. मी त्या स्वतः सांभाळीन.'' पुढे अभिनेत्याने म्हटले, ''मला सर्वात जास्त दुःख तेव्हा होते जेव्हा मी पाहतो की माझ्यामुळे तुम्ही दुःखी किंवा अस्वस्थ होता. कृपया माझ्या समस्यांचा भार स्वतःवर घेऊ नका.'' थलपती विजयची पत्नी संगीता सोरनालिंगमने नुकताच घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. तिने आरोप केले आहेत की विजयचे विवाहबाह्य संबंध सुरू आहेत, जे त्यांच्या घटस्फोटाचे कारण आहे.



# महिला कसोटीत ऑस्ट्रेलियाचा १० विकेट्सने विजय




### सदरलँडने १२९ धावा केल्या

■ पहिल्या डावात ऑस्ट्रेलिया संघाच्या ३ फलंदाज केवळ ५८ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतल्या होत्या. येथून सदरलँडने डाव सांभाळला आणि एलिस पेरीसोबत मिळून चौथ्या विकेटसाठी १६९ चेंडूंमध्ये १२८ धावांची भागीदारी केली. पेरी ११६ चेंडूंमध्ये ७६ धावा करून बाद झाली. यानंतर सदरलँडने बेथ मुनीसोबत मिळून पाचव्या विकेटसाठी ५४ धावांची भागीदारी केली. सदरलँडने १७१ चेंडूंमध्ये १२९ धावांची खेळी केली.

**पर्थ, वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाला कसोटीत २० वर्षांनंतर पराभवाला सामोरे जावे लागले आहे. ऑस्ट्रेलियाने कर्णधार एलिसा हिलीच्या शेवटच्या सामन्यात त्यांना १० गडी राखून हरवले. भारतीय संघाला शेवटचा पराभव ८ ऑगस्ट २००६ रोजी ॲडलेडच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्धच मिळाला होता. पर्थच्या वाका मैदानावर रविवारी यजमानांना केवळ २५ धावांचे लक्ष्य मिळाले होते, जे त्यांनी ४.३ षटकांत एकही विकेट न गमावता पूर्ण केले. जॉर्जिया वॉल १६ आणि फोबी लीचफील्ड ११ धावा करून नाबाद परतल्या. भारतीय संघाने १०५ धावांवरून दिवसाची सुरुवात केली आणि १४९ धावांवर सर्वबाद झाला. यापूर्वी ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३२३ धावा केल्या होत्या, तर भारतीय संघ पहिल्या डावात १९८ धावांवर सर्वबाद झाला. ऑस्ट्रेलियाला पहिल्या डावाच्या आधारावर १२५ धावांची आघाडी मिळाली. ॲनाबेल सदरलँड सामनावीर ठरली. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी प्रतिका रावलने ४३ धावा आणि स्नेह राणाने १४ धावा करून आपल्या-आपल्या खेळीला पुढे नेले. या दोघी बाद झाल्यानंतर संघाला सर्वबाद होण्यास वेळ लागला नाही. संघाने शेवटच्या ४४ धावा करताना ४ बळी गमावले. संघाला केवळ २४ धावांची आघाडी मिळाली. ऑस्ट्रेलियाच्या लुसी हॅमिल्टनने ३ बळी घेतले. ॲनाबेल सदरलँड, अलाना किंग आणि ॲश्ले गार्डनरने प्रत्येकी २ बळी घेतले. नंबर-३ वर फलंदाजी करणाऱ्या प्रतिका रावलने तिच्या पदार्पणाच्या कसोटीत अर्धशतक झळकावले. तिने दिवसाच्या ५ व्या षटकात अलान किंगच्या चौथ्या चेंडूवर सिंगल घेऊन अर्धशतक पूर्ण केले. प्रतिकाने पहिल्या डावात १८ धावा केल्या होत्या.


# शाहिद कपूरच्या 'फर्जी २'ची शूटिंग सुरु



बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूरची ''फर्जी'' ही वेब सिरीज चांगलीच गाजली होती. ही सिरीज २०२३ मध्ये ओटीटीवर प्रदर्शित झाली, ज्यामुळे शाहिदचा ओटीटी डेब्यू देखील झाला होता. बऱ्याच काळापासून लोक ''फर्जी'' च्या दुसऱ्या सीझनची चर्चा करत आहेत. दरम्यान, ''फर्जी २'' च्या सेटवरील काही फोटो समोर आले आहेत. ७ मार्च रोजी, शाहिद कपूरने ''फर्जी'' च्या सेटवरील पहिले फोटो शेअर केले, जिथे त्याने ''द फॅमिली मॅन'' चित्रपट निर्माते राज आणि डीके यांच्यासोबत पुन्हा एकत्र येत असल्याची घोषणा केली. हा क्राइम ड्रामाचा दुसरा सीझन आहे. शाहिदने त्याचे पहिले फोटो इन्स्टाग्राम स्टोरीजवर पोस्ट केले. एका ब्लॅक अँड व्हाईट फोटोमध्ये तो राज आणि डीके यांच्यासोबत खोलवर संभाषण करताना दिसत आहे.

तसेच, दुसऱ्या फोटोमध्ये ''फर्जी सीझन २'' च्या स्क्रिप्टचा एक छोटासा भाग दाखवण्यात आला आहे, परंतु अधिक तपशील देण्यात आलेला नाही. शाहिदने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की तो शोच्या पहिल्या दिवसाच्या शूटिंगसाठी परतला आहे. त्याच्या व्यक्तिरेखेचा, 'सनी'चा टीझर लूक देखील शेअर केला. पहिल्या सीझनमध्ये शाहिद कपूर, विजय सेतुपती आणि राशी खन्ना मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. राज आणि डीके ''गन्स अँड रोझेस'', ''सिटाडेल: हनी बनी'', ''द फॅमिली मॅन सीझन ३'' आणि ''गुलकंडा टेल्स'' आणि ''रक्त युनिव्हर्स'' सारख्या इतर अप्रकाशित प्रकल्पांवर काम करत असल्याने सीझन २ ला उशीर झाला आहे. फर्जीला व्यापक प्रशंसा मिळाली आहे. आता 'फर्जी २' ला कसे प्रतिसाद मिळतो हे पाहणे मनोरंजक ठरणार आहे.

# दैनिक महाभूमि शब्दसंगम 903



### आडवे संकेत

१) निमंत्रण नसताना अचानक उपस्थित झालेला आगंतुक
४) शिव्यांचा वर्षाव करणे, एखाद्यावर दोषारोप करणे
७) नभोमंडळ, अवकाश
१०) आयात निर्यातीवरचा कर
११) चोरीच्या वस्तू जेथे खरेदी– विक्रीसाठी ठेवलेल्या असतात ते ठिकाण
१२) नवीन
१३) तांब्या, घागर
१५) तलवारीचा प्रहार
१६) इंग्लंडच्या पहिल्या पंतप्रधान
१८) गंगेच्या उगमाचे स्थान
२१) महिला (एकाक्षरी)
२२ ) बाण, तीर
२३) सुगी, मौसम
२४) निराश, दुर्बळ
२७) ती पाहताच ... कलिजा खलास झाला (गाळलेला शब्द)
२९) शब्दांचे अर्थ सांगणारे पुस्तक
३१) शृंगारणे, छान दिसेल असे करणे
३२) शिव पार्वतीचा ज्येष्ठ पुत्र, षडानन
३४) सौम्यपणा, मृदूता
३७) सांत्वन, शांत करणे
३८) पाणी घालून घुसळलेले दही
३९) जुन्या काळी हिंदी मराठी चित्रपटसृष्टीत आपले नाव करणारी एक प्रसिद्ध चरित्र अभिनेत्री
४२) काजळ
४४) अमेरिकेचे एक भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड ....
४८) उत्तर प्रदेशातील या शहराचे प्रयागराज असे नामकरण करण्यात आले
४७) विष, गरळ
४९) पूर्ण न झालेले, अर्धवट
५०) लहान कट्यार
५१) आवश्यकता नसलेले
५३) मध्यंतरीच्या काळात मराठी हिंदी चित्रपट नाट्यक्षेत्रातील एक नावाजलेली दिग्दर्शिका
५७) तिरस्कार, अवहेलना
५८) चलाख, हुशार, चाणाक्ष बुद्धीचा
५९) निभाव, टिकाव
६०) अंगिकारलेले व्रत
६२) शिवशंकराचे हिमालयातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र
६४) स्तर, ढीग
६५) वाद, भांडण
६७) मराठ्यांची गर्जना
७०) काहीही कारण नसताना
७१) सर्पाची एक जात

### उभे संकेत

१) देणे, समर्पिणे, वाहणे
२) मन हरणारा, अमोल पालेकरचा एक जुना हिंदी बोलपट
३) अचूक वेध घेणारे, हमखास लागू पडणारे
५) पायी जाता येईल असा मार्ग
६) एक लहान चर्मवाद्य
७) अंधाऱ्या रात्री असंख्य तारकांच्या गर्दीतून जो दुधाळ रंगाचा मार्ग दिसतो तो
८) सापाने त्यागलेली त्वचा
९) लढाऊ जहाजांचा समुदाय
१०) पाणी, नीर
१२) राजा, नृपती
१३) आपल्या उत्पन्नातून सरकारला देय असलेले देणे
१४) कातर, कापड किंवा कागद कापण्याचे एक साधन
१७) चतुर्थांश, पाव भाग
१९) असंख्य पायांचा एक जीव
२०) शाळा, महाविद्यालयात आयोजित विद्यार्थ्यांचा वार्षिक मेळावा
२२) लोखंडाची सळई
२५) ताजमहालचे संक्षिप्त नाव
२६) प्रेत, कलेवर
२८) हिशेब तपासणारा
३०) चाकर, पायदळाचा शिपाई
३३) मृत्युदेवता
३४) डोळे, चक्षू
३५) आईचे वडील, आजोबा
३६) बाजू घेणारा, कैवार घेणारा
४०) भारतातील एक अणू ऊर्जा केंद्र
४१) ताठा, गुर्मी
४२) जगदंबा, रेणूका माता
४३) जनता दलाचे संक्षिप्त नाव
४५) लाक्षणिक अर्थाने फसव्या व लुच्चा मनुष्य
४६) भारत सरकारद्वारा शांततेच्या काळात अतुलनीय पराक्रमासाठी देण्यात येणारा शौर्य पुरस्कार
४७) गलबत, जलयान
४८) पत्त्यांमधील एक खेळ
४९) ज्याला वार्धक्य किंवा मरण नाही असा
५१) ज्याला कुणी पालनकर्ता नाही असा
५२) आवाज, स्वर
५३) नेता, नेतृत्व करणारा, टोळीचा नायक
५४) नावलौकिक जाणे, प्रतिष्ठा कमी होणे
५५) ओळ, क्रमवार उभे राहणे
५६) धान्य साठविण्याचे तळघर
५७) करंगळीच्या शेजारचे बोट
६१) शेणाने लिंपणे, पोतेरे
६२) न थकता, एकसारखे ६३) षट्
६५) पदार्थाचा सुक्ष्म अंश, दाणा
६६) वध, ठार मारणे
६७) मुस्लिमांनी केलेली मक्का मदिन्याची यात्रा
६८) हिंदीत आम्ही
६९) मरणोन्मुख अवस्था, नाश पावलेला भाग. (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दव्यूहचे उत्तर



udav munde - 8446302691

# बादशाहवर महिला आयोगाच्या अध्यक्षांचा संताप



हरियाणा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रेणू भाटिया यांनी रॅपर-गायक बादशाहच्या नवीन गाण्याभोवतीच्या वादावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले आहे की गायकाचे कृत्य अक्षम्य आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षांनी म्हटले आहे की या प्रकरणात केवळ माफी मागणे पुरेसे नाही. आदित्य प्रतीक सिंग सिसोदिया, ज्याला बादशाह म्हणूनही ओळखले जाते, तो अलिकडेच त्याच्या ''टटीरी'' गाण्यावरून वादात सापडला आहे. लोकांनी त्याच्या बोलांवर आक्षेप घेतला आणि बादशाहने माफी देखील मागितली होती. दरम्यान, माध्यमांशी बोलताना भाटिया म्हणाल्या, ''बादशाहने जे केले आहे ते अक्षम्य आहे. हरियाणाच्या मुलींचा अशा प्रकारे अपमान करणे आणि त्यांच्याविरुद्ध अशी असभ्य भाषा वापरणे हे सहन केले जाणार नाही. आम्ही त्यांना समन्स बजावले आहेत. त्यांनी हजर राहावे. जर त्यांनी हे टाळले तर आम्ही त्यांना काम करू देणार नाही.'' असे त्या म्हणाल्या आहेत. शनिवारी एका व्हिडिओमध्ये बादशाहने त्याच्या कृत्याबद्दल माफी देखील मागितली आहे. तो म्हणाला की, ''मी स्वतः हरियाणाचा आहे. जे मला ओळखतात त्यांना माहित आहे की माझी बोलीभाषा, माझ्या खाण्याच्या सवयी, माझी जीवनशैली, माझी ओळख हरियाणाची आहे. मी हरियाणवी आहे. हरियाणातील कोणत्याही मुलाबद्दल किंवा महिलेबद्दल असे बोलण्याचा माझा कधीच हेतू नव्हता. मला आशा आहे की तुम्ही मला हरियाणाचा मुलगा, तुमचा मुलगा समजाल आणि मला माफ कराल.'' असे गायकाने म्हटले आहे.

दैनिक
महाभूमि
सोमवार । ९ मार्च २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# अकोला भूमि

## न्यूज ब्रीफ

### ज्येष्ठ नागरिक संघाची निबंध स्पर्धा

**अकोला :** ज्येष्ठ नागरिक संघांतर्गत महिला समितीतर्फे रविवार, १५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता बी. आर. हायस्कूल येथे जागतिक महिला दिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यात प्रमुख पाहुणे म्हणून महापौर शारदा खेडकर राहणार आहेत.दिवंगत डॉ. प्रमिलाताई टोपले पुरस्कृत स्व. मातोश्री मनोरमा दत्तात्रय पाठक यांच्या स्मृतीत निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. निबंध स्पर्धेचा विषय भ्रमणध्वनीचे कुटुंब आणि समाजमनावर होणारे दुष्परिणाम हा असून ही स्पर्धा अकोला शहरापुरती मर्यादित आहे.

### योगासन स्पर्धेत विद्यार्थ्यांना यश

**अकोट :** तिसऱ्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत फ्रीडम इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी दिमाखदार कामगिरी केली. १७ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये कृष्णाल कुलट याने प्रथम क्रमांक, खुशाल दाभाडे याने द्वितीय क्रमांक, तर कुणाल कपले याने चतुर्थ क्रमांक पटकावला. १४ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये मैत्री वानखडे हिने चतुर्थ, तर प्रांजली अस्वार हिने पाचवा क्रमांक मिळवला. १७ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये नंदिनी साळुंखे हिने चतुर्थ क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली.

### महिला मंडळातर्फे वृद्धांना मदत

**तेल्हारा :** जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज बीजोत्सव निमित्ताने येथील कुणबी समाज महिला संघटनेतर्फे दहीगांव येथील वृद्धाश्रमाला भेट देऊन तेथील निराधार वृद्ध महिला व पुरुषांना साळी, चोळी, लुगडे, कपडे, दुपट्टे टोपीचे तथा आरोग्यासाठी लाभदायक असलेल्या खाऊचे वाटप तथा वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी तेल्हारा संघटनेच्या तालुकाध्यक्ष सुमन कोठे, आरती गायकवाड, नगरसेविका रुपाली हागे, वनमाला खोटरे, मालुबाई वाकोडे, संगीता कोरडे, स्मिता दबडघाव उपस्थित होते.

## नियमभंग, अतिक्रमण आणि बेशिस्त पार्किंगमुळे वाढली समस्या

# ट्रॅफिक सिग्नल असूनही शहरात वाहतूक कोंडी ; नागरिक त्रस्त

महाभूमि विशेष

अकोला / प्रतिनिधी

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रमुख चौकांमध्ये ट्रॅफिक सिग्नल बसविण्यात आले असले तरी नियमभंग, रस्त्यावरचे बेशिस्त पार्किंग आणि अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषत: गांधी रोड, टिळक रोड, उमरी रोड, जठारपेठ आणि कौलखेड रोड या भागात ही समस्या अधिक तीव्र झाल्याने नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

शहरातील काही महत्त्वाच्या चौकांमध्ये ट्रॅफिक सिग्नल बसवल्यानंतर सुरुवातीला वाहतूक काही प्रमाणात सुरळीत झाली होती. मात्र अनेक ठिकाणी ऑटो चालक आणि दुचाकीस्वारांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येते. पिवळ्या पट्ट्याच्या बाहेर रस्त्यावरच मोठी चारचाकी वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीचा वेग मंदावतो.

वाहतूक शाखेकडून दुचाकी वाहनांवर टोईंग पथकांच्या माध्यमातून कारवाई केली जाते, मात्र रस्त्यावर पार्किंग केलेल्या चारचाकी वाहनांवर अपेक्षित कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील अनेक रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीची समस्या आणखी गंभीर झाली आहे.


संग्रहित फोटो

### उपाय काय ?

■ शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन करणे, बेकायदेशीर पार्किंग हटविणे आणि अतिक्रमणावर कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. तसेच बसस्थानक परिसरात रिक्षा पार्किंगसाठी निश्चित केलेल्या जागांचा वापर बंधनकारक करणे आणि अंडरपासची नियमित देखभाल करणे गरजेचे सांगितले जाते.

### अंडरपासची देखभाल अभावी समस्या



■ शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी मध्यवर्ती बसस्थानक चौक (धिंग्रा चौक) येथे अंडरपासची निर्मिती करण्यात आली होती. मात्र हा अंडरपास बहुतांश वेळा बंदच राहतो. पावसाळ्यात अंडरपासमध्ये पाणी साचत असल्याने त्याचा वापर करणे कठीण होते. अंडरपासची नियमित देखभाल होत नसल्याने तो प्रभावी ठरत नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे. या पार्श्वभूमीवर डाबकी रोड येथेही अंडरपासची तयारी सुरू असली तरी त्याच्या व्यवस्थापनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### बसस्थानक परिसरात रिक्षांची बेशिस्त पार्किंग

■ मध्यवर्ती बसस्थानकासमोर रिक्षा चालकांकडून होणाऱ्या बेशिस्त पार्किंगमुळे परिसरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत होत असल्याचे चित्र आहे. वाहतूक शाखेकडून रिक्षांसाठी ठराविक पार्किंग जागा निश्चित करून देण्यात आली असली तरी काही चालकांकडून त्या नियमांकडे दुर्लक्ष केले जाते. परिणामी बसस्थानकाच्या प्रवेशद्वारासमोरच रिक्षा उभ्या केल्या जात असल्याने बसचालकांना गाड्या वळवताना अडचण निर्माण होते. बसस्थानक परिसरात दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते.

# एचपीव्ही लसीकरण मोहिमेला प्रारंभ

## गर्भाशयाच्या कर्करोगावर नियंत्रणासाठी मोहीम

अकोला / प्रतिनिधी

महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी शासनाने एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू केली आहे. देशपातळीवर या मोहिमेचा शुभारंभ २८ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आला. राज्यात ही मोहीम रविवार ८ मार्चपासून सुरू झाली असून अकोला जिल्ह्यातही तिची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.

जिल्ह्यात ही मोहीम जिल्हाधिकारी वर्षा मीणा, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम आणि उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात येत आहे. महिलांमधील गर्भाशय मुखाचा कर्करोग ही गंभीर चिंतेची बाब असून तो प्रामुख्याने ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस या विषाणूमुळे होतो. हा असा एकमेव कर्करोग आहे जो लसीकरणाद्वारे टाळता येऊ शकतो.

ही मोहीम पुढील तीन महिन्यांपर्यंत राबविण्यात येणार असून त्यानंतर ही लस नियमित लसीकरण कार्यक्रमासोबत देण्यात येईल. मोहीम यशस्वी होण्याकरिता आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षण विभाग, महिला बाल कल्याण विभाग, आदिवासी विभाग व इतर विभागांचे सहकार्य लाभणार आहे. या मोहिमेचे नियोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल व डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केले आहे. या मोहिमेत १४ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना गार्डसील ४ या एचपीव्ही लसीची ०.५ मिली मात्रा डाव्या दंडातील स्नायूमध्ये दिली जाणार आहे.

ही लस जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, महिला रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय येथे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

> एचपीव्ही लसीकरणाबाबत समाजमाध्यमांवर काही चुकीचे गैरसमज पसरविले जात असल्याने नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, मोहिमेत सहकार्य करावे.
> – डॉ. आरती कुलवाल, जिल्हा शल्य चिकित्सक

## भरधाव वाहनाची वीज खांबाला धडक ; गुन्हा दाखल

मूर्तिजापूर / प्रतिनिधी

तालुक्यातील मुरंबा फाटा परिसरात भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालविलेल्या वाहनाने महावितरणच्या वीज खांबाला जोरदार धडक दिल्याने या अपघातात वीज खांबाचे नुकसान झाले असून, संबंधित वाहन चालकाविरुद्ध मूर्तिजापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, ४ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ४ वाजताच्या सुमारास उमरी अरब येथे एमएच ३७एडी ७९६८ क्रमांकाच्या भरधाव वाहनाने रस्त्याच्या कडेला असलेल्या महावितरणच्या विद्युत खांबाला धडक दिली. या धडकेत खांबाचे नुकसान झाले. याप्रकरणी आकाश अजयकुमार गुप्ता (३८), रा. पांडे लेआउट, मूर्तिजापूर यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून मूर्तिजापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात कलम २८१, मोटार वाहन कायदा कलम १८४ तसेच भारतीय विद्युत अधिनियम कलम १३८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दिपक कानडे करीत आहेत.

# समाधान शिबिर : ४ हजार ८३६ विविध प्रमाणपत्रांचे वाटप

अकोला / प्रतिनिधी

जिल्ह्यातील नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा-१' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या पहिल्या दिवशी अकोला जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील ७ महसुली मंडळ मुख्यालयांवर समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरांतर्गत ४८३६ विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या शिबिरांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी जिल्ह्यातील नागरिकांनी या अभियानाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले होते.



या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक नागरिकांनी शिबिरांना उपस्थिती लावून विविध शासकीय सेवांचा लाभ घेतला. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात इतर शासकीय विभागांचाही सहभाग होता. त्यामुळे विविध प्रलंबित प्रकरणांचे निराकरण करण्यास मदत झाली. अभियानाच्या पहिल्या दिवशी अकोला तालुक्यात दहीहंडा व घुसर, पातुर तालुक्यात आलेगाव, बाळापुर तालुक्यात उरळ, मुर्तीजापूर तालुक्यात जामठी, अकोट तालुक्यात मुंडगाव आणि तेल्हारा तालुक्यात पाथर्डी येथे समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरांना स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. अकोट तालुक्यातील मुंडगाव आणि तेल्हारा तालुक्यातील पाथर्डी येथील शिबिरांचे उद्घाटन अकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश भरसाकळे यांच्या हस्ते करण्यात आले. तर पातुर तालुक्यातील आलेगाव येथे आयोजित शिबिराची सुरुवात अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली. अभियानाच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यात एकूण ४३२ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली.

### विविध महसुली सेवा एकाच ठिकाणी

■ या समाधान शिबिरांमध्ये नागरिकांना सात-बारा, नमुना-८अ, नामबदल, महसूल कर, वन विभागाच्या मान्यता, नाहरकत प्रमाणपत्र, उत्पन्न व जात प्रमाणपत्र, श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना तसेच पुरवठा विभागामार्फत रेशन कार्ड वाटप यांसारख्या विविध सेवांचा लाभ एकाच ठिकाणी देण्यात आला.

## 'ती संशयित महिला निघाली मनोरुग्ण'

मूर्तिजापूर / प्रतिनिधी

शहरातील लोहिया प्लॉट परिसरातील रेल्वे फाटकाजवळ संशयास्पदरित्या भटकंती करत असलेल्या एका महिलेबाबत नागरिकांनी दिलेल्या माहितीनंतर येथील शहर पोलिसांनी तत्परता दाखवत तिची सुरक्षितता सुनिश्चित केली.

मात्र प्राथमिक चौकशीत ती मानसिकरित्या अस्वस्थ असल्याचे लक्षात आल्याने पोलिसांनी तिला वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

४ मार्च रोजी सायंकाळी लोहिया प्लॉट परिसरातील रेल्वे फाटकाजवळ एक महिला मुलांना चॉकलेट देण्याचे आमिष दाखवत परिसरात भटकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. शहर पो.स्टे.चे ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत महिलेची चौकशी केली. विचारपूस केली असता ती गाव किंवा ओळख स्पष्ट सांगू शकत नव्हती. तिच्या वागणुकीवरून ती मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी तिला वैद्यकीय तपासणीसाठी मूर्तिजापूर येथील लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी उपचारासाठी तिला जिल्हा सामान्य रुग्णालय, अकोला येथे पाठविले. अकोला जिल्हा रुग्णालयात सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे महिलेची ओळख पटविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव मागितले

अकोला / प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध विषयांत युवकांनी पार पाडलेल्या भूमिका, दिलेले योगदानामुळे योगदानामुळे युवांची एक अद्वितीय ओळख समाजात झालेली आहे. युवाचा समाजातील अविभाज्य घटक या नात्याने विकास प्रक्रियेत सहभाग आवश्यक झालेला आहे.

## राज्यस्तरीय कार्यक्रमात अकोल्यातील महिलांचा गौरव

अकोला / प्रतिनिधी

जागतिक महिला दिनानिमित्त राज्यभरात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला व संस्थांचा गौरव करण्यात आला. मुंबई येथील रवींद्र नाट्यमंदिर येथे ७ मार्च रोजी आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात अकोला जिल्ह्यातील महिला आर्थिक विकास महामंडळाच्या टीमचा विशेष सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर तसेच माविम च्या व्यवस्थापकीय संचालकांच्या मार्गदर्शनाखाली हा राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महिला आर्थिक विकास महामंडळ, अकोला यांच्या माध्यमातून सीएमआरसी आणि तेजस्विनी भवनांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत अकोल्यातील महिला टीमचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. या वेळी लोकसंचालित साधन केंद्र अकोलाच्या अध्यक्षा कल्पनाताई निचळे, सुवर्णाताई वाघमारे, ईसी सभासद थोरात ताई, सीएमआरसी व्यवस्थापक सोनाली अंबरते, तसेच माजी सहयोगिनी लता आठवले आणि पद्मा खेळकर यांच्यासह जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांच्या संपूर्ण टीमला उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



युवती व महिला क्रीडापटूंनी घडविले स्त्री शक्तीचे दर्शन

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अकोल्यात अस्मिता लीगची उत्साही सुरुवात

अकोला / प्रतिनिधी

प्रत्येक स्त्री ही करुणा, साहस आणि शक्तीचे प्रतीक आहे हा संदेश देत आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त केंद्रीय क्रीडा मंत्रालय, मेरा युवा भारत केंद्र, व जिल्हा प्रशासनाच्या वतीने वसंत देसाई क्रीडांगण येथे अस्मिता लीगचे आयोजन आज करण्यात आले. विविध शाळा - महाविद्यालयांच्या विद्यार्थिनी, युवती व महिला यांनी स्पर्धेत सहभागी होत स्त्री शक्तीचे दर्शन घडवले.

विद्यार्थिनी व महिलांसाठी १३ वर्षांखालील, १३ ते १८ वर्ष, १८ हून अधिक अशा तीन वयोगटात धावण्याची स्पर्धा झाली. क्रीडा क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावलेल्या मान्यवर महिला क्रीडापटू, विद्यार्थिनी क्रीडापटू यांच्या हस्ते मशाल पेटवून उपक्रमाचा शुभारंभ झाला. या उपक्रमासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय, स्काऊट-गाईड कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विविध शाळा-महाविद्यालये, महिला आर्थिक विकास महामंडळ यासह विविध संस्थांचा सहभाग मिळविण्यात आला.

राज्य क्रीडा मार्गदर्शक नलिनी जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट्ट, स्काऊट गाईड जिल्हा संघटक किरण लहाने, जयमालाताई जाधव, जिल्हा क्रीडा कार्यालयाचे राजेश गावंडे,मेरा युवा भारत केंद्राचे मदन भरगाटे यासह क्रीडा मार्गदर्शक उपस्थित होते.



### युवतींसह महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

■ महिलांसाठी आयोजित अस्मिता लीग मध्ये युवतींसह महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या प्रसंगी १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर इतक्या अंतराच्या या स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील युवती व महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

## तिघांना जिल्ह्यातून केले हद्दपार

अकोला / प्रतिनिधी

जिल्ह्यात वाढत्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीतील तिघांविरुद्ध कलम ५५, मुंबई पोलिस अधिनियमांतर्गत कारवाई करत त्यांना अकोला जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली. आरोपींमध्ये प्रतीक एकनाथ वसू (वय २३, रा. लोखंडे ले-आउट, मोठी उमरी, अकोला), मेहुल सुरेश ( वय १९, रा. जाधव मंगरुळपीर, जि. वाशिम), प्रथमेश संजय सरोदे (वय २०, रा. शिरोडा, ता. जि. अकोला) यांचा समावेश आहे.

# बोरगाव मंजू येथे होणार ट्रॉमा केअर सेंटर

सुनील डिडोळकर

**अकोला:** जिल्ह्यातील आरोग्य सुविधांचा विस्तार आणि नागरिकांना तातडीच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. जिल्ह्यातील बोरगाव मंजू येथे ट्रॉमा केअर सेंटर तर बाळापूर तालुक्यातील माझोड येथे मानसोपचार रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याची माहिती मिळत आहे.

सप्टेंबर २०२५ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी बोरगाव मंजू येथे ट्रॉमा केअर सेंटर आणि माझोड येथे मानसोपचार रुग्णालयासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आरोग्य विभागाने गेल्या काही महिन्यांत आवश्यक प्रक्रिया वेगाने सुरू केली आहे. प्रस्तावित दोन्ही प्रकल्पांसाठी आवश्यक जागा उपलब्ध असून संबंधित विभागांकडून ना हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

आरोग्य मंत्रालयाची मान्यता मिळाल्यानंतर या प्रकल्पांच्या पुढील प्रशासकीय प्रक्रियेला गती मिळणार आहे. या दोन वैद्यकीय प्रकल्पांमुळे अकोला जिल्ह्यासह बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यातील नागरिकांनाही तातडीच्या आणि विशेष वैद्यकीय सेवांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे शासकीय प्रक्रिया पूर्ण करून ही दोन्ही रुग्णालये लवकरात लवकर सुरू करावीत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. बाळापूर तालुक्यातील माझोड येथे मानसोपचार रुग्णालय उभारण्याचा निर्णयही प्रक्रियेत आहे.

### महामार्गामुळे बोरगाव मंजूला प्राधान्य

■ ट्रॉमा केअर सेंटर सहसा उपजिल्हा रुग्णालयांशी जोडलेले असतात आणि राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गाजवळ असलेल्या ठिकाणी त्यांना प्राधान्य दिले जाते. सुरुवातीला अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर उपजिल्हा रुग्णालय ट्रॉमा केअर सेंटरसाठी योग्य मानले जात होते. मात्र लोकप्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर महामार्गालगत असलेल्या बोरगाव मंजू येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### ट्रॉमा सेंटरसाठी ३ एकर जागेची गरज

■ ट्रॉमा केअर सेंटरसाठी सुमारे ३ एकर जागेची आवश्यकता असून प्रशासनाकडे त्यासाठी जागा उपलब्ध असल्याची माहिती आहे. यासंदर्भातील विविध विभागांकडून आवश्यक परवानग्या मागविण्यात आल्या आहेत.

## न्यूज ब्रीफ

### शॉक लागून युवकाचा मृत्यू

**मलकापूर :** दाताळा येथे ७ मार्च रोजी महावितरणच्या विद्युत डीपीवर काम करत असताना अचानक विद्युत पुरवठा सुरू झाल्याने २५ वर्षीय युवकाचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना दुपारी घडली. पिंप्रीगवळी फाट्यावरील डीपी बंद असताना तिचे दुरुस्तीचे काम सुरू होते अचानक विद्युत पुरवठा सुरू झाल्याने डीपीवर काम करणारे शुभम रामकृष्ण वानखेडे (२४) रा.वाडी ता.नांदुरा यास विद्युत शॉक लागून मृत्यू झाला.

### निधन वार्ता

#### सखुबाई पाटील



**मलकापूर :** सखुबाई रामचंद्र पाटील (७८) यांचे ६ मार्च रोजी आकस्मिक निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुलं, चार मुली, सुना नातवंडे असा बराच आप्त परिवार आहे. त्या श्री.अनंतराव सराफ विद्यालयातील पर्यवेक्षक मलकापूर येथील रहिवासी संजय रामचंद्र सावळे यांच्या आई होत.

जळगाव जामोद पोलिसांकडून पर्दाफाश ▶ तीनही आरोपींना तीन दिवसांची कोठडी


# अखेर पतीच निघाला पत्नीचा खूनी, एक लाखाची सुपारी देवून संपविले पत्नीला

**जळगाव जामोद / प्रतिनिधी**

जळगाव जामोद येथील अपघातात मरण पावलेल्या एका शिक्षिकेच्या प्रकरणाला चांगलीच कलाटणी मिळाली आहे. हा अपघात नूसन घातपात असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले असून पतीनेच मित्रांसह कट रचून पत्नीचा अपघात घडवून तिचा खून केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणामुळे जळगाव जामोद मध्ये एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी पतीसह तिघांना अटक केली आहे.

जळगाव जामोद मधील पिंपळगाव काळे रोडवरील एका भीषण अपघाताच्या नावाखाली दडलेला खुनाचा थरारक कट उघडकीस आणण्यात जळगाव जामोद पोलिसांना मोठे यश आले आहे. किरकोळ अपघात वाटणारी घटना प्रत्यक्षात १ लाख रुपयांची सुपारी देऊन घडवून आणलेला खून असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे यांनी या गुन्ह्याचा अत्यंत शिताफीने तपास लावून आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. २ मार्च रोजी सकाळी पावणे सातच्या सुमारास कवठळ गावाजवळ एका पांढऱ्या रंगाच्या टाटा इंट्रा गाडीने वृषाली प्रकाश गावंडे यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली होती. या अपघातात वृषाली यांचा जागीच मृत्यू झाला. सुरुवातीला हा अपघात वाटत होता.

मात्र जळगाव जामोद पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला आणि सत्य समोर आले. पोलीस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीदारांच्या मदतीने तपास चक्रावून टाकला. तपासादरम्यान संशयाची सुई पांढऱ्या रंगाच्या टाटा इंट्रा वाहन क्रमांक एमएच २८ - ५७५३ गाडीकडे वळाली. ही गाडी मनीष नारायणसिंग सुर्यवंशी (रा. जगदंबा नगर, शेगाव) याची असल्याचे समजताच त्याला ताब्यात घेण्यात आले. जळगाव जामोद पोलिसांनी केलेल्या कसून चौकशीत मनीषने या थरारक कटाची कबुली दिली आहे. मनीषने दिलेल्या कबुली जबाबातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. मृत वृषाली यांचा पती प्रकाश अनंता गावंडे आणि त्याचा साथीदार मंगेश चुलकार (रा. पातुर्डा) यांनी मिळून हा कट रचला होता.



> अपघाताला कारणीभुत असलेल्या वाहनाचा शोध लावून आरोपी चालकाला ताब्यात घेवून सखोल चौकशी केली असता सदर प्रकार उघडकीस आला. सदर गुन्ह्याची व्याप्ती मोठी होती. परंतु तांत्रिक पुरावे आणि गोपनीय माहितीच्या आधारे आम्ही अवघ्या काही दिवसांत खऱ्या गुन्हेगारांपर्यंत पोहोचलो आहोत. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.
>
> – **नितीन पाटील** ठाणेदार, जळगाव जामोद पोलीस स्टेशन.

### या अगोदर पतीने केला होता वृषालीवर विष प्रयोग

यापूर्वी वृषाली यांना अन्नातून विष देऊन मारण्याचा तीन वेळा प्रयत्न झाला होता, मात्र तो यशस्वी झाला नाही. अखेर आरोपींनी मनीष सुर्यवंशी याला वृषाली यांना गाडीने उडवण्यासाठी १ लाख रुपयांची सुपारी दिली होती. ठरल्याप्रमाणे २ मार्चच्या सकाळी मनीषने वृषाली यांच्या गाडीचा पाठलाग केला आणि मागून कट मारून त्यांना खाली पाडले, ज्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. या गुन्ह्यात वाहन चालक मनीष नारायणसिंग सुर्यवंशी, साथीदार मंगेश चुलकार आणि पती प्रकाश अनंता गावंडे या तिघांनाही पोलिसांनी निष्पन्न केले आहे. त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीनही आरोपींना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.



## कुत्र्यांच्या हल्ल्यात माकडाचा मृत्यू, शेतकऱ्याने केले विधीवत अंत्यसंस्कार!

**पिंपळगाव राजा / प्रतिनिधी**

स्थानिक राहुड शिवारातील गिऱ्हे वाडी असलेल्या परिसरातील कुत्र्यांच्या हल्ल्यात माकडाचा मृत्यू झाला. ही बाब स्थानिक शेतकरी सदाशिव गिऱ्हे यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ या माकडावर विधीवत अंत्यसंस्कार करीत मानवी जीवनात शेतकरी बांधवांचे पशु पक्षांवर असलेले निस्वार्थी प्रेम या ठिकाणी दिसून आलेत.

या शेतकऱ्याने लाल रंगाचा कापड आणून त्या कापडावर माकडाचे अंतिम संस्कार केले. या शेतकऱ्याने स्वतःच्या शेतात पशु, पक्षी, रात्री शेतात पाणी पिण्यासाठी वावर असलेल्या जंगली प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पाणवठा बांधून पूर्ण केली आहे.

त्यांचे पशु विषयी असीम प्रेम आहे. अशातच आज मृत माकडावर अंतिम संस्कार पूर्ण करुन त्यांनी आपले मानवी जीवनातील सोपस्कार पूर्ण केले. त्यांचा आदर्श इतरांनी सुद्धा घेण्याची गरज आहे. यावेळी परिसरातील शेतकरी उपस्थित झाले होते.

## दोन दुचाकीची धडक, दोन ठार, १ गंभीर

**खामगाव :** सफाईच्या कामासाठी जात असलेल्या सफाई कामगारांच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या भरधाव दुचाकीने धडक दिल्याने दोन्ही कामगार गंभीर स्वरूपाने जखमी होवून त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना ६ मार्च रोजी उघडकीस आली. स्थानिक सतीफैल भागातील रहिवासी विनोद श्यामलाल सुसगोहर (५५) व उमेश जगन पवार (४५) हे दोघे ५ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास दुचाकी क्र. एमएच-२८-बीएच-६१९८ ने लोखंडा शिवारातील लोखंडकार यांच्या ढाब्यावर साफसफाई कामासाठी जात होते. यावेळी ढाब्याजवळ समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकी क्र. एमएच-२८-बीझेड चा चालक रतन भानु कोळपे याने आपल्या ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन उपरोक्त दुचाकीला समोरुन धडक दिली. धडकेत विनोद सुसगोहर व उमेश पवार हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना त्वरीत सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती उपचाराला साथ देत नसल्यामुळे जीएमसी अकोला येथे रेफर करण्यात आले होते. रात्री ९.३० वाजताच्या सुमारास विनोद सुसगोहर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर उमेश पवार यांचा ६ मार्च रोजी दुपारी ५ वाजताच्या सुमारास उपचारादरम्यान मृत्यू झाला.

## कर्नाटकातील व्यापाऱ्याला मलकापुरात लुटले; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**मलकापूर:** शहरातील मुक्ताईनगर मार्गावरील एम.एस.डब्ल्यू महाविद्यालयाजवळील मोकळ्या मैदानात कर्नाटकातील एका व्यापाऱ्याला मारहाण करून सुमारे दोन लाख रुपये लुटल्याची घटना ६ मार्च रोजी रात्री घडली. या प्रकरणी ७मलकापूर शहर पोलिसांनी पाच जणांविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे. श्रीनिवास मूर्ती नारायणस्वामी (३२) रा. हेलेअळेगुंडी बंडा, जि. चिकबळ्ळापूर, कर्नाटक हे व्यापारी ६ मार्च रोजी मलकापूर येथे बांबू खरेदी विक्रीसंदर्भात आले होते. माल दाखविण्याच्या बहाण्याने त्यांना रेल्वे स्थानक परिसरातून रेल्वे बोगद्याखालून मुक्ताईनगर मार्गावरील एम.एस.डब्ल्यू महाविद्यालयाजवळील मैदानात नेण्यात आले. मोकळ्या रात्री सुमारे ११ ते ११:३० वाजताच्या सुमारास काही व्यक्तींनी व्यापारी व त्यांच्या भावाला काठीने मारहाण करुन १ लाख ९६ हजार रुपयांची रक्कम लुटल्याची तक्रार श्रीनिवास नारायणस्वामी यांनी पोलीस ठाण्यात दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी निखिल संजय भोसले, प्रदीप सुरेश जैन, शाहरुख रहमान पिंजारे व अन्य दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये महिला दिन उत्साहात

**खामगाव :** येथील युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल तर मार्गदर्शनासाठी प्राचार्य अनिरुद्ध उपस्थित होते.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रुती लड्ढा, निर्मला जाधव शिक्षण विस्तार अधिकारी आणि सुनिता गवई विषय तज्ञ, पंचायत समिती खामगाव यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राची पवार व स्वरा पवार यांनी आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने केले. स्वागत गीत सोनाली नगरी यांनी गायीले तर आभार प्रदर्शन ईश्वरी बोदडे यांनी केले. यावेळी प्राचार्य अनिरुद्ध आणि अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांनी आपले विचार व्यक्त करताना महिला सन्मानाचे महत्त्व अधोरेखित केले. महिला दिन केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित न ठेवता महिलांचा सन्मान व आदर दररोज केला पाहिजे. असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वंशिका गवई, नूतन मोरखडे, स्वरा वाकोडे तसेच इयत्ता पहिलीतील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि इयत्ता पाचवीतील सर्व मुलींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व महिला शिक्षकांचा पुष्पगुच्छ, भेटवस्तू देऊन व पेढे भरवून सन्मान केला. यावेळी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या शिक्षकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

## समाधान शिबिरात १,३३२ लाभार्थ्यांना मिळाला थेट लाभ!

# युवकांच्या हाताला रोजगार देणे हेच ध्येय : डॉ.संजय कुटे

**सुनगाव :** जळगाव जामोद मतदारसंघाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आणि युवकांच्या हाताला हक्काचा रोजगार मिळवून देणे हेच आमचे प्रमुख ध्येय आहे. येत्या ४ वर्षांत या भागात ४ ते ५ मोठे उद्योग सुरू करण्यात येतील, तसेच शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी लवकरच भव्य कोल्ड स्टोरेज उभे राहणार आहे. अशी ग्वाही आमदार डॉ. संजय कुटे यांनी दिली.

७ मार्च रोजी सुनगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार डॉ. संजय कुटे यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात अतिशय दणक्यात झाली. ग्रामपंचायत कार्यालय सुनगाव येथून भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली. ही रॅली भवानी चौक, सरकारी दवाखाना मार्गे जिल्हा परिषद शाळेत पोहोचली. वाटेत प्रतीक चौकात जिल्हाधिकारी, आमदार आणि सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे ग्रामस्थांतर्फे जंगी स्वागत करण्यात आले. शाळेत पोहोचल्यानंतर मान्यवरांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून शिबिराचा शुभारंभ झाला. यावेळी मंचावर उपविभागीय अधिकारी शैलेश काळे, तहसीलदार पवन पाटील, रमेश जाधव तालुका कृषी अधिकारी, श्रीकांत जोशी गटशिक्षणाधिकारी, दत्तात्रय गोसावी, माजी सरपंच रामेश्वर अंबडकार यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या शिबिरामुळे नागरिकांच्या वेळेची आणि पैशांची मोठी बचत झाली असून, एकाच छताखाली सर्व दाखले मिळाल्याने सुनगाववासीयांनी समाधान व्यक्त केले आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळ अधिकारी शिंदे, कृषी मित्र मोहनसिंह राजपूत, कोतवाल सचिन कपले, तुकाराम ढोले, ग्रामपंचायत कर्मचारी तथा गावकऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मातोश्री नथियाबाई विद्यालयाच्या शिक्षिका घोटेकर यांनी केले तर आभार महसूल अधिकारी गौतम वाघ यांनी केले.

### एकाच छताखाली सर्व दाखले

■ या शिबिरात विविध विभागांनी स्टॉल्स लावून नागरिकांना जागीच सेवा दिली. दिवसभरात एकूण १३३२ लाभार्थ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा व इतर योजनांचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी प्रशासनाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या लोकाभिमुख कामांचे कौतुक केले. या शिबिरात आधार अपडेट (१७), नैसर्गिक आपत्ती ई-केवायसी (०७) आणि ग्रामपंचायतीच्या ३७ सेवांचा लाभही नागरिकांनी घेतला. शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या माणसापर्यंत पोहोचावा, हाच या शिबिराचा मूळ उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

## रेल्वेसमोर उडी घेत अनोळखी व्यक्तीची आत्महत्या

**नांदुरा / प्रतिनिधी**

खुमगाव रेल्वे स्थानकाजवळ धावत्या रेल्वेसमोर उडी घेत एका अनोळखी व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना ७ मार्च रोजी घडली. ही घटना रेल्वे मार्गावरील किलोमीटर क्रमांक ५१५/९ जवळ घडल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच ओमसाई फाउंडेशनचे विलास निंबोळकर हे स्वयंसेवकांसह रुग्णवाहिका घेऊन घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह तातडीने पुढील कार्यवाहीसाठी हलविण्यास मदत केली. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. त्याचे वय अंदाजे ५० वर्षे आहे. मृतदेह पुढील ओळख पटविण्यासाठी शासकीय रुग्णालय, मलकापूर येथील शीतगृहात ठेवण्यात येणार आहे. याप्रकरणी नांदुरा पोलिस ठाणे पुढील तपास करीत आहेत.

## सिद्धिविनायक कॅम्पसमध्ये 'महिला सक्षमीकरण व रोजगार कौशल्य' कार्यशाळा उत्साहात

**शेगाव / प्रतिनिधी**

स्थानिक वसुंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्था खामगाव द्वारा संचालित सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगाव येथील आय.सी.सी. विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय 'रोजगार क्षमता कौशल्य' कार्यशाळेचा समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला.





५ मार्च ते ७ मार्च या कालावधीत नांदी फाउंडेशनच्या सहकार्याने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत मुख्य प्रशिक्षक प्रा. कृष्णा रविंद्र बुऱ्हाडे यांनी विद्यार्थिनींना भविष्यातील करिअरची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले तांत्रिक ज्ञान, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास वाढवण्याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले. आधुनिक युगात नोकरीच्या संधी कशा शोधाव्यात आणि स्वतःला सक्षम कसे बनवावे, यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तंत्रनिकेतनच्या प्राचार्या प्रा. प्रिती चोपडे यांनी भूषविले. यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत जी. कुलकर्णी आणि तंत्रनिकेतनचे अधिष्ठाता प्रा. सचिन इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींना संबोधित करताना बदलत्या काळानुसार कौशल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आय.सी.सी. कार्यक्रमाधिकारी प्रा. दिपाली वनारे व प्रा.पुजा दळवी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्पिता बयस व आनंदी वानखडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अर्पिता बयस हिने मानले.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सागर फुंडकर तसेच संस्थेचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री व अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अँड. आकाश फुंडकर यांनी आयोजक टीमचे कौतुक केले.








दैनिक महाभूमि

# वाशिम भूमि

सोमवार । ९ मार्च २०२६

dainikmahabhoomi@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### आदिशक्तीतर्फे महिला दिन उत्साहात

**कारंजा :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आदिशक्ती सदाचार सभा, यशोदा नगर कारंजा (लाड) यांच्यातर्फे सारिका होनराव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मानोरा रोडवर पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले. हा समाजोपयोगी उपक्रम शनिवार ७ मार्च रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वमांगल्य सभा वाशिम जिल्हा संघटक मनीषा जोशी या होत्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून वाशिम जिल्हा बालसभा संयोजिका वृशाली लकरस, विश्वमांगल्य सभा कारंजा (लाड) अध्यक्षा चारुलता अतुल एकघरे उपस्थित होत्या.

### आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन शिबिर

**वाशिम :** आपत्तीच्या काळात घाबरून न जाता योग्य पद्धतीने परिस्थितीवर नियंत्रण कसे मिळवायचे याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल पुणे, राज्य आपत्ती प्रतिसाद दल नागपूर आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग वाशिम यांच्यातर्फे जिल्हाभर मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आपदा मित्र, आपदा सखी तसेच विविध विभागांतील अधिकाऱ्यांना आपत्तीपूर्व प्रशिक्षण देण्यात आले.

### त्रिरत्न बुद्ध विहारासाठी धम्मदान

**वाशिम :** समाजाबद्दल कृतज्ञता ठेवत समाजासाठी काहीतरी देण्याची भावना जपणारे खिर्डा येथील जवान बॉबी भिमराव वैद्य यांनी त्रिरत्न बुद्ध विहाराच्या बांधकामासाठी ५०,०५१ रुपयांचे धम्मदान देऊन आदर्श निर्माण केला आहे. भारतीय सैन्यात महार रेजिमेंटमध्ये जनरल ड्यूटी पदावर कार्यरत असलेले बॉबी वैद्य सध्या अरुणाचल प्रदेश येथे चीन सीमेवर देशसेवा बजावत आहेत. गेल्या सात वर्षांपासून ते सैन्यात कार्यरत आहेत.

## मार्चच्या पहिल्याच आठवड्यात वाढली उष्णता ; जीवाची लाहीलाही

# अकोला सर्वाधिक उष्ण ; वाशिमचाही पारा ३९.२ अंशांवर

**वाशिम / प्रतिनिधी**

मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच वाशिम जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढू लागली असून तापमानाचा पारा चाळिशीकडे झुकताना दिसत आहे. हवामान विभागाच्या नोंदीनुसार वाशिम येथे कमाल तापमान ३९.२ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले असून उष्णतेची तीव्रता दिवसागणिक वाढताना दिसत आहे. विदर्भात सर्वाधिक उष्ण अकोला जिल्हा ठरला असून जिल्ह्याचे तापमान ४०.८ अंशावर पोहोचले आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

मार्चच्या पहिल्याच आठवड्यात विदर्भात उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. सकाळी आठ वाजतापासूनच उन्हाची झळ जाणवू लागते, तर दुपारच्या वेळेत उष्णतेची तीव्रता अधिक वाढत आहे. त्यामुळे दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हाचा तडाखा सर्वाधिक जाणवत असल्याने नागरिकांनी शक्यतो या वेळेत बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते सध्या उन्हाळ्याची सुरुवात असून एप्रिल आणि मे महिन्यात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा प्रभाव वाढू लागला आहे. ग्रामीण भागातही उष्णतेचा परिणाम जाणवू लागला असून शेतीसह इतर कामांवर त्याचा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.


दुपारच्या वेळी शहरातील मुख्य रस्ते व बाजारपेठांमध्येही तुलनेने कमी वर्दळ दिसून येत आहे. उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांनी आरोग्याची काळजी घेऊन आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

### असे आहे विदर्भातील तापमान

| | |
|---|---|
| अकोला | ४०.८ |
| अमरावती | ४०.६ |
| वर्धा | ४०.० |
| वाशिम | ३९.२ |
| चंद्रपूर | ३८.८ |
| गडचिरोली | ३८.२ |
| यवतमाळ | ३८.४ |
| नागपूर | ३७.८ |
| भंडारा | ३७.४ |
| बुलडाणा | ३७.२ |
| गोंदिया | ३६.६ |

### उष्माघाताची लक्षणे

- डोकेदुखी,
- पोटदुखी,
- अचानक जुलाब सुरू होणे,
- अशक्तपणा,
- चक्कर येणे,
- मळमळणे,



### काय काळजी घ्यावी ?

- उन्हात घराबाहेर पडणे टाळावे, डोक्यावर टोपी, स्कार्फ किंवा रुमाल वापरावा, छत्रीचा वापर करावा, सैल व फिकट रंगाचे कपडे परिधान करावेत, भरपूर पाणी प्यावे, अतिथंड पदार्थ टाळावेत, लिंबू सरबत, कैरी पन्हे यांचे सेवन करावे, हलका व पौष्टिक आहार घ्यावा

### रात्रीच्या तापमानातही वाढ

- दिवसासोबतच रात्रीच्या तापमानातही वाढ होत असल्याचे चित्र आहे. हवामान विभागाच्या नोंदीनुसार वाशिम येथे किमान तापमान १७.८ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे रात्रीदेखील उष्णतेची चाहूल जाणवू लागली आहे.



## लेक वाचवण्यासाठी रणरागिणींचा एल्गार

### विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठानचा पुढाकार

**रिसोड / प्रतिनिधी**

'मुलगा-मुलगी एकसमान, दोन्हींना द्या सन्मान,' 'आई पाहिजे, पत्नी पाहिजे, मग मुलगी का नको?' अशा गगनभेदी घोषणांनी रविवारी रिसोड शहर दुमदुमून गेले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठान, रिसोड च्या वतीने स्त्री भ्रूणहत्ये सारख्या सामाजिक कलंकाविरुद्ध जनजागृती करण्यासाठी एका भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी शेकडो महिलांनी रस्त्यावर उतरून लेक वाचवादेश वाचवा,चा नारा देत समाजाचे डोळे उघडण्याचे काम केले.आजच्या आधुनिक युगातही स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण चिंताजनक आहे.विज्ञानाने प्रगती केली असली,तरी मानवी मानसिकता अजूनही स्त्री जन्माचे स्वागत करण्यास कचरत आहे. हिच बाब लक्षात घेऊन विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठानने महिला दिनाचे औचित्य साधून केवळ सत्कार समारंभ न ठेवता, थेट समाजातील ज्वलंत प्रश्नाला हात घातला. ८ मार्च रोजी आयोजित या कार्यक्रमात उपस्थित महिलांनी स्त्री जन्माचे स्वागत करण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमाचे नेतृत्व करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप खंडारे यांनी आपल्या भाषणात अत्यंत बेधडकपणे आपली मते मांडली. ते म्हणाले की, ''स्त्री ही सृष्टीचा आधार आहे.जर मुलगीच जन्माला आली नाही, तर भविष्यात समाजाचा समतोल बिघडल्या शिवाय राहणार नाही. स्त्री भ्रूणहत्या हा केवळ गुन्हा नाही, तर तो माणुसकीला लागलेला कलंक आहे.हा कलंक पुसण्यासाठी पुरुषांनी आपली मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

## पडवाळ यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**वाशिम / प्रतिनिधी**

सुपखेला येथील यशवंतराव चव्हाण सैनिकी शाळेतील शिक्षक रमेश रावसिंग पडवाळ यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. नागपूर येथील हसनबाग रोडवरील जट्टेवार सभागृहात आयोजित सोहळ्यात राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमात राज्यातील अनेक गुणी, उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी



सन्मान करण्यात आला. रमेश पडवाळ यांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले विविध उपक्रम आणि शिक्षण क्षेत्रातील समर्पित कार्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. त्यांच्या शांत, संयमी स्वभावासह प्रेरणादायी कार्यामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजात विशेष ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत.

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक कामांमध्येही त्यांचे मोलाचे योगदान आहे. ते महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटना, वाशिमचे जिल्हाध्यक्ष, शिक्षक महासंघाचे शहराध्यक्ष, इब्टा माध्यमिक संघटना वाशिमचे जिल्हाध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य मथुरा लभान संघटनेचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

## बाटलीबंद संस्कृतीने हरवल्या शहरातील पाणपोई

**भागवत घुगे**

**रिसोड :** एकेकाळी उन्हाळा सुरू झाला की रिसोड शहरासह तालुक्यातील चौकाचौकांत पाणपोई उभारल्या जात होत्या. प्रवाशांची तहान भागवण्यासाठी दानशूर संस्था, व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते पुढाकार घेत असत, मात्र बदलत्या काळात बाटलीबंद संस्कृतीने या पाणपोईंचे अस्तित्वच धोक्यात आणले आहे.

आज परिस्थिती अशी झाली आहे की, सर्वसामान्यांची तहान भागवण्यासाठी खिशाला झळ बसत आहे. बाजारपेठ, बसस्थानक,




शासकीय कार्यालय परिसर किंवा शाळा-महाविद्यालयांच्या आसपास थंड पाण्याऐवजी आता प्लास्टिकच्या बाटल्या दिसतात. विकतचे पाणी घेणे हीच जणू फॅशन बनली आहे. पूर्वी एखाद्या संस्थेच्या नावाने उभारलेली पाणपोई ही केवळ पाणीपुरवठ्याची सोय नव्हती, तर सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होती. रमजान, यात्रोत्सव, आषाढी वारी, गणेशोत्सव यावेळी मोठ्या प्रमाणावर पाणी वाटप केले जात असे. आता मात्र त्या परंपरेला उतरती कळा लागल्याचे चित्र आहे. तालुक्यात पुन्हा एकदा पाणपोई संस्कृतीला बळ द्यावे, सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा आणि प्रशासनानेही सार्वजनिक ठिकाणी मोफत शुद्ध पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अशी भावना ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली. आता बाटलीबंद पाण्याच्या वाढत्या वापराला लगाम लावून दानशूर परंपरा पुन्हा जिवंत होणार का, याकडे शहरासह तालुत्यातील सर्वांचे लक्ष लागले आहे.

### वारसा जपण्याची गरज

- प्लास्टिकच्या बाटल्यांमुळे पर्यावरणाचा प्रश्नही गंभीर बनला आहे. रस्त्यांवर, नाल्यांमध्ये फेकलेल्या रिकाम्या बाटल्यांमुळे अस्वच्छता वाढत आहे. दुसरीकडे, दानशूर संस्थांचा सामाजिक वारसा जपण्याऐवजी व्यापारीकरणाला चालना मिळत असल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

## मुक्या पक्ष्यांसाठी केसवाणी यांचा 'जलपात्र' उपक्रम

**वाशिम / प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे तापमान चाळीशीच्या पुढे जात असताना माणसांप्रमाणेच पशू-पक्ष्यांनाही पाण्याची मोठी टंचाई भासत आहे. अशा परिस्थितीत पाण्यासाठी भटकणाऱ्या मुक्या पक्ष्यांच्या वेदना ओळखत वाशिम येथील दिलीप अशोककुमार केसवाणी यांनी गेल्या १७ वर्षांपासून 'मोफत जलपात्र वाटप' हा उपक्रम राबवून माणुसकीचा आदर्श जपला आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत नदी-नाले आणि तलाव कोरडे पडत असल्याने पक्ष्यांना पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागते. अनेकदा पाण्याचा स्रोत न मिळाल्याने पक्षी



उष्माघाताने मृत्युमुखी पडतात. या पार्श्वभूमीवर पक्ष्यांसाठी पाण्याची सोय व्हावी, या संवेदनशील भावनेतून दिलीप केसवाणी यांनी १७ वर्षांपूर्वी हा उपक्रम सुरू केला. छोट्याशा प्रयत्नातून सुरू झालेला हा उपक्रम आज अनेक पक्ष्यांसाठी जीवनदायी ठरत आहे.

वाशिममधील बालाजी कॉम्प्लेक्स परिसरातील 'रॉयल्स स्पोर्ट्स अँड टॉईज' या त्यांच्या दुकानातून दरवर्षी नागरिकांना पक्ष्यांसाठी मातीची किंवा फायबरची जलपात्रे मोफत वाटप केली जातात. गेल्या १७ वर्षांत या उपक्रमामुळे हजारो पक्ष्यांना पाण्याचा आधार मिळाल्याचे सांगितले जाते. ''पक्षी त्या पात्रावर बसून तहान भागवतात आणि चिवचिवाट करतात, तो आनंद कोणत्याही नफ्यापेक्षा मोठा असतो,'' अशा भावना दिलीप केसवाणी यांनी व्यक्त केल्या.

## अडोळी येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिला ग्रामसभा

**अडोळी / प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अडोळी येथे ग्रामपंचायतीतर्फे महिला ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. पी.एम.श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात ८ मार्च रोजी सकाळी १० वाजता ही ग्रामसभा पार पडली.

या महिला ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी अडोळी ग्रामपंचायत प्रशासक सविताताई इढोळे होत्या. कार्यक्रमाला प्रशासकीय सदस्य तथा उपसरपंच भगवान इढोळे, सदस्या अन्नपूर्णा तायडे, आदिशक्ती महिला अभियान समितीच्या अध्यक्षा केशरबाई खिल्लारे, अंगणवाडी सेविका केशरबाई



इढोळे, समाजसेवक राजकुमार पडघान, खंडोबा कन्स्ट्रक्शनचे संचालक परमेश्वर इढोळे, सुरेश इढोळे, सैनिक विष्णू इढोळे तसेच ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि माता रमाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर ग्रामपंचायत प्रशासकपदी निवड झाल्याबद्दल सविताताई इढोळे, प्रशासकीय सदस्य भगवान इढोळे आणि अन्नपूर्णा तायडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी बालविवाह प्रथा, हुंडा प्रथा, महिला सक्षमीकरण यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच समाजोपयोगी ठराव वाचून दाखवण्यात आले आणि ते मंजूर करण्यात आले. बालविवाह प्रतिबंधासाठी प्रतिज्ञेचे वाचन राजकुमार पडघान यांनी केले. महिला दिनानिमित्त मार्गदर्शन करताना राजकुमार पडघान यांनी महिला दिनाचा इतिहास सांगताना १९०८ मध्ये न्यूयॉर्क येथे महिला कामगारांच्या हक्कांसाठी झालेल्या आंदोलनातून महिला दिनाची सुरुवात झाली आणि १९११ मध्ये त्याला मान्यता मिळाली, असे सांगितले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाद्वारे महिलांना समान हक्क दिले, त्यामुळे महिलांना राष्ट्रपती पदापर्यंत मजल मारता आली, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेच्या प्रज्ञा खंडारे यांनीही महिला दिनाचे महत्त्व विषद केले. यावेळी अंगणवाडी सेविका छायाताई खंडारे, शिला सावळे, महिला बचत गटाच्या सागरबाई इढोळे, संजीवनी पडघान, आशा वर्कर खंडागळे ताई, भिमा पडघान, सिंधू इढोळे, शकुंतलाबाई कांबळे, अनुसयाबाई सावंत, लक्ष्मी खंडारे, हरिभाऊ इढोळे, नारायण इढोळे, माजी ग्रामपंचायत सदस्या वनमाला खंडारे आणि अनिता पडघान यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

## जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर : महाराजस्व समाधान अभियानाला प्रारंभ

# शासनाच्या सेवा नागरिकांच्या दारात पोहोचविण्यासाठी तत्पर

**वाशिम / प्रतिनिधी**

महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवून त्यांच्या प्रलंबित समस्या तात्काळ सोडविणे हा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा मुख्य उद्देश असून नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकाऱ्यांहस्ते वाशिम तालुक्यातील अनसिंग व मंगरूळपीर तालुक्यातील आसेगाव येथे शनिवारी या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. जिल्ह्यातील सहाही तालुक्यांमधील प्रत्येकी एका



महसूल मंडळात शनिवारी एकूण सहा शिबिरांचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये या अभियानाचा एकाच दिवशी प्रारंभ होऊन नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महसूल विभागाशी संबंधित विविध प्रकरणे मांडली. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत अनेक प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, रवी काळे तसेच तहसीलदार निलेश पळसकर, सुधाकर अनासुने आदींची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले, या अभियानाच्या माध्यमातून प्रलंबित महसूल प्रकरणे निकाली काढणे, नागरिकांना विविध प्रमाणपत्रे व उतारे सुलभपणे उपलब्ध करून देणे तसेच प्रशासन व नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करणे हा उद्देश आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने शिबिरांमध्ये सहभागी होऊन आपल्या समस्या मांडाव्यात व या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी केले. कार्यक्रमाला महसूलसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### पहिल्याच दिवशी महसूल प्रकरणांवर कार्यवाही

- जिल्ह्यात आजच्या शुभारंभाच्या दिवशी विविध महसूल प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली. त्यामध्ये फेरफार २१८, ७/१२ दुरुस्ती ११०, डिजिटल सातबारा ९५४, ८-अ उतारे ८४३, विविध प्रमाणपत्रे ८८८, तसेच एकल खिडकी व्यवस्थेंतर्गत ३४३ प्रकरणे मार्गी लावण्यात आली. याशिवाय १५ भूसंपादन प्रकरणांमध्ये कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्ययावत करण्यात आले, तर ३ अकृषक प्रकरणांना परवानगी देण्यात आली.

### १५ मेपर्यंत चालणार अभियान

- महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविणे, प्रलंबित प्रकरणे कमी करणे आणि प्रशासन व नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करणे या उद्देशाने हे अभियान १५ मेपर्यंत जिल्हाभर प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या अभियानामुळे नागरिकांना विविध कामांसाठी कार्यालयांची पायपीट करण्याची गरज कमी होत असून, एकाच ठिकाणी अनेक सेवा उपलब्ध होत असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## कंकरवाडी येथे जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या मुर्तीची स्थापना

**रिसोड / प्रतिनिधी**

येथून जवळ असलेल्या कंकरवडी स्थित संत तुकाराम महाराज विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवार ५ मार्च रोजी संत तुकाराम बीज निमित्त जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी औंढा नागनाथ येथील संजय जोगदंड महाराज यांच्या कीर्तनाचे व तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी मेघश्याम पत्रे गुरुजी यांच्या हस्ते संत तुकाराम महाराजांच्या मूर्तीची विधिवत स्थापना करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य साहेबराव जाधव व त्यांच्या धर्मपत्नी वंदना जाधव यांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली. यावेळी आयोजित कीर्तनाच्या कार्यक्रमासाठी कंकरवाडी, आगरवाडी, गोरखवाडी व या पंचक्रोशीतील भाविक मंडळी व तसेच विद्यार्थ्यांचे पालक, महिला विद्यार्थी यांनी कीर्तनाचा व प्रसादाचा लाभ घेतला.

तसेच यावेळी संस्थापक अध्यक्ष श्रीकृष्ण ढेकळे, रिसोड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भगवान शिरसागर, स्थानिक शाळा शिक्षण समिती अध्यक्ष बळीराम कोल्हे, कुंडलिकराव देवकर, बाबाराव घुगे, ह.भ.प. केशव महाराज, संजय घुले पोलीस सहायक उपनिरीक्षक व तसेच घुले ताई, वंदना जाधव, प्रल्हाद काकडे, ओंकार महाराज सानप, गिरीधर शेजुळ, भागेश मुंढे, गजानन मुंढे व तसेच कंकरवाडी, आगरवाडी येथील भजनी मंडळी आदी मंडळी यांनी उपस्थित राहून या कार्यक्रमास सहकार्य केले व कार्यक्रमाची शोभा वाढवली.











जाहीरात संकलन मनोज पाटील अमनकार तालुका प्रतिनिधी संग्रामपूर मो. ९६०४५ ३०१११